# शब्द रुची

४५

डिसेंबर २०२०
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६८




॥ग्रंथाली॥

# दिवाळीपहाट क्षणचित्रे...

storytel

पत्रवाचन करताना...




मा. शरद पवार



मा. देवेंद्र फडणवीस









सहभाग कलावंत
स्पृहा जोशी, सचिन खेडेकर, सुमीत राघवन आणि दीपक करंजीकर
पत्र वाचन करताना



केतकी भावे–जोशी आणि अजित परब गाणी साजरी करताना

संपदा जोगळेकर, वादक दत्ता तावडे, हनुमंत रावडे, आर्चिस लेले,
केतकी भावे, अजित परब, वरद कठापूरकर आणि सागर साठे



विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**वाचनसंस्कृती विशेषांक**

**डिसेंबर २०२०, वर्ष आठवे**
**अंक आठवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर, अरुण जोशी**
अभ्यागत संपादक : **नरेंद्र लांजेवार**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, सहकारी – सुमेधा कुवळेकर**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthali02@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४५

## अनुक्रम

**कृतार्थ शेवगावकर** / ६
वाचन अंतर्मुख, विचारी आणि विवेकी बनवतं – अतुल पेठे

**माधव राजगुरू** / १०
शालेय वाचनसंस्कृती टिकवण्याचे आव्हान

**प्रा. हेमंत खडके** / १४
महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वाचन : एक प्रश्नचिन्ह!

**जयदेव डोळे** / १७
शिक्षक-प्राध्यापकांचे वाचन : काही अपेक्षा

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी** / २०
कोविडोत्तर वाचनसंस्कृती...

**नीतीन रिंढे** / २३
एकोणिसाव्या शतकात मराठी वाचकाचा उदय

**राजू बावीस्कर** / २६
माझी चित्रे : वेदनेच्या जाणिवांचे वाहक

**राजकुमार तांगडे** / ३०
डोळसपणे वाचायची कसोटी...

**दिवाळीपहाट आणि ताठ कणा चित्रपट क्षणचित्रे**/ ३३

**राधिका कुंटे** / ३७
ताठ कण्याच्या ध्यासाची गोष्ट

**दिवाळीपहाट वृत्तांत – गगन सदन तेजोमय** / ४२

**फारूक एस. काझी, बाळासाहेब लिंबीकाई** / ४४
मुलांसाठी 'चांगली पुस्तकं' निवडताना...

**साकेत भांड** / ४७
प्रकाशनक्षेत्राचे बदलते जग

**उमेश घेवरीकर** / ५०
वाचनसंस्कृतीची दिशा आणि दिशाभूल

**हेरंब कुलकर्णी** / ५२
उपेक्षितांचे जग दाखविणारी पुस्तके आणि तरुण पिढी

**डॉ. पृथ्वीराज तौर** / ५५
माझे वाचन... माझे जगणे

**नरेंद्र लांजेवार** / ५८
महाराष्ट्राची वाचनसंस्कृती अद्यापही 'बाल्यावस्थेत!'

ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** /६३

संपादकीय

# वाचनसंस्कृती वास्तव आणि अपेक्षा..

**महाराष्ट्राचे** आणि त्यातही मराठी माणसाच्या वाचनसंस्कृतीचे वास्तव फारसे अभिमानास्पद दिसत नाही. साहित्य-कला-संस्कृती हे क्षेत्र महाराष्ट्रातील १० ते १२ टक्के जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. इतर क्षेत्रांतील व्यक्तींना साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्राशी विशेष देणे-घेणे दिसत नाही, परंतु इतर क्षेत्रांचे प्रतिबिंब मात्र साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात प्रतिबिंबित होते. म्हणजेच साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रातील व्यक्तीला कोणत्याही विषयाची ॲलर्जी नसते. खरं तर मानवी जीवनात काहीही वर्ज्य नसावेच! प्रत्येक क्षेत्रातील अनुभवसमृद्धी विविधांगी असते आणि एकाच मानवी जीवनात ती अनुभवण्याची संधी वाचनातून मिळते.

कोरोनाच्या काळात माहितीतंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला, आणि तो वाढतच आहे. कोरोनापूर्व भारतीय लोकांचा स्क्रीन टाइम सरासरी दीड तास होता, तो कोरोनाच्या काळात पाच तासापर्यंत वाढला. जगभरातून यूट्यूबवर एका मिनिटात ऐंशी तासांची माहिती अपलोड होत आहे, असा प्रचंड वेग बघितल्यानंतर आपली मती गुंग होणारच....

ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाची साधनं जसजशी वाढत गेली तसतसा पुस्तक वाचणारा समूह कमी होत गेला, असं विधान करण्यात येते. या विधानात पाहिजे तेवढी सत्यता नाही. बरोबर सव्वाशे वर्षांपूर्वी, १८९५ मध्ये 'वाचन' नावाची एक पुस्तिका प्रकाशित झाली होती. जगन्नाथ शंकर स्कॉलरशिप मिळणाऱ्या यादव शंकर वाविकर ऊर्फ राजहंस नावाच्या निबंधकारानं १८९५ मध्ये, 'वाचन' नावाची पुस्तिका लिहिली होती. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत, 'हल्लीचे शिक्षक-प्राध्यापक टेस्टबुक्स खेरीज अन्य काही वाचत नाहीत' अशी तक्रार त्यानं केली होती! आजही या तक्रारीत तथ्य जाणवते. इतक्या मोठ्या कालखंडात शिक्षणाचं प्रमाण वाढलं, पुस्तक प्रकाशनाचा वेग वाढला, आर्थिक सुबत्ता वाढली परंतु वाचन करणाऱ्या समाजाची म्हणावी अशी संख्या वाढली नाही, हे वास्तव आहे. आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्यानं वाचनाचं काम बघणं व ऐकण्यावर येऊन थांबतं की काय, असे वाटू लागले आहे.

गेल्या दोन-तीन दशकांत प्रत्येकाच्या कामाचे स्वरूप बदलत गेल्याने ज्याच्या-त्याच्याजवळ वेळ नाही. आणि अनेकाजवळ पैसा आहे परंतु इतरांसाठी व स्वतःसाठी द्यायला वेळ नाही. ज्यांच्या जवळ वेळ आहे ते व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी बनले आहेत. वर्षानुवर्षे एकाच इयत्तेत राहिल्याने त्यांच्या वाचनाची अभिरुची विकसित होताना दिसत नाही. अभिरुचीपूर्ण वाचन वाढले पाहिजे यासाठी शालेय, महाविद्यालयीन आणि विद्यापीठांमध्येही फारसे उपक्रम होताना दिसत नाही. ते व्हावेत यासाठी, कला शाखेसह विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदा, व्यवस्थापन इत्यादी सर्वच विद्याशाखांमध्ये अवांतर वाचनाला प्राधान्य हवे. आज शाळाशाळांमधील अर्धवेळ ग्रंथपाल हे पदच सरकारने गोठवले आहे. शाळांमधील पूर्णवेळ ग्रंथपालांची नियुक्तीसुद्धा बंद केली आहे. तसेच, सार्वजनिक ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांना फक्त दहा टक्केच अनुदान देऊन आता सार्वजनिक ग्रंथालयाची आवश्यकताच संपलेली आहे, यावर सरकारनेच मोहर लावली आहे. 'गाव तेथे ग्रंथालय' ही घोषणा होऊनही पन्नास वर्षे लोटली आहेत, तरीही ७० टक्के गावांमध्ये अजूनही सार्वजनिक ग्रंथालय सुरू झाले नाहीत. सरकारने ठरवून दिलेल्या किमान वेतना इतकीही मजुरी सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना अद्यापही मिळत नाही आणि सरकार वाचनसंस्कृती वाढवण्याच्या गप्पा करत आहे. २०१२ पासून महाराष्ट्रात एकाही नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना सरकारने मान्यता दिली नाही, यातूनच सरकारची ग्रंथालयाकडे बघण्याची अनास्था दिसून येते.

आज तंत्रज्ञानाने प्रचंड झेप घेतली आहे. तंत्रज्ञानाधिष्ठित

जीवनशैली विकसित झाली आहे, त्यामुळे वाचनाची साधने बदललेली आहेत. व्हॉट्सॲप, ई-बुक्स, किंडल, गुगल, स्टोरीटेल, अलेक्सा, पीडीएफ ड्राईव्ह यांच्या साह्याने लोक आपली वाचनाची भूक भागवत आहेत. याबद्दल या सर्व माध्यमांचे आपण स्वागतच केले पाहिजे. अपेक्षा फक्त एवढीच, की गंभीर आणि अभिजात साहित्याचे वाचन वाढले पाहिजे, ते वाढत नाही ही खरी आपली खंत आहे..

खंत करत राहण्यापेक्षा सातत्याने प्रयत्न करत राहणे महत्त्वाचे असते. एक शायर म्हणतो,

माना की सब तरफ अंधेरा है ...

मगर दिया जलाना कहाँ मना है ..

आपण अंधाऱ्या पाऊलवाटेवर मिणमिणता का होईना दिवा लावूया...

'ग्रंथाली' सुरुवातीपासूनच वाचनसंस्कृतीच्या विकासासाठी विविधांगी पद्धतीने कार्य करत आली आहे. समाजामध्ये अभिरुचीसंपन्न वाचक तयार झाला पाहिजे याबाबत ग्रंथाली नेहमीच तत्पर राहिली आहे. लॉकडाऊनच्या काळात वाचक-लेखकसंवाद प्रभावी राहण्यासाठी 'साहित्याचा पारावर' हा अभिनव उपक्रम ग्रंथालीने सुरू केला. लॉकडाऊन काळातही वाचकांची भूक भागवण्याचा प्रयत्न ग्रंथालीने केला. ग्रंथालीचे विश्वस्त मित्रवर्य सुदेश हिंगलासपूरकर ही एक व्यक्ती नसून ते विविधांगी कल्पनेचे विद्यापीठ आहे. आपल्याकडे आर्थिक दारिद्र्यासोबतच कल्पनेचेसुद्धा दारिद्र्य आहे, परंतु सुदेशकडे आर्थिक सुबत्ता नसेल; मात्र कल्पनेची प्रचंड सुबत्ता आणि व्यक्तिगत ऊर्जा आहे. यातून ग्रंथालीचा संपूर्ण डोलारा उभा आहे.

दरवर्षी डिसेंबरचा 'शब्द रुची'चा अंक वाचनप्रेरणा विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात येतो. या वर्षीच्या या अंकाचा अभ्यागत संपादकांचा मान सुदेश हिंगलासपूरकर यांनी मला दिला. माझ्यासारख्या एका सामान्य ग्रंथप्रेमी वाचकाला हा मान मिळणे म्हणजे मला तरी राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्यासारखे वाटते आहे. मी गेल्या पंचवीस-तीस वर्षांपासून शालेय ग्रंथपाल या नात्याने मुलांमध्ये वाचनसंस्कृतीचे बीजारोपण करत आलो आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून मी ग्रंथालीशी जोडला गेलो आहे. ग्रंथालीने मला लेखक म्हणून ओळख प्राप्त करून दिली आहे. सुदेशच्या प्रेमापोटी मी या महिन्याचे अभ्यागत संपादकपद स्वीकारले व माझ्या जवळच्या लेखक मित्रांना या अंकासाठी लिहिण्याची विनंती केली. या लेखांमधून विविध क्षेत्रांतील वाचनसंस्कृतीची सद्यस्थिती आणि अपेक्षा यावर काही मान्यवरांनी सुंदर मांडणी केली आहे. यामध्ये 'शिक्षक-प्राध्यापकांची वाचनसंस्कृती'वर सव्यसाची प्राध्यापक जयदेव डोळे यांनी लेखन केले आहे. 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वाचन' यावर अमरावती विद्यापीठाचे मराठी विभागातील प्रा. डॉ. हेमंत खडके, 'शालेय विद्यार्थ्यांची वाचनसंस्कृती' यावर किशोर मासिकाचे माजी संपादक व झंप्या या बालमासिकाचे संपादक श्रीधर राजगुरू, 'कलावंतांची वाचनसंस्कृती' यावर ज्येष्ठ नाट्यकर्मी, लेखक अतुल पेठे यांची अभ्यासपूर्ण मुलाखत ही खरोखरच या अंकाची मौलिकता वाढवणारी बाब आहे. 'कोरोनात्तर वाचनसंस्कृती'विषयी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष तथा माध्यमतज्ज्ञ डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा अभ्यासपूर्ण लेख या अंकात देण्यात आला आहे. शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला या नाटकामुळे महाराष्ट्रभर नाव असलेले नाट्य-चित्रपट-लेखक कलावंत राजकुमार तांगडे यांचे 'मी का वाचतो? मी का व्यक्त होतो?' हा लेख संवेदनशील व्यक्तींना विचार करण्यास प्रवृत्त करतो. शिक्षणतज्ज्ञ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी त्यांच्या विचारप्रवृत्तीनुसार उपेक्षित जगाचे जगणे चित्रित करणाऱ्या काही पुस्तकांवर लिहिले आहे. तरुण पिढीपर्यंत ही पुस्तके आज जाणे गरजेचे आहे. मराठी प्रकाशन व्यवसायाने वाढत्या तंत्रज्ञानाच्या काळात प्रभावीपणे टिकण्यासाठी काय बदल अपेक्षित आहे, यावर प्रयोगशील प्रकाशक साकेत भांड यांनी सुरेख मांडणी केली आहे. वाचनसंस्कृतीच्या क्षेत्रात बालवाचक हा नेहमीच उपेक्षित घटक आहे, परंतु मुलांसाठी चांगली पुस्तके निवडताना हा प्रयोगशील शिक्षक आणि लेखक फारूख काझी आणि कृतिशील शिक्षक, मराठी भाषा अभ्यासक बाळासाहेब लिंबीकाई यांचा लेख अभ्यासपूर्ण तसेच पालकांसाठी दिशादर्शक आहे. नव्या पिढीचे जाणकार वाचक, लेखक, अनुवादक प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांनी त्यांच्या चौफेर वाचनावर जे लिहिले आहे ते नव्या वाचकांनाही प्रेरित करणारे आहे. एकोणिसाव्या शतकात मराठी वाचकाचा उदय कसा झाला यावर वाचनसंस्कृतीचे अभ्यासक आणि भाष्यकार प्रा. नीतीन रिंढे यांचा महत्त्वपूर्ण लेख आहे. माझ्या लेखासह प्रयोगशील शिक्षक-लेखक उमेश घेवरीकर यांचा आणि चिंतनशील चित्रकार राजू बावीस्कर यांचासुद्धा लेख विचार करण्यास महत्त्वपूर्ण असा आहे.

वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काय करावे? याचे सूतोवाच प्रत्येक जण करतो. आजपर्यंत अनेकांनी सूतोवाच केले, आता प्रत्यक्ष कृतीच करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने हे विचारमंथन म्हणजे पुढे टाकलेले एक पाऊल आहे. तंत्रज्ञानासोबत हातमिळवणी करून अभिरुचीसंपन्न वाचनसंस्कृती विकसित करण्याचे शिवधनुष्य आपणा सर्वांना पेलायचे आहे.

हा अंक संपादित करण्यासाठी सर्व लेखक मित्रांसह ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, वाचक चळवळीचे कार्यकर्ते चांगदेव काळे, लेखक मित्र किरण येले, प्रा. नीतीन रिंढे, अरुण जोशी, चित्रकार सतीश भावसार, योगिता मोरे या सर्वांशी केलेल्या चर्चेतून हा अंक तयार झाला आहे, या सर्वांबद्दल मी त्यांचा आभारी आहे. वाचक इतर अंकांप्रमाणे याही अंकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

**– नरेंद्र लांजेवार**



कृतार्थ शेवगावकर

# वाचन अंतर्मुख, विचारी आणि विवेकी बनवतं - अतुल पेठे

**कृतार्थ :** सर, आज एका अतिशय महत्त्वाच्या आणि आपल्या सर्वांच्याच जवळच्या असणाऱ्या विषयावर गप्पा मारण्यासाठी मी तुम्हाला भेटलो आहे. आज आपण 'वाचन' या अतिशय महत्त्वाच्या, गंभीर आणि जगण्यात गंमत आणणाऱ्या कृतीविषयी बोलणार आहोत. गेल्या अनेक वर्षांपासून तुम्ही कलाक्षेत्रात कार्यरत आहात. म्हणून आजच्या मुलाखतीचा विषय 'कलावंतांचं वाचन – वास्तव आणि अपेक्षा ' असा निश्चित केला आहे. परंतु कलावंतांच्या वाचनाविषयी बोलण्याआधी आपण एकुणातच माणसाच्या जगण्यातील वाचनाच्या स्थानाविषयी बोलूया. कारण वाचन ही काही फक्त कलावंतांपुरती मर्यादित गोष्ट नाही. कलाकारांनीच नाही तर अगदी कोणीही – का वाचलं पाहिजे? वाचनानं काय फरक पडतो?

**अतुल पेठे :** माणसाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र आणि निवारा या आहेत यात काहीही शंका नाही. परंतु माणसाच्या उत्क्रांतीमध्ये माणसाची ज्ञानाची भूक वाढत गेली आणि आजूबाजूची सृष्टी समजून घेण्याची आस लागली तसतसा माणसानं विचार करायला सुरुवात केली. त्याला प्रश्न पडायला लागले आणि त्या प्रश्नांची उत्तरे तो शोधू लागला. तो अभिव्यक्त होऊ लागला. एकमेकांशी बोलू लागला. त्याला जे शोध लागले ते तो दुसऱ्याना सांगू लागला. या टप्प्यांमध्ये चिन्हमीमांसा सुरू झाली. काही चिन्ह काढली जायची. एकमेकांना काही सांगण्याच्या वेगवेगळ्या पद्धती सुरू झाल्या. त्यापुढच्या टप्प्यावर मौखिक भाषा आणि लिखित भाषा सुरू झाल्या. लिखाण सुरू झालं. लिहिण्यातून एकमेकांना संदेशवहन करणं सुरू झालं. पुढे प्रिंटिंग मशीनचा शोध लागला तेव्हा त्याचं जास्त decentralisation होऊन ते ज्ञान विकेंद्रित होऊन सर्वांपर्यंत पोहचू लागलं. याच टप्प्यात लोक वाचू लागले, लिहू लागले. एकमेकाना सांगू लागले. जगातील सर्व ज्ञान एकमेकांना मिळू लागलं. हे मानवी उक्रांतीतील टप्पे अतिशय महत्त्वाचे आहेत. आपल्याच परिसराच्या पल्याडचं आकलन आपल्याला आधी नव्हतं. चारशे वर्षांपूर्वीच्या काळात त्यांच्या भोवतीचं जे क्षेत्रफळ असेल त्यापेक्षा आपल्या भोवतीचं आजचं क्षेत्रफळ नक्कीच जास्त आहे. जागतिक आहे. फेसबुक आणि इंटरनेटसारख्या माध्यमांमुळे आपण आज जगभरातील कानाकोपऱ्यातील गोष्टी आपण वाचू आणि पाहूही शकतो. माहितीचा प्रचंड विस्तार झाला आहे. या सगळ्यात 'लिहिलेला' शब्द फार महत्त्वाचा आहे. लिखित साहित्य महत्त्वाचे आहे. मग त्यात अभ्यास, वेगवेगळी क्षेत्रंही आली. याला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. माझ्यामते 'वाचणं' ही एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत लिहिलेलं साहित्य आणि वाचक यांच्यात दुसरा कोणी कडमडत नाही. विचार आणि मी याच्यामध्ये दुसरा कोणी नसतो. नाटक किंवा इतर माध्यमांमध्ये लिहिणारा आणि सांगणारा वेगळा असतो. वाचनामध्ये थेटच लिहिणारा सांगतो हे महत्त्वाचं आहे. वाचनामध्ये मी फक्त साहित्य असं गृहीत धरत नाही. वाचन म्हणताना अभियांत्रिकीपासून वेगवेगळ्या शास्त्रांपर्यंत वेगवेगळ्या विषयांचं वाचन असं मी गृहीत धरतो. ज्ञानवृद्धी होण्यासाठी लिखित साहित्य हे माझ्या दृष्टीनं प्रचंड महत्त्वाचं आहे. 'वाचाल तर वाचाल' असे आपण अनेक वर्षं ऐकत आलेले आहोत. सगळ्याच गोष्टी मी अनुभवाच्या पातळीवर घेऊ शकत नाही. अनुभवानं ज्ञान आणि आकलन वाढतच यात प्रश्नच नाही. परंतु वाचनामुळे आणि लिखित साहित्यामुळे मी आज इथे माझ्या घरी बसून जगातल्या वेगवेगळ्या देशातील माणसं काय

म्हणत आहेत, विचार करत आहेत हे मला समजू शकतं. सहाअनुभूत व्हायला, दुसऱ्यांच्या गोष्टी समजून घ्यायला लिहिलेली पुस्तकं वाचणं मला जास्त महत्त्वाचं वाटतं. वाचनामुळे एक प्रक्रिया होते ती अशी की लिहिलेल्या साहित्याचं आकलन आणि अर्थनिर्णयन (interpretation) मी माझ्या पातळीवर करायला लागतो. वाचनामुळे माझी शाब्दिक भाषा आणि संवादपद्धती वेगळ्या स्तरावर जायला लागते. माझा मेंदू आणि माझं आकलन या पातळीवर ती जास्त क्रियाशील होते असं माझं मत आहे. आपण एखादी ज्ञानेश्वरांची ओवी वाचली किंवा तुकारामांचा अभंग वाचला तर प्रत्येकाची अर्थ लावण्याची पद्धत वेगळी असेल. स्वत:चा अनुभव चिकटवून त्या शब्दांचे अर्थ मी लावतो. ही प्रक्रिया मला अत्यंत महत्त्वाची वाटते.

**कृतार्थ :** तुमच्या बोलण्यात आलेला 'सहाअनुभूत' हा शब्द खूपच चांगला आहे. वाचनामुळे दुसऱ्यानं घेतलेल्या अनुभवाची चव आपल्याला चाखायला मिळते. पण तुमच्या वाचनाची सुरुवात कशी झाली? हे वाचनाचं महत्त्व तुम्हाला कसं उलगडलं?

**अतुल पेठे :** सुरुवात म्हणशील तर घरातूनच. घरी मासिकं यायची. वर्तमानपत्रं यायची. साधनेचा अंक यायचा. दिवाळी अंक यायचे. तेव्हा ऐकलंही जास्त जायचं. मी पुण्यासारख्या ठिकाणी राहायचो. लायब्ररीतून पुस्तकं आणायची. झुंजारकथा आणायच्या. अमरचित्रकथा आणायच्या. त्या वाचायच्या. हे माझ्या आयुष्यात फार लवकर सुरू झालेलं होतं. शाळेतील शिक्षकही वाचायला बऱ्यापैकी उद्युक्त करायचे. मजाही यायची. कोणी वाचूनही दाखवायचं. लहानपणी मी शंकर पाटील, द.मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, पु.ल. देशपांडे यांची कथाकथनं खूपच ऐकलेली आहेत. त्यामुळे वाचनाचं महत्त्व लहानपणापासून आमच्या मनावर ठसलेलं होतं. गो.नी. दांडेकर, व.पु. काळे, चिं.त्र्यं. खानोलकर हे सगळे लेखक माझे आठवी, नववी, दहावीपर्यंत वाचून झालेले होते. दहावीला असताना कोसला नावाची कादंबरी माझ्या हातात आलेली होती. वाचनाचे टप्पे माझ्या आयुष्यात पुढे विविध पद्धतीनं येत गेले त्याचा उलगडा आपण नंतर करू. वाचण्यात खूप गंमत असते. हे लहानपणी मला माझ्या पातळीवर तरी उलगडलेलं सत्य होतं.

**कृतार्थ :** हे सत्य उलगडल्यानंतरच्या तुमच्या पुढच्या टप्प्यांवरील वाचनप्रवासाविषयी ऐकण्याची उत्सुकता आहे.

**अतुल पेठे :** वाचनाचं महत्त्व मी सांगत असलो तरी ज्याला गाढा वाचक म्हणतात तसा मी नाही याची स्पष्ट कबुली मी आधी देतो. माझ्यापेक्षा प्रचंड आणि प्रगाढ वाचन करणारे लोक आहेत. त्यांच्या तुलनेत मी कमी आहे याची नम्र जाणीव मला आहे. परंतु मी जास्तीत जास्त वाचण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे इतरांच्या तुलनेत माझं वाचन जरा बरं आहे असं मला वाटतं. या चौकटीत मी तुझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. मी हळूहळू वाचायला शिकलो. मला कोणी कोणी धक्के दिलेले आहेत. तू हे वाचलंस का? पाहिलंस का? मुळातून वाचलंस का? असं विचारलेलं आहे. नवनीत गाईड वाचणं आणि एखादं पुस्तक वाचणं यात फरक आहे. शालेय वाचन आपल्याला गुण मिळवण्यासाठी असतं. नोकरी लागली की वाचन थांबवायचं अशी आपल्याला सवयच लावलेली आहे. शालेय वाचन सोडून अवांतर वाचन करायला मला अनेकांनी वेळोवेळी शिकवलं. त्याची तुम्हाला खरोखर गोडी लागावी लागते. कथा, कविता, कथात्म साहित्य, कादंबरी हे वाचता वाचता मी समीक्षात्मक, चित्रपटविषयक वाचायला लागलो. वास्तुकला, शिल्पकला यावरील अप्रतिम पुस्तकं मी वाचली. मला आठवतं की 'सर्कस सर्कस' नावाचं अप्रतिम पुस्तक मी वाचलं होतं. सर्कसविषयीची गंमत त्यात होती. सर्कस कशी चालवली जाते, सर्कशीत पडद्यामागे काय चालतं हे मला माहीत नव्हतं. परंतु त्या पुस्तकामुळे माझी उत्सुकता भयंकर ताणली गेली. हे वाचत असताना आपल्या कक्षा रुंदावत जातात हे मला महत्त्वाचं वाटतं. मी मराठीसोबत हिंदी वाचण्याचा प्रयत्न केला. प्रेमचंद वाचून संपवला. इंग्रजी वाचन हळूहळू मी करायला लागलो.कोणीतरी मला सांगितलं की काफ्का, काम्यु, सार्त्र, दस्तोवस्की हे जगातील महत्त्वाचे लेखक आहेत. मग मी त्यांच्या कादंबऱ्या घेऊन वाचल्या. ठरवून ग्रॅबिएल गार्सिया मार्केसच्या कादंबऱ्या वाचल्या. हे सगळं मी अतिशय श्रम घेऊन वाचलं. डिक्शनरी घेऊन मी बसायचो. डिक्शनरी वाचतोय की पुस्तक हेच पुढे पुढे कळेनासं व्हायचं. पण असं वाचत गेलं की तुमचा आवाका रुंदावतो. जगाचं भान मला माझ्या पातळीवर येत गेलं. वाचन ही सतत करण्याची प्रक्रिया आहे. ज्ञान मिळवणं ही सातत्यानं करण्याची प्रक्रिया आहे. ती पूर्ण होत नाही. कारण नवनवीन साहित्य जगामध्ये येतच असतं. वेगवेगळ्या पद्धतीनं लोक आयुष्याला भिडत असतात आणि आपापल्या भाषेत ते प्रकट करत असतात. अचंबित व्हायला होतं.

**कृतार्थ :** गेल्या अनेक वर्षांपासून तुम्ही नाटक करत आहात. दिग्दर्शन करत आहात. मी तुमच्यासोबत नाटकात काम केलेलं असल्यामुळे मला हेही माहीत आहे की नुसतं दिग्दर्शन किंवा अभिनयच नाही, तर नाटक करण्याच्या कल्पनेपासून त्याचे गावोगावी प्रयोग करण्यापर्यंत एकंदरीतच संपूर्ण नाट्यव्यवहार हा तुमच्या अभ्यासाचा आणि चिकित्सेचा विषय राहिलेला आहे.. डॉक्टर श्रीराम लागू आणि निळू फुले यांसारख्या अनेक दिग्गजांपासून ते नाटक करू इच्छिणाऱ्या नवख्या मुलांपर्यंत अनेकांनी तुमच्यासोबत काम केलय आहे. अनेकदा नाटकात काम करणाऱ्या नटांनी आणि इतर मंडळींनी यावं, आपलं काम चोख करावं आणि जावं अशी साधारण पद्धत असते. तुमच्या नाटकात काम करताना तसं घडत नाही. नाटकांचं दिग्दर्शन करताना तुमच्यातील संवादक आणि हाडाचा शिक्षक नेहमी जागा असतो. फक्त नटानंच नाही तर त्या नाट्यव्यवहारात सामील असणाऱ्या पडद्यामागील कलाकारांपर्यंत सर्वांनी वाचावं, विचार करावा, उन्नत व्हावं, यासाठी तुम्ही सतत प्रयत्नशील असता. 'समाजस्वास्थ्य' नाटकाच्या वेळेला तुम्ही अख्खे र.धों. कर्व्यांचे खंड नटांना घेऊन वाचले होते. प्रॉडक्शनच्या खर्चातून र.धों.च्या

लेखांच्या पुस्तकाची प्रत प्रत्येक कलाकाराला स्वतंत्र दिली होती. हा खटाटोप कशासाठी? नटांनी आणि कलाकारांनी वाचलं पाहिजे असं तुम्हाला का वाटतं?

**अतुल पेठे :** नाटकातील लोक वाचन करत नाहीत. आजही करत नाहीत आणि पूर्वीही करत असतील की नाही याविषयी माझ्या मनात शंका आहे. नटाना असं वाटतं की आपण फक्त लमाण आहोत. आपण फक्त शब्द पाठ करायचे आणि रंगमंचावर जाऊन बोलायचे. त्यांचा जो जीवनानुभव असेल, ताकद असेल त्यातून ते शब्द बोलतात. कधी कधी ते चालून जातं तर कधी कधी ते योग्य राहत नाही. नाटकातील वाक्यांच्या मधल्या जागा नटाना शोधायच्या असतात. लेखकाने एक नाटक लिहिलेलं असतं आणि लेखकाने न लिहिलेलं नाटक आपल्याला शोधायचं असतं. समोर लिहिलेले शब्द आणि त्याच्या खालचे अर्थ शोधायची ताकद वाचनातूनच होऊ शकते. याचा अनुभव मी डॉक्टर श्रीराम लागू या महान नटाकडून अनेकदा घेतला. डॉक्टर लागूंसोबत मी 'प्रेमाची गोष्ट' नाटक करत होतो. त्यात आधुनिकोत्तर कालखंड असा शब्द होता. तर डॉक्टरांनी post modernism वरील एक पुस्तकच वाचून काढलं. Post modern असा शब्द हव्या त्या ताकदीनं उच्चारण्यासाठी त्याचा पूर्ण अर्थ माहीत असणं गरजेचं आहे त्यांचं म्हणणं होतं. हॅम्लेट नाटक नुसतं पाठ करून करून नाही म्हणता येणार. तुम्हाला त्यावेळची डेन्मार्क सिटी म्हणजे काय होती, तिथलं राजकारण, समाजकारण, अर्थकारण काय होतं, त्यावेळची समाजव्यवस्था काय होती, शोषणाची पद्धत काय होती, त्यावेळचे अमीर-उमराव असणं म्हणजे काय, राज्यव्यवस्था म्हणजे काय हे सगळं माहीत असेल तर हॅम्लेट करायला आणि त्यातले शब्द उच्चारायला मानसिक आणि बौद्धिक पातळीवर ताकद मिळते असा माझा आजपर्यंतचा स्पष्ट अनुभव आहे. 'समाजस्वास्थ'चा उल्लेख तू केलास. 'समाजस्वास्थ्य'सारखं नाटक करताना नुसतेच शब्द म्हटले तर मजा नाही. लैंगिक स्वातंत्र्य म्हणजे काय, समाजस्वास्थ्य म्हणजे काय, र.धों. कर्व्यांचे झगडे नेमके कसले होते हे त्या नटाला काही किमान पातळीवर माहीत असेल तर ते नाटक उलगडायला मदत होते. त्या नाटकातील शब्दांना काही ताकद येते. अन्यथा शब्द पोकळ होतात. शब्द हे मृत असतात. जिवंत माणसं शब्दांना जिवंत करत असतात. शब्दांच्या उच्चारांना तुमच्या आकलनाचा आणि बौद्धिकतेचा स्तर मिळाला तर ते जिवंत होतात. असे प्रयत्न मराठी नाटकामध्ये आधीही केले गेले आहेत. परंतु ते अधिक ठामपणानं करण्याची गरज आहे. सर्वसामान्य माणसं आणि नट फार वाचतात असं मला वाटत नाही. आजही दुर्दैवी परिस्थिती अशी आहे की एक हजारची प्रत खपायला दहा दहा वर्षं लागतात. कोणत्याही प्रकाशकाकडे तुम्ही आज गेलात तर त्यांचा व्यवसाय हा पाककृती आणि वजन कमी-जास्त करण्याच्या टिप्स देणाऱ्या पुस्तकांवर अवलंबून असतो. पु.ल. देशपांडेंसारखा लोकप्रिय लेखक असला तरी १०-१२ आवृत्यांच्या वर खप होत नाही. महात्मा फुले म्हणायचे की नित्यदिनी काहीतरी वाचत जा.



आपला समाज चांगला वाचक आहे असं मला बिलकूल वाटत नाही. नट/कलाकार त्याला अपवाद असणं शक्य नाही.

**कृतार्थ :** अनेकदा नट/कलावंत म्हणतात की आम्हाला वाचनाची गरज नाही किंवा त्यामुळे काही अडत नाही. त्याऐवजी आम्ही उत्कृष्ट सिनेमे बघतो. तर या अनुषंगाने मला विचारायचं आहे की उत्कृष्ट सिनेमा बघणे किंवा उत्कृष्ट संगीत ऐकणे या तुलनेत वाचनाचं वेगळेपण आणि वैशिष्ट्य काय?

**अतुल पेठे :** अभिनयाच्या संदर्भात आपण वाचन असं म्हणतो तेव्हा त्याचे दोन अर्थ होतात. शब्दवाचन आणि अर्थवाचन. वाचलेल्या शब्दाच्या अर्थच्छटा माझ्या मानवर बिंबत जातात. आता मी 'क्लोज एन्काउंटर' नावाचं पुरुषोत्तम बेर्डे यांचं पुस्तक वाचलं. कामाठीपुऱ्यातील माणसांची व्यक्तिचित्रणं त्यात त्यांनी केली आहेत. यापूर्वी व्यक्तिचित्रण पु.ल. देशपांड्यांनीही आणि इतर अनेकांनी केली आहेत. पण अनेकदा ती काल्पनिक आणि चटकदार असतात. 'क्लोज एन्काउंटर'मध्ये मात्र वास्तवतील माणसांची चित्रण आहेत. या पुस्तकामुळे कामाठीपुऱ्याचा एक उभाआडवा छेद माझ्यासमोर उभा राहिला. मी एक माझं माझं मध्यमवर्गीय जीवन जगतो. ते मला प्रत्येक वेळेला फोडायचं असतं. ते फोडलं जाण्याची शक्यता फक्त आणि फक्त वाचनातून होते. मी जेव्हा नामदेव ढसाळ वाचतो, अरुण कोलटकर वाचतो, नारायण सुर्वे वाचतो, श्याम मनोहर वाचतो, भालचंद्र नेमाडे वाचतो तेव्हा तेव्हा या सगळ्यांनी माझ्या आधीच्या चौकटी मोडलेल्या असतात. हळूहळू वाचन वाढवत नेलं पाहिजे. वाचनाच्या खोल तत्त्वज्ञानामक चिंतनामध्ये उतरलं पाहिजे. त्यानं जगण्याचा स्तर बदलतो. तुम्ही जास्त अंतर्मुख होता. विचारी आणि विवेकी होता. जगण्याची खोली आणि विस्तार उमगतो. Crime and punishment सारखी कादंबरी असेल. त्यात जगण्याला विचारलेले मूलभूत अस्तित्वविषयक प्रश्न आहेत. त्या आवाक्यानं तुम्ही हबकून जाता. आपणच आपल्या जगण्याकडे आणि प्रश्नांकडे वेगळ्या पातळीवरून बघायला लागतो. हा मला वाचनाचा खोलवर झालेला परिणाम वाटतो. वाचन ही मी

ॲक्टिव्ह क्रिया समजतो. तिथे माझा सहभाग असतो. माझ्यात आणि लेखकात दुसरा कोणी येत नाही. लेखकांनी लिहिलेली कादंबरी वाचता वाचता तुम्ही तुमची कादंबरी रचत जाता. सिनेमा पॅसिव्ह असतो. तिथे मी ढवळाढवळ करू शकत नाही. सिनेमाचे वेगवेगळे अर्थ मला लागतील, पण ते इतके abstract असत नाहीत. वाचनात अमूर्ततेच्या पातळीवर तुम्हाला तुमचे अर्थ लावायला लागता. ही मजा नाटक किंवा सिनेमात येत नाही. तिथे सर्व काही पक्कं केलेलं असतं. तर अशी अमूर्ततेला भिडण्याची प्रक्रिया जी वाचनात आहे ती मला इतर माध्यमात अभावानंच आढळते. सिनेमा मला नक्कीच enrich करतो, पण तिथे दिग्दर्शक दृश्यमाध्यमातून मला निर्देश करत असतो की आता हे बघा. वाचताना मात्र मी माझं चित्र उभं करू शकतो. निळं आकाश म्हटलं की वाचताना मी माझं निळं आकाश मनावर रंगावतो तर सिनेमा बघताना दिग्दर्शक मला त्याचं निळं आकाश दाखवत असतो. हा महत्त्वाचा फरक आहे.

**कृतार्थ :** कलावंतांच्या वाचनाच्या बाबतीतील वास्तव तुम्ही वर मांडलं. सामान्य माणसं आणि कलावंत फार काही वाचत नाहीत असं तुम्ही म्हणालात. पूर्वी मन रमवण्यासाठी वाचन हा एकमेव पर्याय होता. नंतर दूरदर्शन, कॉम्प्युटर, मोबाइल, सिनेमे, वेबसीरिज असे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. तर वाचनाच्या बाबतीत सामान्य माणसाकडून आणि नव्या पिढीतील कलावंतांकडून तुमच्या अपेक्षा काय आहेत?

**अतुल पेठे :** हा जो नवा कालखंड आहे आणि डिजिटल क्रांती होत आहे त्याच्या विरोधात मी नाही. सोशल मीडिया हे माध्यम आपण समजून घेतलं पाहिजे. ज्यांना लिहायला संधी नव्हती ते आज तिथे लिहीत आहेत. त्यात भरड साहित्य असणार. काही बरं लिहिणारेही अभावानं का होईना पण आहेत. ते माध्यम अधिक चांगल्या पद्धतीनं कसं वापरता येईल हा विचार लोकांनी करायला हवा.

मला आणि इतरांना चांगलं जीवन जगता आलं पाहिजे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. चांगल्या जीवनाच्या प्रत्येकाच्या संकल्पना कश्या वाढतील हाही एक प्रश्न आहे. ज्याच्यामुळे माझ्या बौद्धिक आकलनामध्येच फरक पडेल ते चांगलं. शांततेचं महत्त्व त्याला कळलं पाहिजे. सूर लागण्यातली गंमत आणि महत्त्व त्याला कळलं पाहिजे. त्यानं संगीत ऐकलं पाहिजे. सर्व ज्ञानेंद्रियांच्या पातळीवर त्यानं समृद्ध झालं पाहिजे. सध्या माणसांमध्ये अतिशय अस्वस्थता दिसून येते आहे. मानसिक अस्वास्थ्याचं प्रमाण वाढत आहे. स्वत:विषयी आणि जगाविषयीचे भ्रम तयार होत आहेत. संवादात अडचणी निर्माण होत आहेत. या सगळ्यात वाचनामुळे मला माझ्या आयुष्याचं नेमकेपण – एखाद्या सूक्ष्मदर्शक यंत्राखाली एखादी गोष्ट ठेवल्यानंतर फोकस जशी दिसते तसं – जाणून घ्यायचं असेल तर वाचन हेच ते सूक्ष्मदर्शक यंत्र आहे. मी माझं मन वाचनाच्या द्वारे तपासत जातो. इतर लाटा येत-जात राहतील पण वाचंनासारख्या मूलभूत गोष्टीला पर्याय येईल असे मला वाटतं नाही. येणाऱ्या काळच्या पिढीतील मुलांनी वेगवेगळं वाचण्यासाठी तयार राहावं आणि वाचनाला जास्त चांगले दिवस यावेत असं मला वाटतं. आणि ते येतील. काळाचे टप्पे असतात. कदाचित अनेक वर्षं काही होणार नाही. परंतु लोकांच्या मनात वाचनाचं बीज रुजलेलं आहे. याबाबत मी अतिशय आशावादी आहे.

**कृतार्थ :** अतुलसर, अतिशय मनापासून धन्यवाद. आता शेवटचा प्रश्न. तुम्ही सध्या काय वाचत आहात? गेल्या काही काळात तुम्ही वाचलेल्या चांगल्या पुस्तकांची नावं तुम्ही आम्हाला सांगितली तर माझ्यासाठी आणि आमच्या वाचकांनाही पुढील काही महिन्यांसाठी सकस बौद्धिक खाद्य मिळेल.

**अतुल पेठे :** माझं वाचन अनेकदा काही एक दिशा घेऊन म्हणतो तसं होत नाही. मी नुकतंच एक नोथोंब नावाच्या लेखिकेनं लिहिलेलं 'ह्युमन राईट्स' नावाचं बेल्जियम नाटक वाचलं. या कोरोनाच्या चारसहा महिन्यांत मी ग्रॅबिएल गार्सिया मार्केसनं लिहिलेली त्याची autobiography आहे– 'Living to tell the tale' नावाची – ती वाचली. ब्लाइंडनेस नावाची जोस सारामागो यांची भा.ल. भोळे यांनी अनुवादित केलेली कादंबरी वाचली. 'माझा प्रवास' हे पुस्तक आहे गोडसे भटजींचं. त्यावर मी काही काम करत आहे. त्या निमित्तानं मी काही साहित्य वाचलं. मुख्य म्हणजे Crime and punishment पुन्हा एकदा वाचली. आधी वाचली तेव्हा ती मला खूप जड गेली होती म्हणून पुन्हा वाचली. मराठी तर मी खूप वाचतो. कविता वाचतच असतो. प्रेमचंदच्या काही सर्वोत्कृष्ट कथा आहेत त्या वाचल्या. Do and Die नावाचं पुस्तक वाचलं. मार्लन ब्रँडो या नटाची autobiography मी वाचून काढली. आता मी महाराष्ट्र दर्शन नावाचं पुस्तक वाचत आहे. स्टोरीटेल या ॲपसाठी 'हिंदू' कादंबरी वाचली. त्या निमित्तानं हिंदूविषयक भरपूर लिखाण आणि टीका, वाचून काढलं. अगदी ताजं सांगायचं तर Past forward नावाचं गौरी रामनारायन यांनी लिहिलेलं आणि त्यावर उल्का राऊत यांनी लिहिलेलं 'ऋतुशैशव' हे पुस्तक वाचलं आणि त्यावर एक प्रयोगही केला.

**कृतार्थ :** पुन्हा एकदा मनापासून धन्यवाद. ही यादी खूपच उत्साहवर्धक आहे. आम्हीसुद्धा ही पुस्तकं वाचू. तुमच्या पुढच्या वाचनप्रवासासाठी तुम्हाला खूप साऱ्या सदिच्छा!

**अतुल पेठे :** धन्यवाद. तुलाही सदिच्छा!

(प्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक अतुल पेठे यांची कृतार्थ शेवगावकर या तरुण नाट्यकलावंतानं घेतलेली मुलाखत)

**– कृतार्थ शेवगावकर**
भ्रमणध्वनी : ९८२३९७४४००
shevgaonkarkrutarth@gmail.com

**अतुल पेठे**
भ्रमणध्वनी : ९४२२३१९७१७



**माधव राजगुरू**

# शालेय वाचनसंस्कृती टिकवण्याचे आव्हान

**माणसाने** स्वत:च्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी भाषेची निर्मिती केली. प्रथम मौखिक आणि कालांतराने लिखित भाषा अस्तित्वात आली. कालौघात माणसाला सृष्टीतील अनेक अज्ञात गोष्टींची माहिती आणि ज्ञानप्राप्ती होत गेली आणि त्याच्या जीवनातही बदल होत राहिले. पुढे लिपीचा शोध लागला आणि सृष्टीतल्या बदलाच्या आणि स्वत:ला आलेल्या अनुभूतीच्या नोंदी ग्रंथरूपात ग्रथित करणे शक्य झाले. अशा रीतीने लिखित स्वरूपातील भाषेत लेखनव्यवहार सुरू झाला आणि त्याचवेळी वाचनसंस्कृतीचा उगम झाला. जी भाषा आपण बोलतो, लिहितो, वाचतो, ज्या भाषेतून दैनंदिन सामान्य व्यवहार करतो, त्या भाषेबद्दल अभिमान बाळगणे रास्तच आहे; पण त्याचबरोबर ती आपली भाषा म्हणून जिंकत राहावी, यासाठी प्रयत्न करणे, हेही आपले कर्तव्य आहे; कारण ज्या वाचनसंस्कृतीबद्दल आपण बोलतो, त्याचा संबंध सरळ सरळ भाषेच्या अस्तित्वाशी असल्यामुळे भाषा जिवंत राहण्यासाठी व्यावहारिक पातळीवर मूलभूत उपाय योजण्याची गरज आहे.

तेव्हापासून भाषेच्या अस्तित्वाची लढाई सुरू झाली. ही राजवट आपले पाय रोवत असतानाच आपल्या देशावर कैकदा अनेक परकीय आक्रमणे झाली. सत्ताधिशांनी स्थानिक जनतेवर त्यांची भाषा लादण्याचा प्रयत्न झाला, त्या कारणाने आपल्या भाषेची अवस्था अधिकच बिकट झाली. त्यावेळी तत्कालीन विद्वान पंडितांनी, विचारवंतांनी मराठी भाषेची आस्था आणि अस्मिता जागृत करून मराठी भाषेचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला. मराठी भाषा जगली पाहिजे, यासाठी आजवर अनेक प्रकारच्या उपाययोजना केल्या गेल्या. वाचनसंस्कृती हा त्या उपायांचाच एक भाग आहे. थोडक्यात वाचनसंस्कृतीच्या मुळाशी भाषासंवर्धनाचा मुद्दा आहे, त्यामुळे याच अंगाने वाचनसंस्कृतीचा विचार पुढे नेला पाहिजे.

वाचनसंस्कृतीची रुजवण आणि संवर्धन करण्याचे कार्य शाळेपासूनच सुरू केले पाहिजे. शालेय वयात मुलांच्या मन:पटलावर कोरले गेलेले संस्कार हे त्यांचे भावजीवन समृद्ध तर करतात, शिवाय आयुष्यभर त्यांची साथ-संगत करत असतात. बाल व किशोरवयात त्यांच्या मनात मराठी भाषेची गोडी निर्माण झाली, तर त्यांना वाचनाकडे वळवणे आणि वाचनप्रवृत्त करणे सोपे जाते.

शालेय स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य प्रभावित करणारे महत्त्वाचे चार घटक आहेत. शाळा, शिक्षणाचे माध्यम, शिक्षक आणि पालक हे ते चार घटक होत. हे चारही घटक वाचनसंस्कृतीचे मुख्य आधारस्तंभ आहेत; पण सध्याच्या शिक्षणव्यवस्थेत आणि तंत्रज्ञानयुगात हेच आधारस्तंभ वाचनसंस्कृतीतील अडथळे बनून उभे ठाकले आहेत. वाचनसंस्कृती बर्हिष्णू होण्यासाठी हे अडथळे कसे दूर करता येतील, याबाबतचे विवेचन आणि माझी व्यक्तिगत निरीक्षणे लेखात दिली आहेत.

**शाळा : वाचनसंस्कृतीचा पाया**

मूल शाळेत गेल्यानंतर लिहायला, वाचायला शिकत असते. येथेच वाचनसंस्कृतीच्या पायाभरणीला सुरुवात होते, म्हणून शाळेतील वातावरण हे वाचनसंस्कृतीला पोषक असले पाहिजे. शाळेचे प्रवेशद्वार स्वागतशील असावे. शाळा आपल्याला बोलावते आहे, असे मुलांना आतून वाटले पाहिजे. शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व शिक्षक शाळेच्या प्रवेशद्वारात उभे राहून मुलांचे स्वागत करत आहेत, असे चित्र ज्या दिवशी दिसेल, तो दिवस मुलांच्या भाग्याचा

असेल. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते शाळेतील प्रत्येक भिंत बोलकी आणि संवादी असावी याचा अर्थ भिंतींवर केवळ सुविचार, सुभाषिते, श्लोक, सुवचने यांचा भडिमार नको. भिंतींवरचा मजकूर विद्यार्थ्यांना सहज समजणारा असावा. त्यात उपदेशाचा लवलेशही असता कामा नये. मजकूर वाचून त्यांच्या मनात इष्ट प्रवृत्ती आणि उदात्त भावनांचा परिपोष व्हावा. बऱ्याच शाळांमध्ये भिंतीवरचा मजकूर कायमस्वरूपी असतो. तो पुसला जात नाही किंवा तेथे नवीन मजकूर लिहिलाही जात नाही. मुले तोच तो मजकूर वाचून (पाहून) कंटाळतात. खरे तर नवीन मजकूर वाचायला विद्यार्थी उत्सुक असतात; म्हणून प्रत्येक आठवड्याला त्यांना नवीन मजकूर भिंतीवर वाचायला मिळेल, अशी योजना केली जावी. वाचलेल्या मजकुरावर आधारित प्रश्न विचारावेत, स्पर्धा घ्यावी. यातून मुलांना नवनवीन गोष्टी शिकायला मिळतील. त्यांच्या ज्ञानात, शब्दसंपत्तीत भर पडेल. विशेष म्हणजे नकळत मुलांमध्ये वाचनाची आवड जोपासली जाऊन वाचनसंस्कृतीची रुजवण होईल.

### शिक्षणाचे माध्यम

हल्ली राज्यात इंग्रजी माध्यमाचे स्तोम वाढले आहे. तोच वाचनसंस्कृतीतील मोठा अडसर ठरत आहे. इंग्रजी माध्यमामुळे होणाऱ्या नुकसानीचा विचार करून त्यावर काम करण्याची गरज आहे. विद्यार्थी हा शिक्षणाच्या केंद्रस्थानी असतो. शिक्षणाचे माध्यम कोणतेही असो त्याचे दूरगामी परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचा आग्रह मराठी कुटुंबातील पाल्यासाठी अनाठायी आणि नुकसानदायी आहे, याची जाणीव मराठी पालकांना करून दिली पाहिजे. आपली विचारप्रक्रिया मातृभाषेतून चालते, त्यामुळे इंग्रजी माध्यामातील शिक्षण आकलनाच्या पातळीवर अडचणीचे ठरते. मातृभाषेतून शिक्षण घेणे नैसर्गिक आणि अधिक सोपे जाते. इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यमात शिकणे या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. इंग्रजी येण्यासाठी किंवा शिकण्यासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे चुकीचे आहे. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकून चांगले इंग्रजी येऊ शकते, याची असंख्य उदाहरणे समाजात आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षणात इंग्रजीला महत्त्व दिले जाते. त्या ठिकाणी मराठी भाषा विषय शिकवण्याची सक्ती असली, तरी वातावरण इंग्रजीमय असल्यामुळे मराठी मातृभाषा असूनही तोही विषय कच्चा राहतो. मराठीऐवजी इंग्रजी संस्कृती अंगवळणी पडू लागते, त्यामुळे मराठी मुले मराठीपासून दुरावली जातात. अशा परिस्थितीत मराठी भाषेचे संवर्धन आणि मराठी वाचनसंस्कृतीची रुजवण या दोन्ही गोष्टी दुरापास्त होतात. यावर उपाय एकच, मराठी माध्यम निवडणे आणि मराठीबरोबर इंग्रजी शिकणे, तरच वाचनसंस्कृती टिकेल.

### शिक्षक वाचणारा असावा

आजकालचे शिक्षक वाचत नाहीत. पूर्ण तयारी करून वर्गात जात नाहीत. शिक्षकांचा बराच काळ मोबाइल, फेसबुक, व्हाट्सअ‍ॅप यातच जातो. त्यात भर म्हणून त्यांच्यावर अशैक्षणिक कामे लादली जातात. या सगळ्याचा परिणाम म्हणून शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे. जुन्या काळाशी तुलना करता आजच्या शिक्षकांमधला ध्येयवाद हरवून गेला आहे; अशाप्रकारची ओरड दिसत असली, तरी हे सर्वच शिक्षकांच्या बाबतीत लागू होत नाही. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अनेक शिक्षक तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता, तंत्रस्नेही बनून त्याचा अध्यापनात खुबीने प्रभावी वापर करत आहेत. म्हणून म्हणावेसे वाटते, की शिक्षक जे करू शकतात, ते अन्य कोणीही करू शकत नाही.

विद्यार्थ्यांमध्ये उत्तम अभिरुची निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षक करत असतात. शिक्षकांच्या वागण्या-बोलण्याचा, दिसण्याचा, त्यांच्या सवयींचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर प्रभाव पडत असते. चांगल्या-वाईटाची जाण नसलेल्या वयातील मुले शिक्षकांचे अनुसरण करतात; त्यामुळे शिक्षक ज्ञानलोभी, ग्रंथप्रेमी असेल तर शिक्षकातील सद्गुण विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित व्हायला वेळ लागत नाही. नुसते वाचा म्हटल्याने विद्यार्थी वाचत नाहीत. विद्यार्थ्यांमधील नैसर्गिक जिज्ञासावृत्ती चाळवली पाहिजे. हे काम उपक्रमशील शिक्षक करू शकतात. शिक्षकांनी अनेक ग्रंथ वाचावेत, वाचलेल्या ग्रंथाचे वर्गात परिशीलन करावे. एखाद्या ग्रंथातील छोट्याशा परिच्छेदाचे अभिवाचन करून दाखवावे. यामुळे मुलांना मूळ ग्रंथ वाचण्याची इच्छा निर्माण होते. शिक्षकाची अशी एखादी कृतीही विद्यार्थ्यांत वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुरेशी ठरू शकते. या संदर्भातील माझा एक अनुभव सांगण्यासारखा आहे. 'उराशी कवटाळलेली स्वप्नेच अशी भंगायला लागली, तर जीवन जगण्यात काय हशील, असा विचार न करता, भंगलेल्या स्वप्नांच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पावलांनी पुन्हा नव्या स्वप्नामागे धावणे आणि ती साध्य करणे, यातच जीवनाची इतिकर्तव्यता आहे.' वि. स. खांडेकरांच्या एका कादंबरीतील हे वाक्य माझ्या शिक्षकांनी अशा पद्धतीने ऐकवलं, की ते एकच वाक्य ऐकून मी नवव्या इयत्तेत असताना खांडेकरांच्या अमृतवेल, ययाती या कादंबऱ्या पूर्ण वाचून काढल्या आणि या दोन्ही कादंबऱ्यांनी माझ्या वाचनाची भूक वाढवली, ती वाढतच गेली. हे काम शिक्षकच करू शकतात.

### मराठी पालक आणि त्यांचे मराठी प्रेम

आजचे पालक शिक्षणाच्या बाबतीत अधिकच जागरूक झाले आहेत. पालकांचा हा जागरूकपणाच त्यांना अडचणीचा ठरत आहे. आपल्या पाल्याचा कल लक्षात न घेता त्याला कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे, कोणत्या माध्यमाच्या शाळेत घालावे या संभ्रमात पालक सापडले आहेत. अंधानुकरण करत आजचे बहुसंख्य पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. काही जण सेमी इंग्रजीचा पर्याय निवडतात. आपली मुले इंग्रजी माध्यमात शिकली, तर जगाच्या स्पर्धेत टिकतील, चांगल्या नोकऱ्या मिळतील, अशा अपेक्षेने पालक अशा शिक्षणासाठी अमाप पैसा खर्च करतात. अनेक मुले पालकांच्या अपेक्षांना खरी

उतरतात. त्यांचे जीवनमान सुधारते. खरे तर जी मुले मुळातच हुशार असतात, ती कोणत्याही माध्यमात शिकली, तरी प्रगती करतातच. इंग्रजी माध्यमात शिकूनही ज्यांना अपेक्षित यश मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांची अवस्था बिकट होते. इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांत हे विद्यार्थी मागेच राहतात. यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मातृभाषा मराठीकडे अक्षम्य दुर्लक्ष होते. यामुळे मराठी पालकांची शिक्षणाच्या माध्यमाबाबतचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या मनातील मराठी भाषेविषयीची ही अनास्था संपवायची असेल, तर मराठी भाषा उदरनिर्वाहाची सक्षम भाषा म्हणून पुढे आली पाहिजे. आज ही भाषा रोजीरोटी मिळवून देण्याचे साधन बनली नसली, तरी पाल्यांना इंग्रजी माध्यमात शिक्षण देणाऱ्या पालकांनी आपल्या घरातील वातावरण मराठीमय ठेवले पाहिजे. मोबाइल, टीव्हीपासून स्वत:ला आणि पाल्याला अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांना वाचनप्रवृत्त करण्यासाठी स्वत: वाचले पाहिजे. ललित साहित्य व विविध विषयांची मासिके, मराठी वृत्तपत्रे, पुस्तके घरात नियमितपणे आणली व हाताळली पाहिजेत. वाचनासाठी असे पोषक वातावरण ठेवल्यास घरात वाचनसंस्कृती रुजते, नांदते. कोणती पुस्तके वाचावीत, हे मुलांना माहीत नसते, त्यामुळे पालकांनी आधी ग्रंथवाचन करावे आणि उत्तम ग्रंथ निवडून मुलांना वाचायला द्यावेत. एक ठरावीक वेळ निश्चित करून वाचलेल्या ग्रंथांवर भाष्य करावे. त्यातील विचार, घटना, प्रसंग यावर गप्पा-गोष्टी कराव्या. याचा उपयोग मुलांना निश्चितच वाचनाची गोडी लागण्यासाठी होते.

### ग्रंथपाल वाचनसंस्कृतीचा कणा

मला ग्रंथालये देवालयांसारखीच वाटतात, पण त्या दोन्हीत बराच फरक आहे. ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची मंदिरे, तर ग्रंथपाल हे त्या मंदिराचे पुजारी असतात. भाविक मंदिरात देव म्हणून शेंदूर फासलेल्या मूर्तीचे दर्शन घेऊन जातात. तसे विद्यार्थी ग्रंथमंदिरात केवळ ग्रंथदर्शनास येत नाहीत. ग्रंथालयात मांडलेला प्रत्येक ग्रंथ वाचून त्यातील ज्ञानकण वेचणे व स्वत: ज्ञानसमृद्ध होणे, हा त्यामागचा हेतू असतो. कोणता ग्रंथ किती मोलाचा आहे, त्या ग्रंथात लेखकाने काय लिहून ठेवले आहे, याचा परिचय ग्रंथपाल करून देतात, तेव्हा विद्यार्थ्यांना त्या ग्रंथाचे अर्धे दर्शन होते. त्या ग्रंथाचे प्रत्यक्ष वाचन करून त्यातील आशयाची अनुभूती घेतात, तेव्हा त्यांना त्या ग्रंथाचे 'पूर्णदर्शन' होते.

विद्यार्थ्यांचे अखंड ग्रंथवाचन हा 'ज्ञानयज्ञ' असतो. हा 'ज्ञानयज्ञ' अखंडपणे चालू राहील याची खबरदारी ग्रंथपालांनी घेतली पाहिजे. ग्रंथांची काळजी घेणे, त्यांचे व्यवस्थापन करणे, हे एवढेच ग्रंथपालांचे काम नसते. याहून खूप मोलाची जबाबदारी त्यांच्यावर असते. भाविकाची पावले श्रद्धेने आपसूक देवालयाकडे वळतात, तेवढ्याच श्रद्धेने विद्यार्थी ग्रंथालयाकडे आकृष्ट व्हावेत, अशी योजना ग्रंथपालांनी केली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथरुची निर्माण होण्यासाठी त्यांना वाचनप्रवृत्त करण्यासाठी कल्पकतेने विविध उपक्रमांची जोड दिली पाहिजे. उदाहरणार्थ, ग्रंथवाचनस्पर्धा, ग्रंथपरीक्षणस्पर्धा, कोणत्या दालनात कोणते ग्रंथ आहेत, याची माहिती देऊन विशिष्ट ग्रंथ विद्यार्थ्यांना आणायला सांगणे, ग्रंथ लवकर शोधून आणणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देणे. अशाप्रकारे विद्यार्थ्यांना ग्रंथांचा लळा लागेल.

मंदिरातील मूर्ती जागेवर स्थिर असते, तरीही गाभाऱ्याला कुलूप लावून देवाला बंदिस्त ठेवले जाते, तसे ग्रंथ कपाटात कुलूपबंद अवस्थेत ठेवता येत नाहीत. हवा तो ग्रंथ, हवा तेव्हा आपल्याला कोठेही नेता येतो. कोणता ग्रंथ घ्यावा, कोणता ग्रंथ वाचावा. याची माहिती विद्यार्थ्यांना नसते. अशावेळी ग्रंथपालांची मदत घेते येते. त्यासाठी ग्रंथपाल 'उत्तम वाचक' असावा लागतो. कोणता ग्रंथ कोणत्या कप्प्यात आहे, येथपासून ते कोणत्या ग्रंथाचा विषय काय आहे, कोणत्या ग्रंथात काय लिहिले आहे, ग्रंथाचा लेखक कोण आहे, मुलांनी कोणता ग्रंथ वाचावा, याचे नेमके मार्गदर्शन ग्रंथपालांनी करावे. यासाठी प्रत्येक शाळेत ग्रंथालय असावे, ग्रंथालयात मुलांसाठी विशेष दालन असावे. विशेष म्हणजे ते मुलांसाठी सदैव खुले असावे.

### स्टोरीटेल – ऑडिओबुक्स आणि वाचनसंस्कृती

गोष्टी ऐकणे आणि ऐकवणे ही आपली प्राचीन परंपरा आहे. जुन्या काळी घरातल्या घरात गोष्टींच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या नीतिशिक्षणाप्रमाणेच आजच्या काळातील सार्वत्रिक शिक्षणातही नीतिशिक्षणाचा वा मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव केलेला आढळतो. पूर्वी मौखिक स्वरूपातील गोष्टी लिपीचा शोध लागल्यानंतर छापील स्वरूपात दिसू लागल्या. ग्रंथरूपात उपलब्ध झालेल्या गोष्टींमुळे वाचनाला विशेष महत्त्व आले. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात छापील ग्रंथाला स्टोरीटेल-ऑडिओबुक्स व अन्य पर्याय पुढे आले. याचा ग्रंथवाचनावर परिणाम झालेला दिसतो. ग्रंथांमध्ये छापलेला मजकूर डोळ्यांनी न वाचता डोळे बंद करून केवळ कानांनी ऐकण्याचा हा स्टोरीटेल-ऑडिओ बुक्सचा प्रकार वाचनसंस्कृतीला तारणार का? या दृष्टीने याचा विचार करावा लागेल.

मराठीमध्ये 'कथाकथन', 'अभिवाचन' हे दोन प्रकार रूढ आहेत. हे दोन्ही प्रकार वाचनसंस्कृतीला पूरक ठरतात. कथाकथन वा अभिवाचन करणाऱ्या व्यक्तीस आपण प्रत्यक्ष पाहत असतो. कथेचा वा अभिवाचन होणाऱ्या साहित्यकृतीचा आशय समोरील श्रोत्यांच्या लक्षात येतो. आशयाबरोबर लेखकाची लेखन व भाषाशैली याचाही परिचय होतो. कथन, अभिवाचन करणाऱ्यांच्या आवाजातील चढउतार, हावभाव यामुळे संबंधित साहित्यकृतीतील काही व्यक्तिरेखांचा प्रभाव श्रोत्यांवर पडतो, त्यामुळे श्रोता मूळ कथा-कादंबरीच्या वाचनाकडे वळतो. एका अर्थाने कथाकथन वा अभिवाचनाचा वाचनसंस्कृतीच्या संवर्धनासाठी उपयोग होतो. स्टोरीटेल-ऑडिओ बुक्स यामधून केवळ ऐकण्याची सोय असते. कथा-कादंबरीचा विषय कोणताही असो काही काळानंतर ऐकणे कंटाळवाणे होऊ शकते. यातून मूळ साहित्यकृती वाचण्याचा मोह

होईलच असे नाही, त्यामुळे वाचनसंस्कृतीच्या वाढीसाठी हा प्रकार उपयुक्त वाटत नाही.

आधुनिक तंत्रज्ञानाचा आविष्कार म्हणून चित्रपट, संगणक, भ्रमणध्वनी, फेसबुक, व्हॉट्सॲप, यूट्यूब, इंटरनेट यासारख्या गोष्टी अस्तित्वात आल्या. या सर्वांचा परिणाम म्हणून 'ग्रंथवाचन' कमी झाले. विद्यार्थी, शिक्षक, पालक सर्वच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहजालात अडकलेले दिसतात. तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता तंत्रस्नेही बनून या तंत्रज्ञानाचा गरजेपुरता प्रभावी वापर कसा करता येईल, याचा विचार करण्याची वेळ आली. शालेय स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या परिचयाबरोबर त्याची उपयुक्तता आणि महत्त्व पटवून देताना हे विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या अधीन होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल आणि आधुनिक तंत्रज्ञान वाचनसंस्कृतीच्या कामी कसे उपयोगात आणता येईल, याचा गांभीर्याने विचार करावा लागेल.

**– माधव राजगुरू**
भ्रमणध्वनी ९४२३५६१०८४
madhavrajguru@gmail.com

॥ग्रंथाली॥

# यशपुष्प

**डॉ. आशुतोष रारावीकर**





**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**

**यशस्वी जीवनासाठी विचारपुष्पांचा खजिना**

# छपाई ते लेखणी

**यशवंत मराठे**




**यशस्वी उद्योजगाची लेखनातली चौफेर**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**



**प्रा. हेमंत खडके**

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वाचन : एक प्रश्नचिन्ह!

**विषयाच्या** शीर्षकात एक गोष्ट गृहीत धरलेली दिसते ती म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थी एवढी पुस्तके वाचतात, की त्यांची एक वाचनसंस्कृती निर्माण झाली आहे! खरे म्हणजे वाचनसंस्कृती असा भारदस्त शब्द वापरावा, एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पुस्तके वाचत नाहीत. म्हणजे आधीच्या पिढीतील खूप वाचत होती आणि आताच्या पिढीत ते प्रमाण कमी झाले असेही नाही. नाही म्हणायला विद्यापीठाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता विद्यार्थ्यांनी 'गाईडवाचनसंस्कृती' मात्र बरीच विकसित केली आहे.' 'परीक्षार्थींच्या कल्याणा गाईडलेखकांच्या विभूती' अशा दयाबुद्धीने जोवर विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध करून देणारे आहेत तोवर त्यांना परीक्षेसाठीही पुस्तके वाचायची गरज नाही. (गाईडलाही माझा विरोध नाही. त्यांचा दर्जा चांगल्या पुस्तकांच्या खालोखाल असावा, म्हणजे झाले. पण तसे चित्र अपवादानेच दिसते.)

या सर्वसाधारण चित्राला अपवाद आहेत. मात्र ते अपवादच! आवडीने वाचन करणारे काही तुरळक मोजके विद्यार्थी आहेत. ते वेगवेगळ्या शाखांचे आहेत. त्यांच्यात कलाशाखेचे विद्यार्थी कमीच. त्यांना वाचनाची आवड फार आधीपासून म्हणजे बहुधा बालपणापासूनच लागलेली असते. त्यांच्या वाचनात विविधता असते. त्यांचे साहित्याचे व जीवनाचेही आकलन बरे असण्याची शक्यता असते. मात्र हे विद्यार्थी सुट्या बेटांसारखे असतात. त्यातून एक सलग भूप्रदेश निर्माण होऊन त्यावर वाचनसंस्कृती गुण्यागोविंदाने नांदते आहे, असे चित्र दिसत नाही.

प्रथम विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागापासून सुरुवात करू. तिथे मी गेल्या तेवीस वर्षांपासून शिकवतो. मी वाचनाच्या नादापायी दोन-तीन नोकऱ्या सोडून आवडीने मराठीचा शिक्षक झालो. त्यामुळे कोण काय वाचतो किंवा विद्यार्थी काय वाचतात याची मला नेहमीच उत्सुकता लागून असते. नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना माझा पहिला प्रश्न असतो, की तुम्ही आजवर अभ्यासक्रमाबाहेरचे काय वाचले आहे? पूर्ण वर्गातून क्वचित एक-दोन विद्यार्थ्यांनी एखाद-दुसरे पुस्तक वाचलेले असते. बहुतेकांना तर अभ्यासक्रमातील पुस्तकेही सांगता येत नाहीत. बी.ए.चे विषय सांगताना ते मराठी वाङ्मयाला MLT आणि समाजशास्त्राला SOS म्हणतात. वाचलेल्या एखाद-दुसऱ्या पुस्तकात 'श्यामची आई' किंवा 'अग्निपंख' यांचा क्रमांक बराच वर आहे. वाचलेल्या पुस्तकांवर ते फार काही बोलू शकत नाहीत. आवडलेले पुस्तक का आवडले यावर ते फार समाधानकारक उत्तर देऊ शकत नाहीत. दैनिकांच्या वाङ्मयीन पुरवण्या त्यांना माहीत नसतात. नियतकालिके, दिवाळी अंक, मासिके तर फारच दूर! या सर्व दुष्काळी वातावरणात भगवान फाळके किंवा अभिजित इंगळे हे दोन वाचनवेडे विद्यार्थी म्हणजे काळ्याकुट्ट ढगाच्या रूपेरी कडाच!

असे का घडले? हे एकाएकी घडले की ही एक हळूहळू घडत जाणारी प्रक्रिया आहे? कारणे शोधायची तर विषय फार वाढत जाईल. बात निकलेगी तो फिर दूर तलक जायेगी... पण एवढे निश्चित की केवळ विद्यार्थी दोषी नाहीत. कुटुंब, पालक, शिक्षक, समाज, शिक्षणव्यवस्था, संस्थाचालक, शासन, प्रसारमाध्यमे, साहित्यसंस्था असे सर्वच घटक कमी-अधिक प्रमाणात जबाबदार आहेत. स्वतः दिवसभर व्हॉट्सॲपवर असणारे पालक व फेसबुकवर असणारे शिक्षक जेव्हा मुलांना 'वाचाल तर वाचाल' असा चावून चोथा झालेला भंपक उपदेश करतात तेव्हा त्यातला ढोंगीपणा विद्यार्थ्यांच्याही लक्षात येतोच. घरासाठी कोट्यवधी रुपये खर्चून त्यात लाखोंचे फर्निचर भरणाऱ्या पालकांनी आयुष्यात कधी हजार रुपयांची पुस्तके घेतली नसतील किंवा मोठ्ठा पगार घेणारे शिक्षक-प्राध्यापक घरात मराठीचा एखादा शब्दकोशही ठेवत नसतील, तर अशा वातावरणात मुले वाचनाकडे वळतील तरी कशी? शाळेत

आणि महाविद्यालयांमध्ये सर्वत्र गुणांची चढाओढ. त्यामुळे टक्केवारी वाढेल तेवढेच वाचा; अवांतर वाचनात वेळ वाया घालवू नका, असे सांगणारे करियरग्रस्त सर्वत्र वाढले आहेत. अभ्यास, टक्केवारी, स्पर्धा, यश, पॅकेज यांच्या घाण्याला आपण विद्यार्थ्यांना बैलांसारखे जुंपले आहे. त्यातून त्याला तोंड वर काढायला फुरसत मिळत नाही. चांगल्या कंपनीत प्लेसमेंट होऊन चांगले पॅकेज बळकावले की मग झाले आपले जीवन सार्थक! न्हाले आपले उंदीर पिंपात!! आपण मुलांना-विद्यार्थ्यांना तयार करत नाही तर भविष्यकाळात वापरता येतील अशी एटीएम कार्डे तयार करत आहोत. अशा जीवनशैलीत वाचनाचा संबंध येतो तरी कुठे? आणि अशा महाबाजारू वातावरणात वाचनाशिवाय अडते तरी कोणाचे? कॉन्व्हेंट कल्चरमुळे विद्यार्थी इंग्रजीकडे वळले आणि आज ते मराठी वाचत नसले तरी इंग्रजी खूप वाचत आहेत असे तरी चित्र दिसते का? तिथेही अपवाद वगळता बोंबाबोंब!

चर्चा न वाचणाऱ्यांपेक्षा वाचणाऱ्यांवर केंद्रित करू. जे विद्यार्थी वाचतात ते काय वाचतात? कथा-कादंबऱ्या जास्त वाचतात. तुलनेने वैचारिक साहित्य आणि कविता कमी. कविता लिहिणाऱ्यांची संख्या बरीच आहे पण तेसुद्धा कवितेची परंपरा किंवा चांगली कविता समजून घेण्यासाठी फार वाचत नाहीत. कवितेत अर्थ लावण्याची जबाबदारी वाचकांवरही पडते. डोक्याला थोडा ताप द्यावा लागतो. त्या तुलनेत कथा-कादंबऱ्यांचे निवेदक ही वाचकांची जबाबदारी बऱ्याच अंशी सोपी करतात. म्हणजे डोक्याला 'शॉट' लावून घ्यायचे काम नाही, असे तर मानसशास्त्र यामागे नसेल? जे वाचतात त्यातही काही लॉजिक, सूत्र किंवा उद्दिष्ट नाही. जीवन, साहित्य, माणसे, समाज, संस्कृती, समजून घेण्याची खूप खोल जिज्ञासा म्हणून वाचणारे अतिशय कमी. यात थोडा वयाचाही भाग असावा. हाती येईल ते वाचायचे, ही वृत्ती जास्त. अर्थात यामागे आर्थिक कारणेही आहेत. जागतिकीकरणाच्या तांडवात दाखवेगिरीही बरीच वाढलेली दिसते. ती आधीही होती पण तिला फार संधी नव्हती. दिवाणखान्याला मॅचिंग होतील अशा रंगांची पुस्तके द्या, असे म्हणणारे ग्राहक या काळात नसतीलच असे नाही.

स्पर्धापरीक्षांसाठी बसणारे विद्यार्थी वाचतात पण त्यांच्यातील बहुतेकांचा हेतू स्पष्ट असतो.पेपर सोडवण्यासाठी माहितीचे संकलन हा त्यांचा उद्देश एवढा प्रभावी असतो, की पुस्तके जीवन समजवून देतात किंवा आनंद देतात अशा किरकोळ गोष्टींकडे लक्ष द्यायला त्यांना वेळच नसतो! अशा एका वर्गावर मित्राचा आग्रह म्हणून मी एकदा तास घेतला. काही आगळ्या-वेगळ्या, प्रेरणादायी आणि दिशादर्शक पुस्तकांचा त्यांना परिचय करून द्यावा, हा हेतू ठेवून मी बोलू लागलो. पहिल्या दहा मिनिटांत मी त्यांच्या नजरेतल्या अर्थाचा लसावी ( LCM) वाचला. तो असा होता: सर, तुम्ही जी पुस्तके सांगत आहात त्यांवर स्पर्धापरीक्षेत काही प्रश्न येणार आहेत का? नसतील तर पुस्तकांच्या थोरवीचे हे भावनिक भरताड आम्ही कशासाठी ऐकावे? तिथेही एक विद्यार्थी अपवाद होता. त्याने माझा नंबर घेतला. मी सांगितलेली काही पुस्तके त्यानेही वाचली होती. मी अर्ध्या तासात माझ्या उफाळलेल्या पुस्तकप्रेमाचा मनातल्या मनात संहार करून विषयाचा उपसंहार केला आणि एका उद्विग्न मनस्थितीत घरी परतलो.

विद्यार्थ्यांपैकी एक आणखी गट वाचन करणारा आहे. तो म्हणजे महाविद्यालयीन किंवा विद्यापीठ स्तरावर विविध स्पर्धांमधून (वक्तृत्व, वादविवाद, निबंध इत्यादी) भाग घेणारा. हे विद्यार्थी उत्साही असतात. त्यांचे वाचन इतर अनेकांपेक्षा बरे असते. स्पर्धेच्या विषयाला धरून ते वाचतात किंवा नेटवरून तरी माहिती मिळवतात. त्यांचे आकलन बरे असते. सौंदर्याची त्यांची जाण कविता, शायरी, सुभाषिते, रुबाया यांच्या वापराने वाढलेली असते. यांपैकी काही विद्यार्थी विविध चळवळींशी जोडले जातात. अंधश्रद्धानिर्मूलन, स्त्रीमुक्ती अशा चळवळी किंवा वंचित आदिवासींच्या विकासासाठी झटणाऱ्या विविध संस्था -संघटना, अशा ठिकाणी या विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वाला आणि नेतृत्वाला संधी मिळते. चळवळी किंवा संघटनांची वैचारिक चौकट समजून घेण्यासाठी हे विद्यार्थी वाचतात. त्यांच्यात महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांनी गतिमान केलेल्या परिवर्तनाच्या विचारांचा स्फुल्लिंग दिसतो. हे विद्यार्थी मार्क्स, एंगल्स, सिमॉन द बुव्हार, डी.डी. कोसंबी, शरद पाटील, आ.ह. साळुंखे, रावसाहेब कसबे यांच्या गंभीर ग्रंथांकडे आकृष्ट झालेले असतात. हा गट सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रांमधील प्रस्थापितांविरुद्ध विद्रोह करून व्यवस्थेची परखड चिकित्सा करणारा असतो. या संघटनांच्या नेत्यांसोबत झालेल्या चर्चा या गटाचे वाचन आणि आकलन वाढवतात.

काही हुशार मुले अभियांत्रिकी, वैद्यकीय, विज्ञान अशा शाखांमध्ये शिक्षण घेतात. ते स्पर्धापरीक्षाही देतात. त्यांना अवांतर वाचनाची खरेच आवड असते. त्यांतील काही मुले लिहीतही असतात (बहुधा कविता). मात्र अवांतर वाचनाचा परीक्षेत काय उपयोग? कविता लिहून तुला काय मिळणार? असे यक्षप्रश्न त्यांच्या धंदेवाईक दृष्टीच्या पालकांना किंवा क्वचित काही शिक्षकांनाही पडतात. आणि त्यांना आपली वाचनाची आवड दाबून टाकावी लागते. या प्रश्नांचा संबंध आपण आजच्या उपयुक्ततावादाने ग्रस्त युगप्रवृत्तीशी जोडू शकतो. या प्रवृत्तीचा मुख्य प्रश्न असा, की वाचनाची उपयुक्तता काय? या प्रश्नाच्या सावलीत सर्व कला-साहित्यव्यवहारच अनुत्पादक (unproductive) ठरवला जातो. आता या उपयुक्ततावाद्यांना कोणी समजावून सांगावे, की काही गोष्टींची उपयुक्तता ही सांस्कृतिक पातळीवरची असते. आणि ती तुमच्या मानण्यावर अवलंबून असते. त्यांचे मूल्य तुम्हालाच ठरवावे लागते. तसे पाहता ताजमहाल या वास्तूची तरी उपयुक्तता काय आहे? या वास्तूत गॅसचा ओटा, बेसिन, सिंक यांतले काहीच नाही. साध्या स्वयंपाकाच्याही तो कामाचा नाही. मग त्याचे उपयोगितामूल्य शून्य समजायचे का? रवींद्रनाथ ठाकूर यांच्या 'गीतांजली'तील गीते अन्न, पाणी, दूध, सॅनिटायझर, औषधे यांपैकी काहीच निर्माण करू शकत नाहीत. मग त्यांची उपयुक्तता शून्य मानायची का?

उपयुक्ततावाद्यांनी एक मात्र लक्षात घ्यावे, की देश-प्रदेशाची किंवा समाज-संस्कृतीची ओळख परक्यांना करून द्यावी लागते, तेव्हा तुम्हाला कला-साहित्य-तत्त्वज्ञान यांकडेच यावे लागते. भारतापुरते बोलायचे तर हा देश बुद्ध-गांधींच्या तत्त्वज्ञानाला, टागोर-प्रेमचंद यांच्या साहित्याला, रामायण-महाभारत या महाकाव्यांना, वेरूळ-अजिंठा यांसारख्या लेण्यांना; आणि बुलंद दरवाजा - ताजमहालासारख्या वास्तूंना निर्माण करणारा देश म्हणूनच जगात ओळखला जातो.

न वाचणारे जास्त आणि वाचणारे कमी, यामुळे काही प्रश्न निर्माण होताना दिसतात. वाचनप्रेमी मुले आपल्या वयोगटाच्या बाहेर फेकली जातात. कारण समवयस्कांपेक्षा त्यांचे आकलन पुढचे असते. अशी मुले त्यांच्यापेक्षा वयाने प्रौढ असणाऱ्यांमध्ये मिसळून वैचारिक चर्चा करू शकतात, मात्र समवयस्कांमध्ये मिसळणे ही त्यांची भावनिक गरज असते, तिचे काय करायचे? अशी मुले मनाने एकटी पडतात. वाचनवेडी माणसे कधी कधी टिंगलटवाळीचाही विषय बनवली जातात. 'तुमचे ज्ञान पुस्तकी आहे, प्रत्यक्ष व्यवहार तुम्हाला कळत नाही. जीवनात पुस्तकांपेक्षा प्रॅक्टिकल महत्त्वाचे' असे 'वाचनलेस' संस्कृतीचे समर्थन करणारे कुत्सित तत्त्वज्ञान सोयीस्करपणे निर्माण केले जाते. (जास्त वाचनाने माणूस वेडा होतो, ही धारणाही याच कारणाने निर्माण झाली असेल का?) जणू काही पुस्तके वाचणाऱ्याला व्यवहारातले काही कळूच शकणार नाही! जणू काही तो पुस्तकातील कल्पनांच्या साम्राज्यात रमल्याने जीवनाची वस्तुस्थिती त्याला समजूच शकत नाही! डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अब्राहम लिंकन, यशवंतराव चव्हाण ही माणसे पुस्तकांसाठी वेडी होती. वरील आरोप या माणसांवर करण्याची कुणाची हिंमत होईल का?

एम.ए.च्या वर्गातील एक अनुभव तर धक्का देणारा आहे. शिक्षकाने आपला विषय समजावून सांगताना अवांतर वाचनातील पूरक संदर्भ देऊन विषय स्पष्ट करावा आणि रसिकतेची जोड देऊन तो फुलवावा,अशी धारणा बाळगणारा मी एक शिक्षक आहे. एका तासात माझ्या विवेचनाला बर्ट्रांड रसेलच्या मांडणीचा आधार द्यावा म्हणून 'सुखी माणसाचा सदरा' (मूळ ग्रंथ : Conquest of Happiness - अनुवाद : करुणा गोखले) या ग्रंथातील विचारधन मी उधळायला लागलो. थोडा रसेल सांगून झाला असेल, एक प्रौढ विद्यार्थिनी मला थांबवून म्हणाली, सर हे रसेलचे विचार आपण नंतर पाहू... आधी आपला सिलॅबस संपवू. हे माझ्यासाठी अनपेक्षित होते. मी शांतपणे 'ठीक आहे' म्हणून अभ्यासक्रमातील घटकांकडे वळलो. अर्थात हे उदाहरण अपवादात्मकच. माझ्या अध्यापनातील संदर्भसंपृक्ततेवर खुश असणारे विद्यार्थीच मला जास्त भेटले; पण अपवादात्मक रीतीने का होईना, महाविद्यालयीन वाचनसंस्कृतीला मिळालेले हे विचित्र वळण काळाचा महिमा म्हणून वाचकांच्या लक्षात आणून द्यावेसे वाटते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वाचनसंस्कृतीची सद्य:स्थिती आहे ही अशी आहे! अशा वातावरणात फार अपेक्षा ठेवणे म्हणजे स्वतःच अपेक्षाभंगाच्या दुःखाला आमंत्रण देण्यासारखे आहे... पण दिलेल्या विषयाचा एक अपरिहार्य भाग म्हणून काही अपेक्षा व्यक्त करतो- एक मराठीचा शिक्षक या नात्याने मला मनापासून वाटते की विद्यार्थ्यांनी आवांतर वाचन खूप करावे. सर्वच शाखांच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे लेखन वाचावे. आम्हाला पुस्तक काय वाचायला सांगता, आम्ही जीवन वाचतो असा युक्तिवाद करणाऱ्या महाभागांनाही मला सांगावेसे वाटते, की जगताना वाट्याला आलेले जे जीवन आपल्याला वाचायला मिळते, त्याला खूप मर्यादा आहेत. मुळात एका माणसाच्या जीवनालाच खूप मर्यादा आहेत. मी प्राध्यापक असेन तर डॉक्टरचे जीवन अनुभवू शकत नाही. मी डॉक्टर असेन तर इंजिनीयरचे आयुष्य मला माहीत असणार नाही. वाचनाच्या माध्यमातून मात्र आपण एकाच वेळी अनेकांची जीवने अनुभवू शकतो. अनेक प्रदेशांचा घरबसल्या प्रवास करू शकतो. त्रिखंड पालथे घालू शकतो. एकाच जीवनात अनेक जीवने जगायची संधी म्हणजे वाचन! घरी आरामखुर्चीत बसून जगाचा भूगोल निवांतपणे न्याहाळण्याची निवांत सोय म्हणजे वाचन! कुठलीही मोठी किंमत न देता बसल्याजागी उग्र - भीषण आणि कोमल - सुंदर जीवनाचे दर्शन घेण्याची संधी म्हणजे वाचन! हे जग आहे तरी कसे आणि माणसे जगतात तरी कशी, ही जिज्ञासा कमीत कमी श्रमात पूर्ण करण्याची सुंदर पद्धत म्हणजे वाचन! जगाला आणि स्वतःलाही ओळखण्याचे सर्वात सोपे साधन म्हणजे वाचन! उच्च प्रतीचे मनोरंजन आणि सखोल ज्ञान मिळवण्याची हमखास खात्री म्हणजे वाचन! म्हणून विद्यार्थ्यांनी तर वाचन करावेच पण सर्वांनीच वाचन करावे. आज शेकडो पुस्तकांच्या पीडीएफ समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत. त्यांतील निवडक पुस्तके तरी वाचली पाहिजेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तर झपाटल्यासारखे वाचावे. ललित साहित्यासोबतच वैचारिक साहित्यही वाचावे. ललित साहित्यातून तुम्हाला मानवी भावभावनांचा परिचय होईल, तर वैचारिक वाङ्मयातून तुमची तर्कबुद्धी तेजतर्रार होईल. यातून तुमच्या व्यक्तिमत्त्वाला एक समतोल आकार प्राप्त होईल. अशी मुले समाजमाध्यमांवरील एखाद्या 'भडकाऊ' पोस्टने भडकणार नाहीत. त्यांना सामाजिक सलोख्याचे महत्त्व कळल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या हाती सहजासहजी दगड येणार नाहीत. ते बिनडोकपणाचे प्रदर्शन करत दंगली घडवणार नाहीत. युनेस्कोच्या घटनेच्या शेवटच्या प्रकरणातील पुस्तकांची सनद सांगून हा लेख संपवतो. ही सनद सांगते, की युद्धाची सुरुवात माणसांच्या मनात होत असते. त्यामुळे शांतीची संरक्षण-यंत्रणा माणसांच्या मनातच उभारली पाहिजे. मैत्री आणि सद्भावाचे बौद्धिक वातावरण निर्माण करण्यात पुस्तकांचा जबरदस्त प्रभाव असल्यामुळे पुस्तके ही शांतीची एक प्रमुख संरक्षणयंत्रणा ठरतात.

आपण वाचनसंस्कृतीच्या माध्यमातून ही यंत्रणा प्रबळ केली पाहिजे. आमेन.

**- प्रा. हेमंत खडके**

भ्रमणध्वनी : ९८२२८४११९०

hemantkhadke65@gmail.com



जयदेव डोळे

# शिक्षक-प्राध्यापकांचे वाचन : काही अपेक्षा

**आधी** दोन विनोद सांगितले पाहिजेत. मीच माझ्यावर केलेले आहेत ते. औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मला २००५ साली सहयोगी प्राध्यापक म्हणून निवडले गेले. असोसिएट प्रोफेसर या पदाचे ते भाषांतर. पण त्या वर्षी तसे त्या पदास म्हटले जात नसे. त्याऐवजी रीडर अर्थात प्रपाठक असे म्हटले जायचे. माझी निवड अनेकांना आवडली नव्हती. त्याची कारणे अनेक आहेत. ती सांगायची ही जागा नव्हे. मग मी बहुतेकांना हसत हसत टोमणा मारीत सांगू लागलो की अहो, माझे आडनाव डोळे आहे ना, मग 'रीडर' म्हणून मीच नको निवडला जायला? डॉक्टरेट नसली म्हणून काय झाले? डोळे आहेत की...!

दुसरा विनोद घरातला. मी जमवलेली (स्वखर्चाने अर्थातच) पुस्तके पाहून अनेकांना आश्चर्य वाटे अन् सहजच त्यांच्या तोंडून उद्गार बाहेर पडे, अबब! एवढी पुस्तके...? लगेच मी म्हणे, काय करणार? आडनावाचा वापर मग कुठे करणार सांगा बरे! एक बरेच की माझे आडनाव दाते नाही. नाही तर काय पाहायला मिळाले असते?

तर डोळे आणि वाचन यांची सांगड मी माझ्या प्राध्यापकीच्या काळात अशी घालायचो. आता निवृत्त झाल्यानंतर गेल्या साडेतीन वर्षांत ती आणखी दाट झालीय. एकदा एक कुरियरवाला काही टपाल द्यायला आल्यावर पुस्तकांनी भरलेले आडवे अनेक कप्प्यांचे कपाट पाहून 'आप स्टॉकिस्ट हो क्या?' असे विचारत होता. ज्यांना माझा पत्रकारितेचा विषय शिकवण्यासारखा वाटत नसे त्यांना मी असे सांगे, की अहो, मला एवढे वाचावेच लागते; कारण मी ज्यांना शिकवतो त्यांना पुढे वाचकांसाठीच काम करायचेय. आपले काही वाचले जावे असे वाटत असेल तर आपण इतरांचे वाचायला हवे, हा साधा नियम आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?

खैर, तसा माझा प्राध्यापकीशी संबंध आता तो माझ्या चाळिसाव्या वर्षी. त्यामुळे माझा तसा अधिकारही नाही. एक तर मी पीएच.डी. केलेली नसल्याने आणि दोन, मी पाठ्यपुस्तकांचा लेखक नसल्याने दोन्ही प्रकारांसाठी भरपूर वाचन करावे लागते असा एक समज आहे. माझ्या लेखनामुळे आणि विद्यापीठीय पदामुळे मला अनेक ठिकाणी डॉक्टर म्हटले जाते. फलकांवर आणि कार्यक्रमपत्रिकांवरही 'डॉ.' असे लिहिले जाते. खूपदा मी खुलासे केले. शेवटी कंटाळून सोडून दिले. माझी तीन-चार पाठ्यपुस्तके यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाला लागली होती. पण ते विद्यापीठ आणि बाकीची विद्यापीठे यात फार अंतर आहे.

मला वाचन करावे लागले ते पत्रकारितेमुळे आणि तीत सतत ताजी माहिती मिळवावी लागत असल्याने. पुढे त्याचा खूप लाभ प्राध्यापकीवेळी झाला. महत्त्वाचे म्हणजे पुण्यात बरीच वर्षे घालवल्याने तेथे रद्दीच्या दुकानात आणि ग्रंथप्रदर्शने यात मिळणारी द्विहस्त पुस्तके (सेकंड हँड!) खूप स्वस्तात मिळत. काही नवीही घ्यायचो. पुण्यात तीही सोय असे. त्यामुळे माझा संग्रह वाढत गेला. राजकारण, समाजकारण, तत्त्वज्ञान, टीका, विश्लेषण आदीसह कादंबऱ्यांचाही साठा माझ्याकडे होत राहिला. पत्रकारितेचा प्राध्यापक झाल्यावर तर विषयांची वानवाच नसे. वेगळे, नवे असे खूप काही मिळूही लागले आणि घेऊही लागलो.

औरंगाबादेत स्थिरावल्यावर पुस्तक खरीदण्याचा अधिकार मी प्राप्त केला. उधारी, नंतर देतो, असा प्रकार एकदाही केला नाही. 'मराठवाडा' दैनिकात असताना बुधवार हा माझ्या सुट्टीचा दिवस. मी अनेक वर्षे विद्यापीठाच्या ग्रंथालयातील नियतकालिक कक्षात जात असे. तेथेच प्राध्यापक झाल्यावर तर काय, तुंबळ वाचले! सगळे मजले, कपाटे धुंडाळून भरपूर.

तरीही माझे बेशिस्त वाचन ठरले नाही. एकातून दुसरी,

दुसऱ्यातून तिसरी अशी ज्ञानसाखळी किंवा ज्ञानशिडी चढत गेलो. किंबहुना, तुमचे कुतूहल, जिज्ञासा सदोदित जागृत असेल तर तुम्ही कधीही ढेकर देऊन स्वस्थ बसूच शकत नाही. त्यातच विद्यार्थ्यांनासुद्धा काही गोष्टी समजायला हव्यात अशी उत्कट इच्छा असणाऱ्यांना या शिड्या सतत शोधाव्याच लागतात. एकेका पायरीवर जात शिक्षकाने उंची नसते गाठायची. उंचावर जाऊन परत जमिनीवर विद्यार्थ्यांना समजेल अशी अवस्था गाठावी लागते. म्हणून कित्येकदा मला ६० मिनिटांचा तासही पुरत नसे. स्तन जसा दुधाने तटतटलेला असतो अन् तो रिकामा झाला नाही तर ठसठसतो, तसे शिक्षकाचे व्हायला पाहिजे. थोडक्यात, शिक्षक कायम गाभण राहिला पाहिजे व वीत राहिला पाहिजे!

वर्गात जाताना पुस्तके, वृत्तपत्रे, नियतकालिके घेऊन जायची सवय मला होती. शिकवताना मध्येच उतारे वाचून दाखवणे, भाषेचे नमुने सांगणे, मांडणी-शैली-सजावट आदी समजावून सांगणे असे मी करीत असे. पाठ्यपुस्तकांसह त्यांना अनुरूप, उपयुक्त पुस्तके वर्गात दाखवत असे. ग्रंथालयात असेच काही आहे का ते पाहा व वाचा असे उत्तेजन देत असे. कात्रणे, जुने अंक यांचीही खूप मदत व्हायची. हे सारे चिक्कार वाचत असाल तर जमते. म्हणजे वाचता वाचता पुढे वर्गात काय शिकवायचे याची संगती लावण्याचे कौशल्य विकसित करावे लागते. आपलीही समज वाढते, विद्यार्थीही ती मिळवतात.

तंत्रज्ञानाने भारलेल्या आजच्या शैक्षणिक वातावरणात तरुणतरुणी सहजासहजी त्यांना कशाची माहिती हवी ती मिळवू शकतात. त्यामुळे शिक्षक-प्राध्यापक तर सतत ताजी माहिती व ज्ञान मिळवणारे असले पाहिजेत. आपण विद्यार्थ्यांच्या पुढे असावे हेही त्यांना समजायला हवे. नाहीतर विद्यार्थी व प्राध्यापक गुगल आणि विकीपीडिया या एकाच स्थळावर एकत्रच पाणी पिताना दिसतील. शिक्षक व प्राध्यापक यांच्या वाचनाविषयी आणि पुस्तकप्रेमाविषयी अजिबात चांगले बोलले जात नाही. प्राध्यापकांपैकी फार थोडे प्राचार्य पुस्तके घेणे कमी करतात वा थांबवतात. त्याने विद्यार्थिवर्गसुद्धा वंचित होतो. पाठ्यपुस्तकापलीकडे काही न वाचणारे अनेक प्राध्यापक असतात. आता पैसे देऊन प्राध्यापक होणारेही बरेच आहेत आणि केवळ तासिकांवर गुजराण करणारेही चिक्कार आहेत. त्यांनी पुस्तके विकत घेऊन वाचावीत, आपला स्वतंत्र ग्रंथसंग्रह उभारावा, असे त्यांना कोण सांगणार? सांगितले तरीही परवडले पाहिजे पुस्तके खरीदणे. त्यामुळे जी प्राध्यापक शिक्षक मंडळी गुणवत्तेवर लागली तिलाच मी काय म्हणतो ते पटेल. उत्तम गणला जाणारा अध्यापक सर्वत्रच चार आणे असतो. उरलेले तीनचतुर्थांश असतात.

चर्चासत्रे, परिसंवाद अशा बौद्धिक उपक्रमांत मी अनेकदा चर्चक, बीजभाषक, उद्घाटक म्हणून गेली आहे. तिथे प्राध्यापक निबंध सादर करीत असे आणि आधी सादर केलेल्या निबंधाचे एक 'जर्नल' प्रकाशितही होई. ९९ टक्के निबंध सुमारे दर्जाचे आणि शालेय निबंधांसारखे. फिरून त्याच त्या संदर्भांचा रतीब घातला गेलेला. अत्यंत ढोबळ आणि ढिसाळ मांडणी. नवी दृष्टी नाही की नवे काही शोधणे नाही. परंतु विद्यापीठ अनुदान आयोगानं त्यासाठी गुणप्रदान सुरू केले नि सुरू झाले ढिगाने निबंधलिखाण. असे लिखाण पैशाच्या मोबदल्यात लिहून देणारे प्राध्यापकही पैदा झाले. केवळ वाचन कमी व वाचकाच्या कमतरतेमुळे नवा विचार बेपत्ता! या कारणांमुळे या निबंधांचा पोरकट अवतार संपत नाही. वाचनाचा प्रचंड अभाव आपल्याच विषयांत पुन:पुन्हा नवे काही शोधत व सांगत राहण्याची ऊर्जा नष्ट करतो. बव्हंश प्राध्यापक चाकोरीबंद विचार करणारे होतात. प्राध्यापिकांविषयी काय बोलावे? स्त्रीचा सन्मान म्हणून किंवा संसार सांभाळून नोकरी करतात म्हणून त्यांच्याविषयी आदरभावना कितीही बाळगली, तरी ती अशा निबंधांच्या अन् त्यांच्या सादरीकरणाच्या प्रसंगी पुरती नष्ट झाल्याचा माझा अनुभवणे आहे. प्रेशर अथवा ओरिएंटेशन कोर्सवेळी मोजकेच प्राध्यापक व प्राध्यापिका प्रश्न विचारणे, पुस्तकांची नावे लिहून घेणे, स्वत:ची मते सांगणे असे करतात. याचेही कारण वाचनाची नावड हेच आहे. प्राध्यापक असूनही वाचत नाही हे मला देशद्रोहासारखे वाटते. देशात राहून देशाविषयी बेफिकिरी आणि बेपर्वाई कशी चालेल? देश ढासळतोय तरीही आपण मजेत कसे राहू शकतो? अध्ययन, ज्ञान, आकलन या बाबी सतत वृद्धिंगत असणाऱ्या पाहिजेत. एका मुक्कामापाशी येऊन थांबायचे याला ज्ञानग्रहण कसे काय म्हणता येईल? शिक्षक चौफेर वाचन करणारा असला तरच त्याचे/तिचे अध्यापन उत्तम व प्रभावी होत असते. वर्तमान, भूल व भविष्य असे तिन्ही काळ त्यांच्या ज्ञानाने-कलेने घेतल्यास विद्यार्थी किती आनंदतील बरे...!

सक्ती, गरज अथवा औचित्य यांसाठी पुस्तकाचे व संदर्भग्रंथांचे वाचन यात फार धोका असतो. कारण असे वाचन वाफेसमान उडून जाते. उकळल्यापुरते कलेचे पाण्याशी नाते असते. तसे वाचनाचे होऊन जाते. भांडे रिकामे होऊन जाते. म्हणून वाचन ही 'प्रचंड आवड' तरी हवी किंवा 'खराखुरा आनंद' तरी! दोन्ही कृती अत्यंत व्यक्तिगत आणि स्वकेंद्री आहेत. माझा आनंद इतरांना काय देईल? काहीच नाही. पण मी शिक्षक असेन तर माझ्या शिकवण्यामधून मला समजलेल्या काही नैतिक, व्यावहारिक, वा वैचारिक गोष्टी मला जर विद्यार्थ्यांपर्यंत पोचवता आल्या तर माझा आनंद माझ्यापुरता राहणार नाही. दोन्ही बाबतीत फायदा आहे. मी माझ्या आनंदासाठी का होईना, वाचता वाचता माझ्या भूमिकांत, वर्तनात, वागण्यात खूप बदल झाल्याचे मला अनुभवता येईल. ज्ञान माणसाला सुशिक्षित ठरवते. परंतु वाचन त्यास सुसंस्कृत बनवते. इतरांची आयुष्ये वाचनातून उलगडू लागली की आपले आयुष्य, आपले स्थान अशा असंख्य गोष्टींचा विचार करण्याची सवय वाचकाला लागते अन् तो स्वत:सह मनुष्यांच्या आयुष्याचाही आदर करू लागतो. काहीच न वाचता आणि वाचायची आवश्यकता नाही अशी समज असलेली एक विचारसरणी राज्यावर आली की ती माणसांची व संस्थांची कशाप्रकारे वासलात लावू शकते

ते आपण आज अनुभवतो आहोत. हा विचार केवळ आज्ञाधारी आहे. त्याला प्रश्न, प्रतिवाद, शंका असे काही आवडत नाही. ज्ञान आणि संस्कृती यांचा मक्ता मूठभरांपाशीच असतो असे मानणारा हा विचार दुसऱ्यांनाही कळते आणि त्यांनाही मन व बुद्धी असते हे समजावूनच घेत नाही. न वाचणारी व्यक्ती अडेलतट्टू, हट्टी, आत्मकेंद्री आणि क्रूर होऊन जाते. आपण शिक्षक-प्राध्यापक विचारांच्या आदानप्रदानाच्या व्यवसायात आहोत. तो व्यवसाय आणखी भक्कम, आनंदी आणि समृद्ध व्हावा ही इच्छा.

(हा लेख संपवता संपवता अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प पराभूत झाल्याची बातमी पाहिली. हा माणूस वाचणारा आहे. विचारी आहे, चिंतक आहे असे कधीच जाणवले नाही. का माहीत आहे? त्याचे अव्याहत खोटे बोलणे, आत्मरत असणे आणि इतरांना सतत तुच्छ लेखणे! महासत्तेचा नायक जर इतका बेछूट असेल तर ती सत्ता माजणार नाही तर काय होईल?)

– जयदेव डोळे
भ्रमणध्वनी : ९४२२३१६९८८

ग्रंथाली

# जगावेगळी माणसं

**रमेश वाघमारे**




**काळुपुऱ्यातील-गौरपुऱ्यातील व प्रतिभापुऱ्यातील जगावेगळ्या माणसांचं दर्शन.**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

# प्रेमसेतू

**संदीप रामराव काळे**




**उत्कट, रसरशीत, संवेदनशील, करुणामय आणि महत्त्वाचं म्हणजे बुद्धाच्या मुदितेवर आधारलेलं प्रेमाचं दर्शन.**

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**



**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

# कोविडोत्तर वाचनसंस्कृती...

**'शब्द रुची'**मधूनच या अगोदर कोरोनाकाळातील देणग्या म्हणून जो लेख मी लिहिला, त्याचाच कदाचित हा लेख विस्तार ठरावा. नरेंद्र लांजेवार ह्या आपल्या कार्यसंस्कृतीतल्या नावारूपाला आलेल्या तुलनेने तरुण कार्यकर्त्याने स्वत:ला ज्या पद्धतीने वाचन-संस्कृतीच्या प्रसारकार्यात एकरूप करून घेतले, तसे कार्यकर्तेच दशकानुदशके तयारच होत नाहीत, तेथे वाचनसंस्कृतीची चर्चाही कोविडपूर्व अथवा कोविडोत्तर अशी करणे याला अर्थच उरत नाही. ग्रंथालये उघडण्याऐवजी दारूची दुकाने उघडण्यासाठी, मंदिरे उघडण्यासाठी, हॉटेले, मॉल उघडण्यासाठीच दबावाचे राजकारण अधिक वाटते आणि ग्रंथालये उघडणे हा केवळ विरोधी पक्षपुरस्कृत राजकारणाचाच भाग तेवढा उरतो. ग्रंथालये, वाचनालये, साहित्यसंस्था, ग्रंथविक्रेते, ग्रंथप्रकाशक हे कोणीच जिथे हातावर हात देऊन बसतात आणि वाचनवृद्धीसाठी कोणीही ऑनलाइन वाचक चळवळ चालवण्याचे गांभीर्याने मनावरही घेत नाहीत.

या लॉकडाऊनपूर्वी वाचनसंस्कृती होती, समृद्ध होती आणि यानंतर तिचे काय, असा अर्थ निघावा असे आपल्या वाचनसंस्कृतीचे वास्तव अगोदर होते काय? वाचनाची संस्कृती हीदेखील जगभर साऱ्याच भूभागात, साऱ्याच भाषिक समाजात एकसारखीच असते अथवा असतेच असेही नाही. ज्या भाषिक समाजात मुळात मल्याळमप्रमाणे वाचनकरता येण्यापुरती का होईना साक्षरता अधिक असते, त्या भाषांमध्येच तुलनेने वाचणाचा संस्कार, वाचन, वाचनाची भूक व ती भागवली जाण्याची सामग्री अधिक निर्माण होत असते. काही भाषिक समाजात वाचन हा संस्कार म्हणून जपलाच गेला नसतो अथवा मराठी भाषिक समाजासारख्या समाजांमध्ये जो अगोदर जपला गेला असेल तो पुढे विकासाच्या भ्रामक कल्पनांपोटी, शिक्षणाची वाढ होऊनही पुसला जाऊन संपुष्टात आलेला असतो. जे समाज केवळ बोलींच्या, लिपी नसलेल्या बोलींच्या पातळीवर वावरतात त्यांचा तर आपण यात विचारच करत नसतो. कारण वाचनाची आपली संकल्पना ही लिखित, मुद्रित, अक्षरे, शब्द वाचण्यापुरती सीमित आहे. मग ती नियतकालिके, वर्तमानपत्रे, ग्रंथ, पुस्तके एवढ्यापुरतीच बंदिस्त होते.

दृक्श्राव्य माध्यमांमुळे ऐकली जाणारी आणि वाचली जाणारी अशी भाषिक रूपे उद्भवतात. मात्र मुळात हा प्रतिमांचा उद्योग असल्याने व त्यातही विशिष्ट व्यापारी, व्यावसायिक हेतूंनी प्रेरित 'निर्मित' प्रतिमांचा, त्यातही वस्तू, सेवा, मूल्य, आशय, विचार काहीही; पण 'गळी उतरवण्याच्या हेतूने' निर्मिलेल्या प्रतिमांचा उद्योग असल्याने तो त्याच शब्दार्थातून उद्भवणाऱ्या नेमक्या व परिणामकारक प्रतिसादासाठीची 'प्रतिमा' 'वाचायला' बाध्य करणारा उद्योग असतो. येथे प्रतिमावाचन हे ग्रंथवाचनाप्रमाणे मेंदूच्या धीम्या लहरींद्वारा न होता ती प्रतिमा बघताना जलद लहरी मेंदूत निर्माण होत असतात आणि त्या वाचनासाठी धीम्या लहरी जो अवकाश उपलब्ध करून देतात तो देत नाहीत. प्रतिमावाचन हे त्यामुळे तसे वाचनही उरत नाही. म्हणून ती 'बघ्यांची संस्कृती', वाचकांची नव्हे.

करंदीकर, बापट, पाडगावकरांनी कवितेचे वाचक नव्हे तर 'बघे' निर्माण केले, असा दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा जो आक्षेप कवितेच्या त्या मंडळींच्या 'सादरीकरणावर' असायचा तो यासाठीच. प्रतिमा ही सादर केली जाते आणि जशीच्या तशी गिळंकृत केली जाते. पचत नाही. वाचन हे चावून चोथा काढून खाण्यासारखे असल्यामुळे पचते. वाचनसंस्कृतीला सर्वाधिक मारक संस्कृती ही 'बघ्यांची', 'दर्शकांची' बाजारीकरणांवर भर असलेली.

कोविडोत्तर युग सादरीकरणात्मक, अनुरंजनात्मक, लोकानुनयात्मक अशा कलामाध्यमे यांचे उल्लंघन करणारे युग तर

निश्चितच असणार नाही. उलट दृक्‌श्राव्य माध्यमांच्याच अधिकाधिक व्यामिश्र अशा सोप्या, सुलभ तंत्रज्ञानाचे जाळे विणणारे युग असेल. मग सादरीकरणात्मक, अनुनयात्मक, अनुरंजनात्मक अशा युगामुळेच जर शब्द, ग्रंथ, वाचनसंस्कृतीचा क्षय घडला असेल तर कोविडोत्तर युगात तर वाचनदेखील हातातील उपलब्ध पडद्यांवरच अधिक रूपांतरित झाले तर त्याला शारीरिक कारणांमुळेही मर्यादा पडणारच आहेत. प्रकाशाचे उत्सर्जन कागद करत नाही, पडदा करतो. वाचनवेळेचा, अवधीचा, पडद्यावरील वाचनात संकोच अधिक होतो. वाचनप्रेरणा क्षीण होण्यास ते कारणीभूत ठरते.

लॉकडाऊनच्याच काळात ग्रंथप्रदर्शने, मेळावे, जत्रा, ग्रंथसहवास, ग्रंथालयांमधला तसाही फारसा अगोदरही नसलेला आणि आता तर तो बंद होण्यासाठी कारणच सापडलेला वावर, ग्रंथांची हाताळणी करणाऱ्यांकडून संभाव्य जंतू-विषाणू संसर्गाचा धोका, कागद, ग्रंथ याउलट विषाणू असल्याचे मनात बसलेले भय, शालेय, महाविद्यालयीन, सार्वजनिक, संदर्भ, संशोधन अशा विविध प्रकारच्या विविध कारणांनी वाचनाची केंद्रे असलेल्या व्यवस्थांम ध्येच कोविडोत्तर जगात जे अंतनिहीत मोठे बदल संभवतात व त्यामुळे आजच जेथे वाचन ही दुय्यम, तिय्यम देखील अग्रक्रमाची बाब नव्हती तेथे प्रत्यक्ष लोकसंपर्क, हाताळणी, देवघेव या साऱ्याच व्यवहारावर मर्यादा पडल्यावर वाचनसामग्रीचे त्या व्यवहारात कुठे, किती व कसे स्थान असेल याबाबत सारेच सचिंत आहेत. निश्चिंत कोणीच नाही.

वाचनाची प्रेरणा कोविडपूर्व जग ज्या ज्या ठिकाणाहून घेत होते, वाचनाचा संस्कार करणारी थोडीफार महत्त्वपूर्ण केंद्रे म्हणून ज्यांच्याकडे बघितले जात होते, त्या वृत्तपत्रांनी तर ग्रंथव्यवहार, वाचनप्रेरणा जपणाऱ्या, वाढवणाऱ्या साधनांवर अघोषित बंदीच घातलेली आहे. कोविडपूर्व काळातच त्यांनी ग्रंथप्रकाशनाच्या कार्यक्रमांच्या बातम्या, प्रकाशोनोत्तर वृत्ती हे सारे जाहिरात समजून घ्यावे लागावे अशी स्थिती उत्पन्न केली आहे. ग्रंथप्रसाराला, वाचन प्रसाराला अतिशय मारक असे जे हे धोरण आहे ते वाचकानुवर्ती नसून केवळ मालकानुवर्ती व त्यातही मालकांच्याच तेवढे लाभानुवर्ती आहे.

कोविडोत्तर काळात तर ते त्यांना अधिकच लाभदायकरीत्या कामी येणार आहे. वृत्तपत्रांच्या पुरवण्यांतून उदयाला आणली गेलेली वाचन संस्कृती आता एखाद-दुसरा अपवाद वगळता क्षीण झाली आहे. कथा, कविता, ललितगद्य, व्यासंगपूर्ण अभ्यासू लेख हे वृत्तपत्रांच्याच पुरवण्यांतूनच नव्हे तर ज्या नियतकालिकांची ती वैशिष्ट्ये होती त्यातूनही हद्दपार होत होत ती नियतकालिकेही संपुष्टात आली आहेत. कोविडोत्तर काळात तर ती पुनरुज्जीवित होण्याचे काही कारणच उरलेले नाही. काही मोजक्या दिवाळी अंकांपुरतीच ती संस्कृती आज शिल्लक आहे, तीदेखील कोविडोत्तर काळात किती तग धरेल याबद्दल शंकाच आहे. धार्मिक, संशोधनपर, शैक्षणिक, व्यावसायिक, व्यापार-उदिम, उद्योग, क्रीडा, तंत्रज्ञान, माध्यमे, संवादाची तंत्रज्ञाने, पशुपालन, मत्स्यपालन, कृषी अशा अनेक उपयोजित उपयोगी विषयांवरचे वाचन अपरिहार्यपणे करावा लागणारा वर्ग मोठा आहे. तो कोविडपूर्व काळात विकास पावला तसाच कोविडोत्तर काळातही टिकेलच. मात्र जी वाचनसंस्कृती समजली जाते ती प्रामुख्याने सर्जनशील निर्मिती असणाऱ्या साहित्य, नृत्य, नाट्य, संगीत, शिल्प-चित्र अशा ललित साहित्यकलांशी संबंधित अशा लेखन-वाचनाने समृद्ध होणारी जाणीव जपणारी, वृद्धिंगत करणारी संस्कृती आहे.

कोविडपूर्वकाळातच तिचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून आलेला आहे. कोविडोत्तरकाळात तिच्या उत्थानाच्या शक्यता अधिकच धूसर होत जाणार आहेत. खुद्द पत्रकार आणि माध्यमातील नोकरदारांचे वाचन देखील नसल्यात जमा झालेले आहे, ते कोविडोत्तरकाळात पुनर्स्थापित होऊन ती जमात मोठ्या प्रमाणावर वाचनप्रवृत्त होईल, याची शक्यता नाही. कारण त्यांच्या व्यवसायानेच त्यांची वाचनावस्था निकालात निघालेली आहे व अधिकच निघणार आहे. चौकस, विद्वान, जाणकार, सृजनशील, व्यापक, बहुश्रुत, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा पत्रकार-संपादक हा अभिजात पत्रकारितेच्या युगाची देणगी होती. ती पत्रकारिता कोविडोत्तर युगात पुन्हा अवतरण्याची शक्यता पूर्वीच संपुष्टात आली असल्याने, आशादायी चित्र दूरदूरवर दिसत नाही. मग वाचनाच्या प्रेरणा कोविडोत्तर युगात कोण निर्माण करू शकेल? कोणाच्या व कशाच्या माध्यमातून?

शिक्षणक्षेत्रातील निर्मिती अध्यापन करणारे प्राध्यापक, शिक्षक हे अभ्यासक्रम शिकवण्याला बांधले आहेत. वाचन ही अभ्यासक्रम ांची प्राथमिकता नसून उत्तीर्ण होण्यापुरते आवश्यक तेवढेच, जुजुबी, वाचन, लेखन हे वाचनसंस्कृतीच्या प्रेरणा अधिकाधिक क्षीणच करत गेले आहे. क्षीण करत जाणार आहे.

कुटुंबामध्ये वाचनसंस्कृती रुजवण्याचे प्रयत्न करणाऱ्या मोजक्याच व्यक्ती, संस्था, कार्यकर्ते, समूह यांच्या प्रयत्नांकडे कौतुकाच्या, गौरवाच्या पातळीवरून बघ्यांसारखे बघण्यापलीकडे कुटुंबांनी काही केलेले नाही. त्यांच्याकडून घ्यायच्या वाचनप्रेरणा, संस्कार ग्रहण केलेली कुटुंबे संस्कार, पालक, व्यक्ती यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात असून नसल्याएवढी नगण्य आहे. ती कोविडोत्तरयुगात वाढण्याचे, वाढवण्याचे कोणतेच कारण, तसे कोणाचेच व कोणतेच नियोजन नसल्याने अस्तित्वातच नाही.

राजकीय नेते, जनप्रतिनिधी, लोकनेते, समाजनेते, समूह माध्यमातील चर्चा, मते, यांच्यातून वचान-प्रेरणांचा मोठ्या प्रम ाणावर प्रादुर्भाव होण्याचे कोणतेच कारण नसल्याने त्यांचा वाचनाशी नसणारा वा असल्यास अतिशय अपवादात्मक असणारा संबंध मोठ्या प्रमाणावर वाढेल अशी शक्यता दिसत नाही. चित्रपटातील, रंगभूमीवरचे, नाट्यकर्मी, चित्रपटातील नट, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, अभिनेते यांच्यात वाचक आहेत. एकरूप सारेच वाचतात असे नाही, मात्र प्रमाण आजच अत्यल्प आहे. कोविडोत्तर युगात त्यात वाढ होण्याचे काहीच कारण नाही.

घराघरातून एखादा पेपर वाचला जातो. दुसरा पेपर फारसा

कोणी घेत नाही. कोविडकाळात तोही बंद केला गेला आहे. घरांमधून कंटाळा घालवण्यासाठी, झोपेची आराधना करण्यासाठी, नातवांना-मुलांना गोष्टी सांगण्यापुरता, विविध पाककृतींसाठी, बागकाम इत्यादीसाठी थोडेफार वाचणारा वर्ग आहे. मात्र त्यातही ग्रंथ आणि वाचन व्यवहारावर अर्थव्यवस्थेचा झालेला परिणाम बघता घटच संभवते.

घरांमधून वैद्यकीय ग्रंथसंग्रह करणारा अतिशय दुर्मिळ असणारा ग्रंथसंग्राहक कोविडोत्तर युगात ग्रंथांच्या वाढणाऱ्या किमती तसेच विकत घेण्याची संपणारी क्षमता यामुळे अधिकच दुर्मिळ होत जाण्याची शक्यता आहे.

एखादी संस्कृती नष्ट करायची असेल तर लोक चांगली पुस्तके वाचणारच नाहीत एवढेच बघा, असे अनेकांनी म्हणून झाले आहे. वाचनाचे संस्कृतीमधील स्थान किती पायाभूत महत्त्वाचे आहे हे सांगणारे, ते म्हणणे, संस्कृती नष्ट झाली तरी चालेल पण वाचणार नाहीच या अपसंस्कृतीचे झालेल्या जगाला भावण्याचे कोविडोत्तर युगात अचानक काही चमत्कार घडेल आणि कारण उद्भवेल अशी कोणतीही शक्यता दिसत नाही.

वाचनाने ज्या क्षमता वाढतात, जो मेंदू तल्लख होतो, जो बौद्धिक क्षय रोखला जातो, ज्या शब्दसंग्रहात वाढ होते, या साऱ्याची समाजाला कोविडपूर्वकाळातच महती पटलेली नाही. 'थिंक बिफोर यू स्पीक' व 'रीड बिफोर यू थिंक' याच्या नेमके उलटे, विचार न करताच बोलण्याची व विचार करण्याआधी वाचण्याची गरजच संपुष्टात आलेले युग कोविडोत्तर काळात बदलले असेल असे समजण्याचे कारण नाही. याचे कारण वाचनाने जे जे लाभते ते लाभणारा समाज, विचार करणारा समाज हा व्यवस्थापित करायला गैरसोयीचा असतो. तो जेवढा कमी वाचणारा, कमी ठाऊक करून घेणारा, कमी विचार करणारा; किंबहुना मुळीच विचार न करणारा असेल व ज्याला केवळ विकत घेण्याइतपत वस्तूंची नावे, जाहिराती वाचता येत असतील तेवढ्यावरच बाजाराचे भागते. समाज व्यवस्थापकांचे तर अधिकच भागते. कोविडोत्तरयुगात तरी त्याला अकारणच वाचनप्रवृत्त तो कशाला करणार?


राजकारणाची, शिक्षणकारणाची, समाजकारणाची, अर्थकारणाची, बाजाराची, न वाचणारा समाज हीच जर प्राथमिकता असेल तर कोविडोत्तर युगात तरी मोठ्या प्रमाणावर वाचणारा समाज कसा निर्माण होणार आणि कोण करणार?

सुसंस्कृत, सभ्य, संस्कारी समाज हीच मुळात गरज असलेली नसल्याने व संस्कारीचा अर्थ विशिष्ट टोळ्या, गटांचेच तेवढे संस्कार एवढाच मर्यादित झालेला असल्याने व या मर्यादा नजीकच्या काळात दूर सारल्या जाण्याच्या शक्यता कमीच असल्याने कोविडोत्तर-युगातील वाचनसंस्कृती आजच्यापेक्षा फार भिन्न असल्याचे कोणतेच कारण सध्यातरी दिसत नाही.

**– डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com

ग्रंथाली

**भगवान इंगळे यांची आगामी तीन पुस्तके!**

| **ढोर** | **भिडू** | **उभारणी** |
|---|---|---|
|  |  |  |
| **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.** | **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.** | **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.** |

**प्रत्येकी मूळ २५० रुपये किमतीची ही पुस्तके सवलतीत प्रत्येकी १५० रुपयांत! तिन्ही पुस्तके एकत्रित घेतल्यास केवळ ३०० रुपयांत! टपालखर्च ५० रुपये वेगळा**



नीतीन रिंढे

# एकोणिसाव्या शतकात मराठी वाचकाचा उदय

**सोळाव्या** शतकात मुद्रणतंत्राचा शोध लागला त्यावेळी युरोपीय समाजात पुनरुज्जीवनवादी चळवळ सुरू होती. या चळवळीत ग्रीक तत्त्वज्ञान आणि संगीत, चित्र इत्यादी कला, भाषावाङ्मय यांच्या अभ्यासाला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. मुद्रित पुस्तकं या ज्ञानाची वाहक ठरली. त्यानंतर युरोपात सुरू झालेली प्रबोधनवादी चळवळ आणि आधुनिकता यांच्या प्रसारातही मुद्रित पुस्तकानं महत्त्वाची भूमिका बजावली. पुस्तकांशी असलेल्या अशा सुमारे पाचशे वर्षांच्या सहजीवनातून युरोपीय समाजात अत्यंत विकसित अशी पुस्तकसंस्कृती बहरली. युरोपीय समाजाच्या पुस्तक-वाचनामागे ज्ञान-माहितीची प्राप्ती, मनोरंजन, व्यक्तिमत्त्वविकास, नैतिक मूल्यांचे संस्कार अशा सर्व प्रेरणा तर होत्याच, शिवाय प्रकाशक, मुद्रक, विक्रेते, संग्रहालयं अशा व्यवस्था पुस्तक या वस्तूभोवती उभ्या राहिल्या. वाचनाबरोबरच एक वस्तू म्हणून पुस्तकाशी समाजाचं नातं जुळलं. पुस्तकाच्या वेष्टनावरील चित्रं, पुस्तकाची बांधणी, आकार, मजकुराची मांडणी या गोष्टीदेखील 'आस्वाद्य' बनल्या. त्यामुळे त्यात कलात्मकता आणि प्रयोगशीलता आली. पुस्तक ही संग्रहणीय आणि पुनःपुन्हा पाहण्या-वाचण्याजोगी वस्तू बनली.

पुस्तकं आणि त्याच्याशी संबंधित इतर वस्तू यांच्यात पाचशे वर्षांत उत्क्रांती होत गेली. उदाहरणार्थ, पुस्तकांचा संग्रह करण्यासाठी पुस्तकांची फडताळं ही चर्चमधल्या डेस्कपासून आकार बदलत बदलत तयार झाली. एकेकाळी सुट्या कागदांच्या रूपातली पुस्तकं दोन जाड पुठ्ठ्यांच्या मध्ये बांधली जाऊ लागली, तेव्हा पुस्तकाला 'ताठ कणा' मिळाला आणि फडताळात आडवं ठेवलं जाणारं पुस्तक 'उभं' झालं. या जाड पुठ्ठ्याला चामडं, कापड, कागद यांनी मंडित केलं जाऊ लागलं. कालांतरानं त्या जाड पुठ्ठ्यावर रंगीत, चित्रांकित वेष्टन (जॅकेट) आलं. फडताळात रांगेनं मांडलेल्या उभ्या अवस्थेतल्या पुस्तकांमध्ये हवं असलेलं पुस्तक ओळखू यावं यासाठी पुस्तकाच्या कण्यावर शीर्षक छापलं जाऊ लागलं. त्यानंतर विसाव्या शतकात संग्रहणीय अशा पुठ्ठाबांधणीच्या पुस्तकांची जागा, एकदा वाचून बाजूला टाकता येण्याजोग्या (युज अँड थ्रो?) स्वस्त अशा कागदी बांधणीच्या (पेपर बॅक) पुस्तकांनी घेतली. या सगळ्या अवस्थांमधून जाताना पुस्तक आणि त्याचे वाचक, संग्राहक यांच्यात जुळलेल्या नात्याचं स्वरूप बदलत गेलं. वाचनापलीकडे एक सुंदर किंवा आवडती वस्तू म्हणून पुस्तक जपलं जाऊ लागलं. पुस्तकाच्या वेष्टनावरचं चित्र, पुस्तकावरची लेखकाची सही, पुस्तक छापताना किंवा बांधताना त्यात राहून गेलेल्या त्रुटी, पुस्तकाचे आकार, विषय अशा वाचनबाह्य गोष्टींमुळेदेखील पुस्तकं संग्राह्य ठरली. पुस्तकं जमवणं, त्यांना जिवापाड जपणं हा छंद व्यसनाच्या पातळीवर गेला आणि पुस्तकवेड जन्माला आलं.

### पुस्तकछपाईला सुरुवात

मराठी समाजाचं वाचक म्हणून छापील पुस्तकांशी असलेलं नातं सुमारे दोनशेहूनही अधिक वर्षांचं आहे. अठराव्या शतकात मुंबईत पोर्तुगीज आणि इंग्रजी भाषेत वर्तमानपत्रं छापली गेल्याचा उल्लेख आहे, पण मराठी नाही. मराठीतलं पहिलं पुस्तक १८०५ मध्ये कलकत्त्याजवळच्या सेरामपूर इथं आणि दक्षिण भारतात तंजावर इथं एकाच वेळी छापलं गेलं. सेरामपूरला विल्यम कॅरे या स्कॉटिश मिशनऱ्यानं मराठीत पुस्तक छापलं. तर तंजावरला सरफोजीराजे भोसले यांच्या सरस्वती महाल या ग्रंथालयात मराठीत पुस्तक छापलं गेलं; सांगलीकर पटवर्धनांच्या पदरी असलेल्या कारागिरांनी लाकडी व धातूच्या ठशांचा वापर करून भगवद्गीता छापण्याचा प्रयोग करून पाहिला. परंतु महाराष्ट्राच्या भूमीत मराठी पुस्तकं छापण्याचा उद्योग खऱ्या अर्थानं सुरू झाला तो १८१५-१६च्या सुमारास, अमेरिकन मिशन या ख्रिस्ती धर्मप्रसार करणाऱ्या संस्थेकडून. त्यापूर्वी

महाराष्ट्राशेजारच्या गोव्यात ख्रिस्ती मिशनरी सोळाव्या शतकापासून पोर्तुगीज भाषेतली पुस्तकं छापत होते. सतराव्या शतकात तिथं रोमन लिपीत मराठी आणि कोकणी भाषेतली पुस्तकंही छापली जाऊ लागली. ही पुस्तकं एतद्देशियांमध्ये धर्मप्रसारासाठी वापरली जात होती. फादर स्टीफन्स यानं लिहिलेल्या 'ख्रिस्तपुराण' या रोमन लिपीत छापलेल्या मराठी पुस्तकाच्या प्रती सतराव्या शतकात वसई व कोकण परिसरातल्या अनेक मराठी घरांमध्ये होत्या. हिंदूंच्या आख्यानांप्रमाणे धर्मांतरित ख्रिस्ती कुटुंबांमध्ये या पुस्तकाचीही पारायणं व्हायची.

'पेशवाईच्या अखेरीस दुसरा बाजीराव पुण्यातून पळून गेल्यानंतर ३१ जानेवारी १८१८ रोजी लेफ्टनंट कर्नल फिट्झक्लॅरेन्स हा इंग्रज सेनाधिकारी शनिवारवाड्यात शिरला. तेव्हा त्याला एका दालनात कोरीव नक्षीकाम केलेल्या इंग्रजी ग्रंथांचा संग्रह दिसला' असं द. ब. पारसनीस यांनी लिहून ठेवलं आहे. ही इंग्रजी पुस्तकं बहुधा पेशवे दरबारी असलेल्या चार्ल्स मॅलेटसारख्या इंग्रज वकिलांनी पेशव्यांना भेट दिली असावीत. पुस्तकांव्यतिरिक्त या वकिलांनी दिलेले पृथ्वीगोल, होकायंत्र, नकाशे अशा तत्कालीन मराठी समाजाला 'चित्तचक्षुचमत्कारिक' वाटू शकणाऱ्या वस्तूही शनिवारवाड्यात होत्या. या वस्तूंप्रमाणेच इंग्रजी पुस्तकंही पेशवे आणि त्यांच्या कारभाऱ्यांसाठी 'चित्तचक्षुचमत्कारिक'च राहिली असावीत बहुधा. ती कोणी वाचली असतील याविषयी शंकाच आहे.

**आधुनिक 'वाचका'चा उदय**

अशा प्रकारे पुस्तकं १८०५पूर्वीच्या महाराष्ट्रातही होती, पण महाराष्ट्रीयांमध्ये पुस्तक वाचणारा वर्ग मात्र इंग्रजांनी एकोणिसाव्या शतकात औपचारिक शिक्षणाची नवी व्यवस्था निर्माण केल्यानंतरच तयार झाला. पुस्तकांचं वाचन हे व्यावसायिक कारणांसाठी, वैयक्तिक विकासासाठी आणि करमणुकीसाठीदेखील आवश्यक बनतं तेव्हा त्या समाजात असा वाचकवर्ग जन्माला येतो. इंग्रजपूर्व काळात समाजात साक्षरता तर नव्हतीच; पण अल्पसंख्य साक्षरांना पुस्तक वाचायला मिळणं हीदेखील सहजसाध्य गोष्ट नव्हती. मुद्रणपूर्व काळात पुस्तक नकलून घेणं हे वेळखाऊ व खर्चीक काम होतं. त्यामुळे पुस्तकांचा प्रसार होणं अशक्य होतं. इंग्रजांच्या राज्यात आधुनिक शिक्षण घेणाऱ्यांना शिक्षण, न्याय, महसूल इत्यादी खात्यांतल्या चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, दक्षिणा प्राइज कमिटीसारख्या संस्थांमार्फत पुस्तकं लिहिण्यासाठी मिळणारं मानधन इत्यादी व्यावसायिक संधी नव्यानं उपलब्ध झाल्या. व्यक्तीच्या नैतिक विकासासाठी नैतिक मूल्यांचं ज्ञान, जगाचा इतिहास, धर्म यांचं ज्ञान प्राप्त करून घेण्याची निकड वाटू लागली. ज्याला यातलं काही नको होतं अशा सर्वसाधारण साक्षर मनुष्याला करमणुकीसाठी कादंबरीसारखं एक नवं माध्यम उपलब्ध झालं. आणि या सर्वांसाठी मुद्रित स्वरूपातली पुस्तकं हस्तलिखितांच्या तुलनेनं स्वस्तात व सहजपणे उपलब्ध होऊ लागली. त्यामुळे समाजात वाचकवर्ग वाढीला लागला. एकोणिसाव्या शतकातल्या या महाराष्ट्रीय वाचकवर्गाविषयी दोन तथ्यं लक्षात घ्यावी लागतात. एक म्हणजे, हा वाचक प्रामुख्याने ब्राह्मण आणि काही मध्यमजातींच्या लोकांनी बनलेला होता. कारण तेच आधुनिक शिक्षणाचे पहिले लाभार्थी होते. आणि दुसरं म्हणजे, विविध प्रकारचं आधुनिक ज्ञान प्राप्त करण्याची प्रमुख प्रेरणा त्यांच्या वाचनामागे होती. या दोन्ही तथ्यांचा प्रभाव एकोणिसाव्या शतकाच्या महाराष्ट्रीय वाचनसंस्कृतीवर पडला.

**वाचकवर्ग विस्तारण्यातल्या अडचणी**

एकोणिसाव्या शतकातली महाराष्ट्रीय वाचनसंस्कृती जाणून घेण्याचं प्रमुख साधन म्हणजे त्या शतकात जगून गेलेल्या समाजधुरीणांची चरित्रं आणि आत्मचरित्रं. बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, दादोबा पांडुरंग, बाबा पदमनजी, हरी केशवजी, ह.ना. आपटे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, माधवराव रानडे या सर्वांसाठी पुस्तक हे स्वविकास आणि समाजविकास या दोहोंचंही साधन होतं. इंग्रजी शिक्षणप्रणालीच्या माध्यमातून जगाचं आणि विविध शास्त्रांचं ज्ञान या लोकांना खुलं झालं. पुस्तक हे त्यांचं माध्यम होतं. आपल्याला झालेलं ज्ञान आपल्या इतर समाजबांधवांनाही व्हावं या हेतूनं यातल्या बहुतेकांनी लेखन केलं, म्हणजे पुस्तक हेच माध्यम वापरलं. या लेखकांना त्यांच्या घरातून मिळालेले पारंपरिक धार्मिक, पौराणिक पुस्तकांचे संस्कार, त्यानंतर मिशनरी किंवा सरकारी शाळांत आणि विद्यापीठीय शिक्षणात अभ्यासक्रम व त्याबाहेरील उपलब्ध झालेली पुस्तकं यांनी त्यांच्या वाचनाच्या सवयी आणि अभिरुची यांना आकार दिला. वाचनाच्या या पर्यावरणापासून मध्यम व कनिष्ठ जातींनी बनलेला समुदाय बराच दूर होता.

महाराष्ट्रीय वाचनसंस्कृतीला पडलेली उच्चवर्णीयत्वाची मर्यादा मोडून ही वाचनसंस्कृती व्यापक करण्याचे प्रयत्न महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळीतल्या इतर नेते-कार्यकर्त्यांनी केले. परंपरेनं शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजात असलेल्या वाचकवर्गाच्या अभावामुळे, महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधकांच्या पहिल्या पिढीतल्या लेखकांना आपलं लिखाण वाचलं जावं यासाठी फार परिश्रम करावे लागले. पुस्तकांच्या मुद्रण-वितरणाच्या साधनांची मालकी बहुजनांकडे नसल्यानंदेखील त्यांना बराच संघर्ष करावा लागला. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकाचं हस्तलिखित १८८३ मध्ये तयार केलं, पण त्यातल्या स्फोटक आशयामुळे प्रस्थापित मुद्रणालयं तर सोडा, सत्यशोधक चळवळीशी संबंधित मंडळीही ते पुस्तक छापायला उत्सुक नव्हती. अर्थात, पुस्तक छापलं जात नाही म्हणून फुले गप्प बसले नाहीत. त्यांनी त्या पुस्तकाच्या हस्तलिखित प्रती नकलवून त्या अनेकांना वाचायला दिल्या. सयाजीराव गायकवाड महाराजांपासून तो पुणे, मुंबई, ठाणे, जुन्नर, ओतूर, हडपसर, वांगणी अशा लहानमोठ्या गावांतल्या शूद्रांसमोर या पुस्तकाचं अनेक वेळा स्वतः जाहीर वाचन केलं. म्हणजे मुद्रित पुस्तकांच्या युगात महात्मा फुले यांना

विचारप्रसारासाठी हस्तलिखित आणि मौखिक परंपरेचा मार्ग पत्करावा लागला. सन १८७७ मध्ये कृष्णराव भालेकर यांनी सुरू केलेल्या 'दीनबंधू' या नियतकालिकाला अवघे १३ वर्गणीदार मिळाले. पुढल्या तीन वर्षांत ही संख्या ३८० पर्यंत पोहोचू शकली. या नियतकालिकामुळे भालेकरांवर कर्जाचा डोंगर चढला. तरी अगदी आयुष्याच्या अखेरच्या काळातदेखील बहुजन समाजात आधुनिक विचार प्रसारित करण्यासाठी नियतकालिक काढण्याची त्यांची ऊर्मी तितकीच तीव्र होती. कोण्या ख्रिस्ती मंडळींनी जुना छापखाना देण्याच्या बदल्यात भालेकरांना ख्रिस्ती होण्याची अट घातली, तेव्हा तेवढ्यासाठी धर्मांतर करण्याचीदेखील त्यांनी तयारी दाखवली होती. सीताराम रायकर संपादित 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' या पुस्तकात ही संपूर्ण हकिगत सांगितलेली आहे. एकोणिसाव्या शतकातल्या सत्यशोधकांनी वाचकवर्ग निर्माण करण्यासाठी केलेल्या या प्रयत्नांना काही प्रमाणात तरी यश मिळालं, असं म्हणावं लागेल. कारण विसाव्या शतकाच्या तिसऱ्या-चौथ्या दशकात घडलेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्षात दोन्ही पक्षांकडून पुस्तक हे प्रतिपक्षाशी प्रतिकाराचं एक परिणामकारक साधन म्हणून वापरलं गेलं. पुण्यातल्या गणेशोत्सव मेळ्यातल्या पदांना उत्तर म्हणून ब्राह्मणेतर चळवळीच्या लोकांनी छत्रपती मेळ्यातल्या पदांच्या पुस्तिका छापून वाटल्या. टिळक-चिपळूणकर यांच्यावर टीका करणारी 'देशाचे दुष्मन' ही पुस्तिका दिनकरराव जवळकर यांनी लिहिल्यानंतर त्याला उत्तर म्हणून महात्मा फुले यांच्यावर टीका करणारी 'सत्यशोधक की ख्रिस्तशोधक' ही पुस्तिका सनातन्यांनी पुण्यात वाटली. परंपरावादी आणि सत्यशोधक या दोन्ही पक्षांकडून परस्परांच्या भूमिका खोडून काढण्यासाठी कादंबरीसारख्या साहित्यप्रकाराचा वापरही कसा झाला, हे त्या काळात प्रकाशित झालेल्या 'ब्रह्मद्वेष अथवा बेलगामी ब्राह्मणेतर' (नरहर ढोले) आणि 'ढब्बाशास्त्री परान्ने' (मुकुंदराव पाटील) या कादंबऱ्यांवरून स्पष्ट होतं.

**वाचन-अभिरुचीचा विस्तार**


थोडक्यात, एकोणिसाव्या शतकातल्या परमहंस सभेपासून विसाव्या शतकातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातल्या दलितमुक्ती चळवळीपर्यंत, परंपरेची चिकित्सा आणि सुधारकी विचारांचं, प्रबोधन-मूल्यांचं रोपण करण्याचा उपक्रम महाराष्ट्रीय समाजात सुरू होता आणि या उपक्रमांनीच इथल्या सर्व सामाजिक स्तरांमधल्या वाचनसंस्कृतीला आकार दिला. अर्थात, कोणत्याही काळातल्या किंवा समाजातल्या वाचनसंस्कृतीत गंभीर साहित्यापेक्षा लोकप्रिय साहित्य अधिक वाचलं जातं. एकोणिसाव्या शतकातल्या मराठीतदेखील अद्भुतरम्य, मनोरंजक साहित्य अधिक लोकप्रिय होतं. १८६३ पर्यंत मुंबई राज्यात प्रकाशित झालेल्या कोणत्याही क्रमिक, वैचारिक अगर धार्मिक पुस्तकापेक्षा 'वेताळपंचविशी' आणि 'सिंहासनबत्तिशी' ही दोन पुस्तकं सर्वाधिक वेळा छापली गेली. पुण्याच्या नेटिव्ह लायब्ररीचा व्यवस्थापक १८५५ मध्ये वि.ना. मंडलिकांना सांगतो, '' 'लंदनच्या लोकांचें रहस्य' या मालेंतील पुस्तकें इतक्या वेळा वाचलीं जातात कीं तीं दोन वेळां बांधून झाली; म्हणजे हल्लींची त्यांची बांधणी तिसरी आहे. ही 'लंदनच्या लोकांचें रहस्य' मालिका म्हणजे इंग्रजीतल्या रेनॉल्ड्स या लेखकाच्या कादंबऱ्यांची भाषांतरं.''

अशा प्रकारचं मनोरंजक साहित्य वाचलं जाणं ही वाचकवर्गाच्या संख्यात्मक वाढीच्या दृष्टीनं आवश्यक गोष्ट असते. ही जबाबदारी या साहित्यानं पार पाडली असं म्हणता येईल. पण, ज्ञानलालसेनं प्रेरित झालेल्या एकोणिसाव्या शतकातल्या महाराष्ट्रीय वाचनसंस्कृतीत अशा प्रकारच्या लोकप्रिय साहित्याच्या लेखन-वाचनाला बराच काळ प्रतिष्ठा मिळाली नाही. दादोबा पांडुरंग सुरतेच्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करत असताना १८४३ मध्ये तिथला मुख्याध्यापक हेन्री ग्रीन यानं त्यांना सर्वप्रथम इंग्रजी कादंबरीचा परिचय करून दिला. ग्रीन पहिल्यांदा दादोबांकडे आला तेव्हा एका हिंदू गृहस्थानं केलेला ख्रिस्ती धर्मावरच्या पुस्तकांचा भलामोठा संग्रह पाहून तो अवाक् झाला. कदाचित, दादोबांवरच्या ख्रिस्ती धर्मप्रभावावर उतारा म्हणून असेल, त्या अज्ञेयवादी इंग्रज गृहस्थानं दादोबांना वॉल्टर स्कॉट, चार्ल्स डिकन्स यांच्या कादंबऱ्यांची गोडी लावली. हेन्री ग्रीननं इंग्रजी कादंबरीचं हे 'रसभरित' क्षेत्र दाखवून आपल्यावर उपकारच केले असं दादोबांनी आपल्या आत्मकथनात म्हटलं आहे. अगदी विसाव्या शतकातले प्रथितयश नाटककार आणि कादंबरीकार श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचाही अनुभव असा, की त्यांची प्रतिभा आणि विवेकशक्ती ते नाटकं आणि कादंबऱ्या लिहून वाया घालवत आहेत; कोल्हटकरांनी त्याऐवजी सामाजिक तत्त्वज्ञानावर लिहिलं पाहिजे असं लोकमान्य टिळक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांचंही म्हणणं होतं. विद्वान विचारवंतांनी नाटक-कादंबरीसारख्या ललित साहित्याला असं गौण लेखलं तरी या साहित्याचा वाचकवर्ग येथून पुढच्या काळात वाढत गेला आणि या साहित्यानंच खऱ्या अर्थानं मराठी शिक्षित समाजाला वाचनाची गोडी लावली. एकोणिसाव्या शकातल्या बहुतांश चरित्र-आत्मचरित्रांमध्ये पुस्तकांविषयी, वाचनाविषयी विशेष आत्मीयतेनं लिहिलेलं दिसतं, याचं हेच कारण आहे. एकोणिसाव्या शतकातल्या समाजात पुस्तक हे नव्या काळाचं माध्यम होतं. त्या माध्यमाचा प्रभाव मराठी समाजावर कसा पडला याची थोडक्यात हकिगत अशी आहे.

**– नीतीन रिंढे**

भ्रमणध्वनी : ७७३८३१६२६२

neegrind@gmail.com



राजू बावीस्कर

# माझी चित्रे : वेदनेच्या जाणिवांचे वाहक

**कोणत्याही** नैसर्गिक ठिकाणाच्या जागी झाडे, वेली, अनेक पक्षी, प्राणी या सर्वांची काळजी घेणारा खरा साथीदार हा निसर्गच असतो आणि त्या त्या निसर्गाच्या कुशीत राहणारे घटक तिथल्या ऋतूंना समजून घेत त्या मातीला घट्ट धरून ठेवत स्वतःच जगण्याचं बळ शोधत आसतात. तसंच काहीसं बहुतेक गावाबाहेर जगणाऱ्या समाजाचं, माणसांचं म्हणता येईल. त्याचाही पोटापाण्याचा प्रश्न निसर्गच निमूटपणे सोडवतो हे मात्र निश्चितपणे अनुभवायला आलं. माझ्यासारख्या हजारो मुलामुलींनी हे अनुभवलं असणार हे नाकारता येत नाही. निसर्ग ठेवेल, तो देईल त्याच्या आधारानं जगणं ही व्यवस्था म्हणजे सर्व गावातील सर्वात शेवटच्या जातवर्गाच्या वाट्याला आलेली आणि पिढ्यान्‌पिढ्या गावाबाहेर तिचं जगणं सांगणारी, या माणसांनी आयुष्यभर निमुटपणे काम करावं आणि शेवटी कुणाच्याच लक्ष्यात राहणार नाही असा जगाचा निरोप घ्यावा, अशी ही चेहरा नसलेली माणसं गावाबाहेर बऱ्याच अंतरावर झोपडपट्टीत खालच्या नजरेनं जगताना आपल्याला नक्कीच सापडतील त्यांची फारशी काही तक्रारही नसते जगण्याविषयी आणि कोणाविषयी काही म्हणणंही नसतं त्याच्या कष्ट उपसणाऱ्या हाताचं. आम्हालाही असाच कष्टाचा सूर कायम झोपड्यांमधून एकदुसऱ्याला दुःखाचा आवाज देत होता. हा दुःखाचा, भुकेचा सूर घेऊन फिरणाऱ्या झोपड्यांच्या आवाजात माझं बालपण फिरत होतं, जे जन्मानं मिळालं ते कुणालाही नाकारता आलं नाही. मलाही नाही. जन्मानं मिळालेली जात नाकारता आली असती तर माझ्यासारख्या हजारो मुलांनी निश्चितपणे जन्माआधी नाकारली असती.

माझं खान्देशातील चोपडा तालुक्यातील लासुर हे गाव अगदीच सातपुड्याच्या डोंगरानं कवेत घेतलेलं तसं या गावाला एक एतिहासिक वारसाही आहे, ठोक्याचं लासुर या नावानंही आमच्या गावाची ओळख नेहमी मला इतिहासाच्या पानात असल्यासारखी वाटते.

२ जानेवारी १९६४ या दिवशी माझा जन्म याच गावात झाला. तोही बाजारात असणाऱ्या धर्मशाळेत. आधी गावाच्या फॉरेस्टच्या जवळ भिल्ल, तडवी, मांग अशी छोटी वस्ती. यात झोपडीसाठी जागा मिळाली आणि हळूहळू गाव वाढत गेल्यावर ही मारामाऱ्या, चोऱ्या, व्यसनांची घाण नकोच म्हणून हळूहळू गावातील लोकांनीच या जागा विकत घेतल्या. आणि गावापासून उत्तरेला दोन किलोमीटर अंतरावर सातपुड्याच्या अगदी बगलेत, त्याच्या पायाजवळ एकएक करत सर्वच माणसं गावाबाहेर राहणाऱ्यामध्ये येत गेली, त्याबरोबरच आमची झोपडीही इथे बांधली गेली.


या गावाची जातीनं वडिलांना मिळालेली वतनदारी होती. मुळात वतनदारी शब्दच ऐकताना मोठा आणि वजनदार वाटतो पण या वतनदारीचं काम बघितलं तर मात्र सर्व हीन दर्जाचं होतं. गावात कुत्रंमांजर मेलं तर त्याला गावाबाहेर फेकणं, गुरेढोरं मेली की त्यांच कातडं फाडून काढणं आणि त्याला चांभारवाड्यात विकणं, मौतेला डफडं वाजवणं, अमावास्या ग्रहण मागणं, आणि रात्रीदिवसा अशा दोन वेळा गावात पोट भरण्यासाठी भाकरी मागणं हे सर्व गावकीचं काम पिढीजात वडिलांच्या वतनदारी म्हणून वाट्याला आलं होतं. अर्थात ही सर्व कामं माझ्याही वाट्याला जन्मानं आलीच होती, जे जन्मानं येतं ते नाकारता येत नाही अशा हजारो परंपरांपैकी ही परंपरा माझ्याही पुरुष म्हणून वाट्याला आली होतीच. बांबूपासून डालक्या, टोपल्या बनवणं हा धंदाही तसा हाडांना शरीरात कष्टाचं पाणी करून आयुष्य सडवणारा. तो समाजातील प्रत्येक स्त्रीचा तसाच आईच्याही डोक्यावर जातीनं घेतलेल्या पदरासारखा कायम होताच बँड वाजवणं हे आमच्याच घरी नाही तर आमच्या समाजाला गळ्यात लोढणं बांधून जगणं हे पिढ्यान्‌पिढ्या गरिबीसह घाण्याच्या बैलांसारखं जोडीचं जगणं माझ्याही वाट्याला आयुष्यभर पोट भरण्यासाठी वाट्याला आलंच होत. याचबरोबर गावाबाहेर असणारं


हे झोपड्यांचं ठिकाण म्हणजे बऱ्याच व्यसनांचा बाजार. गावातील बरीच चांगल्या घरातील लोकं या बाजारात दिवाबत्तीची वेळ शोधत झोपड्यांकडे येताना दिसायची. मांग, भिल्ल, महार, होतीच पण मुसलमान, पावरा या समाजातील दोन-तीन कुटुंबं होती. अशी ही सर्व भिलाटी पोटाला दिवसभर भुकेची गाठ मारून कष्ट करणाऱ्या लोकांची वस्ती होती.

घरात चित्रकलेचा वारसा या गोष्टींचा लांबलांबपर्यंत कुठलाही सबंध नव्हता आणि भिलाटीत सर्वच शिक्षणाच्या पाटीवर पोटाच्या भुकेनं खाडखोड करून ठेवली होती म्हणून इतर मुलांप्रमाणे माझाही शाळेशी कुठलाही सबंध येत नव्हता. दुसरीचा वर्ग सोडून दोनतीन वर्षं झाली होती. डोंगरदऱ्या, पहाडात मिळेल ते खाऊन पोटात टाकणं असं लहानपणी चाललेलं दिवसाचं चक्र सकाळचा सूर्य आमचं बोट धरून भिलाटीतील सर्व मुलांना डोंगरात अंधार पडेपर्यंत फिरून आणायचा. या भिलाटीत येऊन तीन-चार वर्षं झाली होती. गावाच्या दक्षिणेकडे इंदिरा आवास योजनेत भिलाटीतील लोकांना घरं मिळायला सुरुवात झाली तेव्हा वडिलांनाही या बेघर वस्तीत अगदी मध्यभागी जागा मिळाली आणि माझ्यासोबत असणाऱ्या सर्व भिलाटीतील मित्रांच्या वडिलांना थोड्या अंतरावर घर मिळाल्यानं ताटातूट होत गेली. अर्थत त्यांची सोबत कमी झाली. परंतु आमच्या घराच्या आजूबाजूला माझ्यापेक्षा लहानमोठ्या वयाची पोरंपोरी सकाळीच शाळेत जाताना दिसायची, हे दृश्य भिलाटीपेक्षा खूप असल्यानं त्यांच्याकडे बघून हळूहळू मलाही वाटायला लागलं की आपणही शाळेत जावं. वडिलांच्या मागे लागून शेवटी माझं नाव चौथीच्या वर्गात वयाप्रमाणे घातलं. या वर्गात शिक्षणाची दोरी पक्की होताना मलाही दिसत होती, वर्गात असताना मनाच्या आत असलेल्या कलेची तिरीप अधिकच प्रकाशासारखी जाणवत गेली. वर्गात मुलांच्या वह्यांवर पाठ्यपुस्तकातील चित्रं काढून देणं हे हळूहळू जास्तच आवडीचं वाटत असल्यानं त्यातील चित्र बऱ्यापैकी वास्तव होत होती, त्याचं मार्गानं चित्र आपल्याला आपली ओळख देत आहेत, याची पुढे जाणीव होत गेली. पुढच्या वर्गात जात जात गावातील पानटपऱ्या, इतर दुकानं यांच्या लोखंडी गंजलेल्या पत्र्यावर तोंडपाठ केलेले देवदेवतांचे, हिरोहिरॉईनचे चित्र काढत गेलो. गावात कुणाकडे लग्न असलं की त्याच्या घराला दिलेल्या आकाशी रंगावर निळीमध्ये गोंद टाकून घराच्या आतबाहेर चित्र, डिझाईन, शुभलाभ, शुभविवाह हे सर्व सजवण्यासाठी हमखास बोलावलं जायचं. ज्यांच्या घराच्या पायऱ्यांजवळ उभं राहून भाकरी मागायचो, ज्या घराच्या आत मात्र जातीमुळे कधीच पोचता आलं नव्हतं, अशा घराच्या पायऱ्या चित्रकलेमुळे चढता आल्या ही गोष्ट जात पुसून जवळ जाणारी वाटली. त्यातून कधी कधी दोन पैसे मिळण्याची सुरुवातही झाली. दुकानांचे साईनबोर्ड करणं अशा कामातून बऱ्यापैकी गावात स्वतःची ओळख होत गेली.

बाबू मांगना पोऱ्या चित्र काडामा गहिरा हुस्यार से हे शब्द सातवीच्या वर्गाला पोचेपर्यंत गावात सर्वांच्या तोंडात सहज खेळते झाले होते.

शाळेत माझ्यापेक्षा भरपूर हुशार मुलं होती, परंतु त्यांना फक्त शाळेपुरता मान मिळायचा. माझ्या बाबतीत मात्र वेगळं होतं. मला





चित्रांमुळे सर्व गाव ओळखायचं आणि शाळेतील शिक्षक, मुलं-मुली हे तर अगदी जवळ करायचे. हे माझ्यासाठी नवं होतं. त्यामुळे ६०-६५ टक्क्यांनी वर्गात पहिल्या येणाऱ्या मुलांपेक्षा म हत्त्वाचं वाटत गेलं. फेब्रुवारी महिन्यापासून बंड्याचं सीझन सुरू झालं की जूनपर्यंत असा हा कुटुंबाच्या कष्टाचा चढउतार अनुभवत जाणं जातीनं स्वतःला जन्म ापासून पाचवीला पूजलेली गोष्ट होती. ती फक्त शिक्षणानंच नाकारता येऊ शकते हे हळूहळू लक्षात येत गेलं. दहावीत असताना आमच्याच वर्गातील काही मुलींच्या लग्नात स्वतः बँड वाजवला, दहावीपर्यंत शिक्षण गावातच झालं त्या वेळेला चित्रकलेला साथ देणारे राजू महाजन, विजय लुल्हे असे काही मित्रही लाभले आणि शिक्षकही. चित्रकला शिक्षक आर. टी. पवारसर तर स्वखर्चानं तालुक्यावर विविध चित्रकलास्पर्धेला घेऊन जात होते. त्यामुळेच माझ्या चित्रातील खऱ्या आकारांना प्रोत्साहन मिळत गेलं. दहावीच्या वर्गात येण्याआधीच चित्रकला महाविद्यालयाविषयी मित्राकडून, शिक्षकांकडून माहिती होतीच, म्हणून हे वर्ष पास होणं माझ्यासाठी महत्त्वाचं होतं.




जैन फाऊंडेशनचे अशोक जैन सत्कार करताना

त्या वर्षी दहावीचा मार्ग मोकळा झाला आणि 'सप्तपुत चित्रकला महाविद्यालय खिरोदा' इथे प्रवेश मिळाला. या कॉलेजच्या पहिल्याच वर्षी वर्गात काम चांगलं असल्यानं त्या कामानं तिथल्या प्राध्यापकांच्या नजरेत आणि मनात माझ्या चित्रांनी मी जागा करत होतोच. त्यामुळे त्यांनी माझ्या कामाला अधिक मोकळं केलं. प्रा. गुलजार गवळी, प्रा. प्रकाश तांबटकर, प्रा. सी.एन. पाटील, मनोहरगुरुजी अशा महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रातील स्वतःच्या कामानं नाव कमवलेल्या या सर्व गुरुवर्याचे मार्गदर्शन लाभले त्यामुळे अधिक जोमाने चित्रकलेचा अभ्यास आणि काम करत होतो यातूनच एक झालं, की कलेतील ॲकडेमिक शिक्षण घेताघेता, स्पर्धात्मक कलाक्षेत्राची ओळख होत गेली, म्हणून इथं 'एटीडी' उत्तीर्ण होऊन याच क्षेत्रातील उपयोजित कलेसाठी शासकीय चित्रकला महाविद्यालय औरंगाबाद इथे काही वर्षे शिक्षण घेतलं, शिक्षण घेत असतानाच घरच्यांकडून नोकरीचा आग्रह सतावत होता. औरंगाबादला शिकत असताना जळगांवसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी आपल्या कामाच्या बळावर नोकरी मिळत असल्यानं मीही या गोष्टीला तयारी दर्शवली, कारण माझे मोठे भाऊ मी दहावीत असताना गावाच्या महात्मा गांधी विद्यालयात बी.ए., बी.एड शिक्षण घेऊन नोकरीला होते आणि आता मीही नोकरीला लागलो तर घरातील अडचणी अधिक दूर होतील हे विचारही मनाला योग्य दिशेनं घेऊन जाणारे वाटले. कलेतील पुढील शिक्षण महाग होतंच, त्या शिक्षणाला कोणत्याही माझ्यासारख्या साधारण घरातील मुलगा निश्चितच ताणतणावात जाताना मला दिसायचा, तशीच अवस्था माझीही झाल्यानं पुढील शिक्षण महत्त्वाचं वाटत असूनही शेवटी नोकरी महत्त्वाची वाटली. पी.एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय पिंप्राळा, जळगावला १९८९ सालची कलाशिक्षकाची नोकरी म ाझ्यासाठी महत्त्वाची ठरली. यात एक तर घराला खूप मोठा आधार मिळणार होता आणि मला चित्रकलेत कामही करता येणार होतं, ज्या शाळेत नोकरी मिळाली त्याच शाळेत महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले कवी नीळकंठ महाजन हे इंग्रजी विषयाचे शिक्षक होते, त्यांचा महाराष्ट्रभर मराठीत दर्जेदार लिहिणाऱ्या साहित्यिकांशी असलेला मित्रगोतावळा हा हळूहळू काही प्रमाणात माझाही झाला. जवळपास १९९० च्या आधी शेगाव येथील 'शब्दवेद' या साहित्यातील नियतकालिकेनं माझी रेखाटनं पहिल्यांदा छापली आणि त्यानंतर साहित्यिक चळवळीतील नामांकित दिवाळी अंक 'हंस' यातून छापून आली. या रेखाटनांतून ओळख साहित्यिक क्षेत्रात माझ्या चित्रांसाठी खूप महत्त्वाची होती. त्यानंतर अनुष्टुभ, अंतर्नाद, शब्दवेद, वाटसरू, अनुभव, कवितारती, लोकवाङ्मयवृत्त, युगवाणी, दर्शन, मुरळी, यांसारख्या अनेक नियतकालिकांमध्ये, दिवाळी अंकांत चित्रं छापून येत होती आणि हे अंक माझ्या चित्रांना नवीन ओळख मिळवून देत होते. सांगलीचे बाळासाहेब पाटील यांनी चित्रकलेच्या चळवळीसाठी १९९३ पासून जोमानं उभं केलेलं काम माझ्या चित्रांसाठी खूप महत्त्वाचं ठरलं. 'अन्वयार्थ' हा अंक माझ्या रेखाटनांना, चित्रांना अतिशय महत्त्वाचा याकरता ठरला की यात सर्व शहरी, महानगरी, नामांकित चित्रकारांचे लेख, चित्रं छापून येत होती, त्यात माझी रेखाटनं ही गावगाड्याची, ती चित्रं सर्वांना वेगळी वाटणारी ठरत असल्यानं त्या रेखाटनांची व्याख्या इतर चित्रकारांमध्ये मनोरंजनाच्या पलीकडे जाऊन वेदनेची व्याख्या होत गेली. माझ्या मते चित्र एक तर परमोच्च आनंदाचं असू शकतं किंवा वेदनेचं. या पलीकडेही काही चित्रं असतील तर ते मला माहीत नाही.

खान्देश म्हटलं की आधीपासूनच कवी कलावंतांची भूमी. मुक्ताईपासून कवयित्री बहिणाबाई चौधरी, भालचंद्र नेमाडे, ना.धों. महानोर, नीलकंठ महाजन अशा खूप कलावंतांचा वारसा सांगत जाणारी ही जमीन. त्यातच महाजनसरांबरोबर मी नोकरीला असल्यानं शब्दवेदचा ग्रुप, कवी अशोक कोतवाल, मंगेश काळे, श्रीकांत देशमुख, दिवाकर चौधरी अशा अनेक साहित्यिकांच्या वाचनाच्या गप्पा कानावरून जात होत्या. काय वाचावं, कोणते साहित्यिक अंक कलेच्या चळवळीचे या सर्व गोष्टी माझ्या चित्रांसह स्वतः ला समजून घेण्याचं मुख्य दार ठरत होत्या. त्यातूनच चित्रात होणारे

बदल स्वतः अनुभवत गेलो. शहरातील निसर्गचित्रांचा अभ्यास, स्केचिंग हे सारं सातत्यानं पाच वर्षांपेक्षा जास्त काळ करत गेलो. त्यामुळे चित्रांना अनेक बक्षिसंही मिळाली. नाट्यकर्मी शंभू पाटील यांची कलेतील वैचारिक बैठक माझ्यासाठी खूप महत्त्वाची म्हणता येईल. ते प्रत्येक कलेत नवविचारांची मांडणी करत असल्यामुळे त्या दिशेनं माझा चित्राकडे, कलेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. जळगावच्या भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या माध्यमातून माझ्या कामामुळे शंभू पाटील यांनी फेलोसिफ मिळवून दिली. त्यातून अखिल भारतीय साहित्य संमेलनात नाशिक येथे दुसर चित्रप्रदर्शन झालं. त्याआधी पुण्याच्या आर्टगेट या आर्ट गॅलरीत झालं. त्याच दरम्यान चांगल्या वाचनाची, लिखाणाची; चित्रं अभ्यासाची साखळी अधिक जुळत गेल्यानं लोकमतचे संपादक विजय बावीस्कर यांनी लोकमत खान्देश आवृत्तीकरता 'चित्र सांगते जुना वारसा' ही चित्रावरील लेखमाला वर्षभर लिहिण्यासाठी लिहितं केलं हेही माझ्याकरता अगदी नवं आणि चित्रांसाठी छापून येणार पहिलं लिखाण म्हणता येईल. लिखाणाच्या, चित्रांच्या प्रवासात खूप महत्त्वाची माणसं मिळाली. मी कधी कधी विचार करतो या माणसांना मी काय दिल तर माझ्या उत्तरात चित्रांशिवाय काहीच येत नाही. यासारखा खूप माणसांचा गोतावळाच मला लिहिता करत गेला, चित्र काढणं चित्र अभ्यासणं ही बाब माझ्या कलाप्रवासाची साखळी ठरली आणि चित्राच्या माध्यमातून कॅनव्हासवर, कागदावर येणारं स्वतःच्या मनातील काम व्यक्त होण्याचं माध्यम ठरलं. सर्वच चित्रकार त्यांच्या व्यक्तिगत पातळीवर चित्रात व्यक्त होत असतात, त्यांचा परिसर, त्यांना सतत दिसणारी मानव जीवनशैली, निसर्ग हे



त्या बरोबर असतंच असतं. तसंच मला गावगाड्यातील व्यवस्था शेतीपासून गुरढोरांपर्यंत दिसत आली. ज्या कष्टकरी माणसाला, प्राण्यांना ज्या पातळीवरून मी चित्रांत बघतो, मला वाटतं ते माझं त्यांच्याकडे स्वतंत्र बघणं आहे. गावगाड्यातल्या अनेक चित्रकारांची चित्रं मनोरंजनाच्या पातळीवर आली असतील तर तो त्या कलावंताला दिसण्याचा भाग आहे, कोणताही कष्टकरी समूह, त्याचे जगण्याचे संसाधन, त्याचा परिसर हा चित्रातून मनोरंजनाच्या पलीकडे जाऊन काहीतरी सूक्ष्म जाणिवेत घेऊन जात असेल तर ते मी केलं पाहिजे. मला माझ्या नजरेत प्रथम दिसतं ते ग्रामीण जीवनाचं पिळलेलं, खंगलेलं शरीर असतं. कुत्रे, गायी, म्हैशी, बैल, झाडं हे आकारही कधी मला आनंदाच्या रेषांमध्ये घेऊन गेले नाहीत. शहरी पाळीव कुत्र्यांचा आकार माझ्या चित्रात येण्याचं काही कारण नाही आणि ते साम्य ही कधी दिसत नाही. त्याच्या हाडकुळ्या शरीररचनेतून त्याचा ग्रामीण परिसर सहज लक्षात येतो.चित्र ही काही भाषा नाही, ती एक आंतरिक जाणीव आहे. ती नेहमी आपल्या मागेपुढे आसपास फिरत असते. कुठल्या जाणिवा तुम्ही तुमच्या कलेत आणता हे त्या त्या कलावंतावर अवलंबून असतं. माझी चित्रं वेदनेच्या जाणिवांची वाहक आहेत हे तर मला मान्य केलं पाहिजे. डोळ्यांतून वाहणारे अश्रू ही सर्व दुःखाची एकच परिभाषा होत नाही, तर कलावंतानं त्याच्याही पलीकडे जाऊन वेदनेच्या शुक्ष्म पातळीवर विचार करणंसुद्धा गरजेचं असते. त्यानं एक मात्र होत असतं, ते म्हणजे तुम्ही एकाच जातवर्गाची भूमिका आपल्या कलेत मांडत नसता तर अख्ख्या कष्टकरी समूहाचं काहीतरी म्हणणं कलेच्या दारातून कलाविचार घेऊन तुमच्यापर्यंत येत असतं. प्रत्येक कलावंतांची राजकीय भूमिका स्वतंत्र असते आणि ती असलीही पाहिजे. कारण कलेतून आपल्याला काहीतरी निश्चितपणे म्हणायचं असतं. याच मार्गानं अनेक कलावंतांनी सामाजिक भान ठेवून आपल्या कलेच्या माध्यमातून प्रश्न मांडलेली आहेत आणि मांडतही आहेत. कलावंत हा जातपात, धर्म किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या पलीकडचा असतो. सर्व समाजाला जो लाभ मिळत असेल त्यापेक्षा अधिकाधिक जास्त कसा मिळावा यासाठीच कलावंतांची भूमिका असली पाहिजे. तो पक्ष म्हणून नव्हे किंवा धर्म म्हणून नव्हे तर समाजाच्या हिताच्या बाजूनं नेहमी राहिला पाहिजे आणि तेच मला कलावंत म्हणून महत्त्वाचं वाटतं.

आतापर्यंत चित्रकलेसाठी जगून झालेला माझा प्रवास विदर्भ साहित्य संघाचं नियतकालिक 'युगवाणी'मधून या अंकाचे संपादक प्रफुल्ल शिलेदार यांनी 'काळ्यानिळ्या रेषा' हा माझ्या आत्मकथनाचा काही भाग प्रसिद्ध केला होता, तो आपण वाचला असालच! तो आत्मकथेचा प्रदीर्घ प्रवास 'राजहंस प्रकाशन' यांच्याकडून पुस्तक स्वरूपात तुमच्या हाती लवकरच येईल .

**– राजू बावीस्कर**
भ्रमणध्वनी ९८८१४१५४७२
baviskar.raju1@gmail.com



राजकुमार तांगडे

# डोळसपणे वाचायची कसोटी...


**तुम्हाला** कुठल्याही गोष्टीचं ज्ञान असल्याशिवाय तुमचा जीवनमार्ग सुलभ होत नाहीच..ज्ञानाचे मुख्य उगमस्थान हे अनुभवातून आहे.. नंतर ते जतन करायचं आणि दुसऱ्याला द्यायचं.. फक्त ज्या माध्यमातून ती जतन केली ती माध्यमं वेगवेगळी असतात.. भाषाच नव्हती, तेव्हा साधनं सांकेतीक होती, मग भाषेचा जन्म झाला, ती मौखिक झाली, नंतर पुढे लिपीचा जन्म झाला की ती लेखी झाली..आता ती डिजिटल झाली..ही सगळी फक्त ज्ञान वाहुन नेणारी माध्यमं. जणू ही सगळी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अनुभव, ज्ञान यांची वारसाहक्काने आलेली संपत्तीच... पूर्वजांकडून घेऊन वंशजाकडे देताना प्रत्येक पिढीने त्यात भरच टाकली...त्यांनी दिलेलं ज्ञान आपल्या मेंदूला आयुष्यात पेलता आणि पेरता आलं म्हणूनच ते वाढतच गेलं...पुस्तकं हे वहनाचं माध्यम..अनुभव टाकून आपल्या दारी आलेलं भांडंच. त्यातलं ज्ञान आपल्या मेंदूरूपी पदरात रिचून घ्यायचं असतं.पण फक्त हे पुस्तकरूपी भांडच एकमेव वाचायचं आहे?... फक्त अक्षरांतलंच ज्ञान रिचून घ्यायचं?..म्हणजे फक्त ओळीच वाचायच्या असा जर कोणी दावा करत असेल, समज करून घेत असेल, तर तो आणि त्याचा दावा, दोन्ही अर्धवट आहेत....गुऱ्हाळामधे गूळ तयार होण्याकरिता गुळव्या भेंडी वापरतो.. पण म्हणून भेंडीला अवास्तव महत्त्व दिलं नाही. उसाचं महत्त्व आहे तेवढच राहतं..गूळ चांगला अळण्याकरता भेंडीपण तेवढीच महत्त्वाची. पण गुऱ्हाळाला लागते म्हणून..शिवारच्या शिवारं भेंडीच केली तर मात्र गुळाऐवजी भाजी करून खावी लागेल..सोन्याचे अलंकार करताना कारागीर जेवढा डाग वापरतो..तितकंच वाचन तुम्हाला आयुष्यात जगण्यासाठी महत्त्वाचं...नाही तर वाचाल तर वाचाल म्हणत मी कामधंदा न करता वाचत बसलो तर भुकेनं नक्कीच मरेन...अनुभवाला वाचन आणि वाचनाला अनुभव जोडायचा असतो....

डॉक्टर लिहून जरी औषध देत असला, तरी लक्षणं पाहूनच रोग ओळखतो..डॉक्टरांना रोग्याचं शरीर वाचता येत...आपलं असूनही आपल्याला आपलं शरीर वाचता येत नाही.. मी सिगारेट ओढल्यानंच मला चालताना दम लागतो.. हे कळण्यासाठी कुणी पुस्तक वाचत असेल तर तो माठ आहे...पण सिगारेटमधे कुठले घातक पदार्थ आहेत हे मात्र वैज्ञानिकाचा शोधनिबंध वाचून, माहितीतूनच आपल्याला समजून घेता येतील. त्याकरता त्यांचे अनुभव वाचणे किंवा ऐकणे किंवा व्हिडिओ पाहणं अशा वेगवेगळ्या माध्यमातून जाणून घेणं गरजेचंच आहे.

...मुळात वाचनाचे असंख्य प्रकार असतील.. आपला भोवताल समजून घेण्यासाठी माणूस जी काही साधनं वापरेल ते सगळं वाचणच....आपल्याला झोपेत डास चावला आणि आपला हात डास चावलेल्या जागेवर जाणे ही आपली आपण वाचलेली वेदनाच ना.. वाचनानं माणसाच्या संवेदना जाग्या होतात. पण त्यासाठी मन संवेदनशील हवं..आपल्याला थंडी वाजायली तर आपण पांघरुण घेणारच.. अर्थात..पांघरायला उपलब्ध असेल तर.. नसेल तर किमान पाय आखडून पोटात तरी घेऊ ना.. तुमच्या शेजारी छोटं बाळ असेल..आणि तुम्हाला थंडी वाजते असं जाणवलं तर तुम्ही त्याच्याही अंगावर पांघरुण टाकाल.. तुम्ही थंडी वाचलीच एक प्रकारे.. त्याच्यातून सहवेदना जागी झाली आणि त्या बाळावर पांघरूण टाकलं.. मी बसमधे प्रवास करताना पुस्तकं वाचतो..तेव्हा माझ्या शेजारचा सहप्रवासी डोळे झाकून पडला... तो झोपलाय की गेलाय हेही मला वाचता आलंच पाहिजे.. कदाचित तुमच्या हातातल्या पुस्तकापेक्षाही मोठा ग्रंथ तुमच्या बाजूला बसलेला असेल. किमान त्याची ओळख तरी आपणाला होईल.. हां अगदी परीक्षेचा पेपर द्यायला तुम्ही जात असाल तर बाजूच्या सीटवर कुलगुरू बसलेले असले, तरी आपण नुसता नमस्कार करून

परीक्षेचा विचार करत बसलात, चिंतन करत बसलात तरी चालेल. तुम्हाला अख्खा परीघ वेगवेगळ्या माध्यमातून वाचता आला पाहिजे..म्हणजे तुम्ही एखाद्या खोलीत बसला आणि तिथे कसलासा वास आला तर तुमच्या इंद्रियाला तो कळतो तुम्ही तो अनुभवानं वाचता..कुठल्याही ग्रंथात-पुस्तकात तुम्ही नुसते खारट, आंबट, तिखट वाचलं तर त्याचा परिणाम तुमच्यावर तेव्हाच होईल जर त्या चवी तुमच्या जिभेनं कधी अनुभवल्या असतील.. पुस्तकं ही अनुभवातूनच जन्म घेतात. ते वाचताना तुम्ही ते अनुभवलं असेल तर आपल्या काळजाला ते लगेच भिडतं. मी आयुष्यात कधी नॉनव्हेजच खाल्लं नाही पण खाणारे माझे मित्र त्याच्यावर इतकं भरभरून बोलतात. त्यांनी त्याचं कौतुक, माहात्म्य किंवा उदो-उदो कितीही केला तरी माझ्यावर त्याचा शून्य परिणाम होतो...का? तर मी त्याबाबतीत अनुभवाच्या पातळीवर शून्य आहे...दुसऱ्याचे अनुभव हे आपणास खरे वाटतात जेव्हा आपण त्या गोष्टीचा अनुभव घेतो..याला विषाची परीक्षासारखे काही अपवाद असतात...वाचून लिहायचं नसतं (परीक्षा अपवाद) वाचून जगायचं असतं आणि जगून लिहायचं असतं..वाचून, ऐकून, पाहून बनलेली मतं कधी कधी अनुभवून बदलतात..पण तो सच्चेपणा आपल्याकडे पाहिजे..आणि स्वानुभूतीतून वाचलेल्या गोष्टी.. जनाला जरी खोट्या सांगीतल्या तरी मनाला मात्र खऱ्याच सांगतो...


ठरवून घडवलेल्या अपघातानं मागे एका वाचन आणि श्रवणानं समृद्ध अशा पंडिताच्या सहवासात आलो होतो. स्वतःची मतं बनवलेल्या या महात्म्याच्या मताशी आपण थोडी जरी असहमती दाखवली किंवा खोडलं की ते चिडायचे. त्यांचं वाचन अफाट होत, ऐकलेलं ही भरपूर होतं आणि ते वाचलेलं, ऐकलेलं ते आता याची देही याची डोळा पाहतही होते. आम्ही म्हणायचो तुम्ही वाचलंय, ऐकलंय आणि पाहिलंय.. हे चांगलच आहे, पण तुम्ही अनुभवा म्हणजे तुम्हाला खरं कळेल... पण ते त्यांचीच रट लावत.. आणि आपण त्यांचं मत खोडायला लागलो की, ते आमच्यावर तुम्ही किती मागास आहात, अज्ञानी आहात म्हणून फायरिंग करायचे.. ते ज्या काही कल्पना, समज आमच्या लोकांसंबंधी माहितीनं म्हणा की ऐकून म्हणा पक्के करू आले होते. ते वास्तवात आम्हाला चुकीचं वाटायचं.. अनुभवाच्या पातळीवर जर काही बोललं तर ते आम्ही मान्य केलं असतं... नुसतं वरकरणी पाहणीतून ही काही मतं बनवली तर ती चुकीची कशी ठरतात याचा ते उत्तम नमुना होते. आम्ही ते रेटून खोडतोय ही गोष्ट त्यांच्या लक्षात आल्यानंतर विद्वानांनी आम्हाला तुम्ही arrogant आहात म्हणायला सुरुवात केली.. तरी आम्ही बधत नव्हतो. आमच्यावर मतं लादणं म्हणा किंवा आम्हाला नमवणं म्हणा, जड जातंय म्हटल्यावर पंडित आमचा drawback शोधत बसले. तो त्यांच्या लक्षात आला. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी आमची भेट होताच.. अगदी खुशीत त्यांनी आम्हाला जो पहिला प्रश्न विचारला त्याच उत्तर किंवा सफाई यापैकी आमच्याकडे काहीच नव्हतं... त्यांनी अगदी हसून विचारलं, अरे अमुक अमुक लेखकानं तमुक तमुक पुस्तकात काय भन्नाट लिहिलंय... तू वाचलंस? आम्ही नाही म्हटलं.. ते म्हणाले, तुम्ही वाचा एकदा.. त्यांचं तमुक पुस्तक तर अप्रतिम, भारी... तुम्ही वाचलंत?आम्ही जरा कोत्या आवाजात म्हटलं, नाही... ते आम्हाला एक-एक पुस्तक विचारत होते..आणि आम्ही दुष्काळी भागातल्या नंदीबैलासारख्या नकारार्थी मानाच हलवत होतो. एक क्षण त्यांनी असा काही चेहरा केला की.. तुम्ही जन्माला येऊन नेमक केलंच काय?.. आम्हालाही खरंच आपण कायचं केलं असंच वाटलं. नंतर त्यांनी त्यांच्या जवळची हाताला येतील ती पुस्तकं आमच्यासमोर आदळली आणि हे वाचा.. तुम्हाला उपयोग होईल, असा सल्लावजा टोला लगावला... आम्हालाही त्यांच्या पुढं सात-बाराचा उतारा फेकून म्हणावसं वाटत होतं हे जगा आणि मग बघा.. पण तो उद्धटपणा आम्ही टाळला.... त्यानंतर त्या विद्वानांनी वाटेल तेव्हा वाटेल ती पुस्तकं वाचलीत का म्हणून टोकायला सुरुवात केली. एक प्रकारे आमचे आडवा






आणि जिरवा प्रकारचे कार्यक्रम लागले होते. मी लहान असताना एक जनशिक्षण निलयम केंद्र नावाचा साक्षरतेसाठीचा उपक्रम होता.. ती दहा-पाच पानांची नवसाक्षरासाठीची पुस्तकं असायची. त्यातलं एक पुस्तक वाचण्यात आलं होतं.. त्यातला कुठलातरी एक रेफरन्स माझ्या बोलण्यातून गेला.. पण पंडितांना ते पुस्तकं आणि लेखक दोन्ही माहीत नाहीत हे माझ्या चटकन लक्षात आलं. आणि मी त्या पुस्तकावर जोर दिला.. पण तो जोर इतका पडला की ते पुस्तक साहित्य अकादमीच्या स्पर्धेतलं वाटावं. विद्वान गप्प झाले. पण माझ्या एक गोष्ट लक्षात आली की पुस्तकं तोंड बंदही करू शकतात आणि बोलत ही करू शकतात.. पण कुठलाच अतिरेक चांगला नसतो.. वाचन गरजेचं आहे.. आपल्याकडे हल्ली काय वाचलंस असं तुकारामांना ही विचारायचं धाडस दाखवणारी माणसं मिळतील.. तुम्ही आम्ही काय चीज..

खरं तर पुस्तकं ही माणसाच्या जगण्याचं, अनुभवाचं, ज्ञानाचं संचित. जसं पाणी वाफेत आणि बर्फात रूपांतरित झाल्यानं पिढ्यान्‌पिढ्या ताजं आणि निर्मळ मिळत गेलं, तसंच काहीसं प्रगत मानवी जीवनात हे काम पुस्तकं करतात. पुस्तकं माणसाला अंधारात चालताना बॅटरीचं काम करतात..बाकी चालायचं मात्र आपलं आपणच असतं...तसा वाचनाच्या बाबतीत मी निरुत्साही.. आतापर्यंतच्या आयुष्यात शालेय अभ्यासक्रमाची सोडली तर दहा पुस्तकं विकत घेऊन वाचली नसतील. माझ्या लहानपणी माझं गाव दीड एक हजार लोकवस्तीच, पण तिथं एक वाचनालय होतं.. आमच्या गावातल्या गुरुजींची मुलं तिथून पुस्तकं आणायची.. मीही त्यांचं एक-दोनदा अनुकरण करून पाहिलं..त्या ग्रंथपालानं कदाचित माझं वय लक्षात घेता कोल्ह्या-कुत्र्या-लांडग्याच्या गोष्टींची पुस्तकं मला वाचायला दिली.. पण खरे कोल्हे-कुत्रे लांडगे पाहिलेले असल्यानं चित्रातल्यात मन रमलंच नाही...मी त्यातले इन-मीन-तीन पण पानं वाचू शकलो नाही. पण नंतर आठवीपासून नियमित पेपर वाचायला सुरुवात केली.. शाळेच्या वाटेला वाचनालय होतं.. अभ्यासाच्या पुस्तकापेक्षा जास्त मन लावून मी पेपर वाचायचो.. कदाचित माझा भोवताल पाठ्यपुस्तकापेक्षा त्या वर्तमानपत्राशी जास्त मिळताजुळता आणि परिचयाचा असायचा. वर्तमानपत्रात कल्पनेला थारा नसायचा.. असली तर शक्यता असायची. बाकी त्या त्या दिवसाचं ते एक प्रकारे छायाचित्रच असायचं. त्यात आताच्यासारखे भडक रंगही नसायचे, आणि भडक रंगवणारेही आणि रंगावरचे मालकी हक्कही इतके पक्के नसायचे. आले तरी




ते नभाची शोभा वाढवणाऱ्या इंद्रधनुष्यासारखे एकत्र यायचे. आता रंग समाजात वाद लावतात, रंग एकमेकांवर चढाई करतात. रंग पुस्तकात आणि माध्यमातही दिसतात. रंग हातात घेऊन अज्ञान ज्ञानावर आक्रमण करतं...हे काही पुस्तकं सांगतात तर काही नाही.. मग आपल्याला थेट रंगच वाचता आले पाहिजेत... मी पुस्तकांपेक्षा दिसतं त्याच्या पोटातलं आणि पलीकडचं वाचायचा प्रयत्न करतो..मी जे लिहिलंच गेलं नाही असं, जे अक्षरात बसवलं नाही, जे ब्रशच्या फटकाऱ्यात आतापर्यंत आल नाही, जे सुरात आणि स्वरात अजून आलं नाही..ते सगळं नवं नवं विसरलेलं शोधतोय वाचायला... मला ग्रंथाचं पारायण ऐकलं की भीती वाटते. खरं तर ती आचरणात आणायची असतात, पण तपासून, पडताळून. कालबाह्य झालेलं फेकायचं असतं हे ते विसरलेत म्हणून..

डोळे झाकून श्रद्धा कशावरच नाही ठेवायची, अनुभवल्याशिवाय... लेखकापेक्षा आता वाचकाच्या विवेकावरच अतिरिक्त भार आहे. डोळसपणे वाचायची आता कसोटी आहे. आपल्याला आता लिहिणाऱ्याचे हेतूच वाचता आले पाहिजेत. नाही तर त्यांचं ऐकून, पाहून, वाचून आपण आपल्याच मानसांचा छळ करायला लागतो... हे आपण अनुभवलं नाही का?...संस्कृतीच्या गोंडस नावाखाली लिहिलेल्या अनेक गोष्टींमुळे आपण आपल्या आईचेपण हक्क नाकारले... केवळ कुणीतरी लिहून ठेवले म्हणून...आता आपण ज्या ही माध्यमातून वाचू ते काळजीपूर्वक...वाचनानं दिशाभूल होणार नाही याची काळजी घेऊन..

मात्र, जगणं समृद्ध करायला वाचनाशिवाय पर्याय नाही... फक्त त्याचे मार्ग असंख्य...आपल्या जीवनाला ज्या मार्गावर गती मिळेल आणि दिशा मिळेल तो मार्ग निवडावा......

**– राजकुमार तांगडे**
भ्रमणध्वनी : ९७६३८७९२८४
rajkumar.tangade@gmail.com

# दिवाळीपहाट क्षणचित्रे...




सूत्रसंचालन संपदा जोगळेकर-कुळकर्णी




उषा तांबे

अशोक नायगावकर






रवींद्र काणे यांचा सत्कार - महेंद्र पवार आणि सुदेश हिंगलासपूरकर





भगवान इंगळे यांचा सत्कार करताना दीपक करंजीकर













संवाद साधताना – सुदेश हिंगलासपूरकर, अस्मिता पांडे, विनोद पवार आणि डॉ. लतिका भानुशाली

प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने अभ्यास करून दहावीत नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनींचा लॅपटॉप देऊन तीन मान्यवरांच्या हस्ते सन्मान







# ‘ताठ कणा’ चित्रपटाची क्षणचित्रे...



दृश्याबद्दल चर्चा करताना
उमेश कामत,
लेखक श्रीकांत बोजेवार आणि
दिग्दर्शक गिरीश मोहिते



उमेश कामत आणि
डॉ. पी.एस. रामाणी यांची भेट.
सोबत श्रीकांत बोजेवार

'ताठ कणा' चित्रपटातील दृश्ये











उमेश कामत, दीप्ती देवी, शैलेश दातार, सायली संजीव आणि अन्य कलाकार



डॉ. रामाणी यांच्यासह चित्रपटाची टीम

# ताठ कण्याच्या ध्यासाची गोष्ट

**राधिका कुंटे**

डॉ. पी. एस. रामाणी यांनी प्रतिकूल परिस्थितीशी झगडत विलक्षण कौशल्याने आणि मेहनतीने आपल्या ध्येयाकडे वाटचाल केली. यादरम्यान समाजाच्या ऋणात राहत अनेक रुग्णांच्या वेदना कमी केल्या. त्यांचे आयुष्य सुसह्य करण्यात मोलाचा वाटा उचलला. त्यांचा हा दृष्टिकोन त्यांच्या 'ताठ कणा' या त्यांच्या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या आत्मचरित्रात्मक पुस्तकात दिसतो. काही प्रमाणात हे पुस्तक आणि नंतरच्या काळातल्या अन्य महत्त्वाच्या घटनांवर आधारित डॉक्टरांचा प्रेरणादायी जीवनप्रवास दाखवणारा 'ताठ कणा' हा चित्रपट लवकरच प्रसिद्ध होतो आहे. गल्फ सिने फेस्ट २०२१ हा चित्रपटांचा महोत्सव जानेवारी महिन्यात दुबईमध्ये साजरा होणार आहे. त्यात 'ताठ कणा' चित्रपटाची निवड झाली आहे. या निमित्ताने डॉ. पी. एस. रामाणी, लेखक श्रीकांत बोजेवार, दिग्दर्शक गिरीश मोहिते, अभिनेता उमेश कामत यांची ही मनोगते.

डॉक्टरांच्या नुकत्याच झालेल्या ८२व्या वाढदिवशी, जे जे हॉस्पिटल, सायन हॉस्पिटल, एसआरसीसी हॉस्पिटल, लीलावती हॉस्टिपल या मुंबईतील आणि प्रकृती क्लिनिक, कोल्हापूर येथील न्यूरो स्पायनल सर्जिकल टीमनी एकाच वेळी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५.३० दरम्यान जगभरातील डॉक्टरांना झूम या डिजिटल माध्यमातून पाठीच्या कण्यावरील विविध शस्त्रक्रिया दाखवून त्यांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला.

## ध्यासाची गोष्ट

**डॉ. पी. एस. रामाणी**



**'ताठ** कणा' हे माझे आत्मचरित्र नोव्हेंबर २००५ मध्ये प्रकाशित झाले. त्यानंतर तीनच दिवसांनी गोव्यात होणाऱ्या प्रकाशन समारंभात प्रकाशित करायला पुस्तकाची पहिली आवृत्तीच उरली नव्हती. मग लगोलग दुसरी आवृत्ती काढावी लागली. डिसेंबरमध्ये 'महाराष्ट्र टाइम्स'ने त्यांच्या वार्षिक सर्वेक्षणात (सर्व्हे) 'ताठ कणा' हे वर्षभरातील सर्वोत्तम पुस्तक असल्याचे जाहीर केले होते. नंतर या पुस्तकाच्या सतरा आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून अजूनही ते आवर्जून वाचले जात आहे. तर 'ताठ कणा' हा चित्रपट या पुस्तकापेक्षा थोडा निराळा आहे. तो माझ्या वैद्यकीय कारकीर्द, संशोधनावर आणि काही अंशी जीवनावर आधारलेला आहे.

माझा वैद्यकशास्त्राप्रती असलेला ध्यास, त्यासाठी मी घेत असलेली मेहनत, तत्कालीन रुग्णांची वैद्यकीय गरज आणि सम स्या समजून घेत त्यासाठी अभ्यास, संशोधन करून तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नवीन तऱ्हेची शस्त्रक्रिया कशी विकसित केली, ते या चित्रपटात दाखवले आहे. बोनबँक सुरू केली. 'प्लिफ' तंत्रज्ञानामुळे (पोस्टिरिअर लुंबर इंटरबॉडी फ्युजन) असंख्य रुग्णांना दिलासा मिळाला असल्याने तेही या चित्रपटात प्रामुख्याने दाखवले आहे. त्याखेरीज माझ्या जीवनातल्या काही घटनांचा अनुषंगिक उल्लेख आहे.

समुद्रात पोहून बाहेर येणाऱ्या शाळकरी मुलाच्या हातात माशाचा कणा आहे. तो कणा हा मुलगा उत्सुकतेने न्याहाळतो आहे, असा प्रसंग चित्रपटाच्या सुरुवातीला आहे. तेव्हापासून सुरू होते ‘ताठ कण्या’ची गोष्ट. हळूहळू हे कुतूहल वाढत जाते आणि सुरू होतो त्याचा वैद्यकीय क्षेत्रातला प्रवास. चित्रपटाच्या टीमला मी विविध वैद्यकीय गोष्टींबद्दल, शिष्टाचारांबद्दल मार्गदर्शन केले. डॉक्टर रुग्णपरीक्षा कशी करतात, शस्त्रक्रिया कशी करतात वगैरे गोष्टी तपशीलवार सांगितल्या. मी शस्त्रक्रिया करताना जी परिचारिका माझी साहाय्यक म्हणून दाखवली आहे, ती चित्रपटातही आहे.

काही घटनांची सांगड चांगली घातली आहे. उदाहरणार्थ– इंग्लंडमध्ये नायक उच्चशिक्षणासाठी गेला आहे. वैद्यकीय अभ्यासाचा एक भाग म्हणून तो पाठीचा कणा चोरून घरी आणतो. बायको तो कुतूहलाने बघते. त्यावर ईऽऽऽ म्हणत प्रतिक्रिया देते आणि तिला एकदम उमासा येऊन ओकारी होते. चोरलेल्या कण्याच्या वासाने समजून नायक तिची समजूत काढू लागतो, तर कळते की तिला दिवस गेले आहेत.

रुग्णांच्या तीन–चार पिढ्या, सगळे कुटुंबीय माझ्याकडे रुग्ण म्हणून येतात. डॉक्टरांवर दाखवलेला हा विश्वास फार महत्त्वाचा असतो. त्याचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणून चित्रपटात घेतलेल्या दोन गोष्टी सांगतो. पुण्यातल्या एका रुग्णाची अन्य डॉक्टरांनी केलेली शस्त्रक्रिया अयशस्वी ठरली होती. तो पुन्हा उठू शकेल असे दिसत नव्हते. त्याच्या घरच्यांना कुणी माझे नाव सुचवले. ते मुंबईत आले. रुग्णाला तपासल्यावर मी आधी नकारच दिला होता. पण त्यांची परिस्थिती बघून केसचा पुन्हा अभ्यास केला. शस्त्रक्रिया करून मी एक प्रयत्न करतो, कदाचित मृत्यूचीही शक्यता नाकारता येणार नाही, ही कल्पनाही त्यांना दिली. पण घरच्यांनी मला शस्त्रक्रियेसाठी संमती दिली. चित्रपटात दाखवले आहे की शस्त्रक्रियेसाठी नायक निघाला असताना तो आणि रुग्णाचे वडील समोरासमोर येतात. नायक वडिलांना सांगतो की मी माणूस आहे, देव नाही. शस्त्रक्रिया होते आणि तो रुग्ण बरा होतो. दुसरे उदाहरण आहे ते प्लिफ सर्जरीला जगमान्यता मिळाल्यानंतरचे. त्याविषयी माहिती वाचून चंदीगडहून एक रुग्ण स्त्री माझ्याकडे येते. सायनच्या लोकमान्य टिळक रुग्णालयात तिच्यावर केलेली शस्त्रक्रिया यशस्वी होते. मात्र तिच्या जखमेला जंतुसंसर्ग (इन्फेक्शन) झाल्याने आजारातली गुंतागुंत वाढते. एका क्षणी ती बेशुद्धावस्थेत जाते. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाला जंतुसंसर्ग होणे, हा आपल्याकडच्या सार्वजनिक रुग्णालयाच्या व्यवस्थापनातला एक दोष आहे. रुग्णासाठी मीच माझ्या खिशातून प्रतिजैविकांसाठी (अँटिबायॉटिक) खर्च करतो. साडेतीन महिने झाले तरी ती रुग्णालयातच असते. तिच्या नवऱ्याला खिन्न मनाने मी धीर द्यायचा प्रयत्न करत असतो. आमचे प्रयत्न तो पाहत असतो. तो म्हणतो, रामाने तर चौदा वर्ष वनवास भोगला. मी तिला बरी होऊन घरी घेऊन जाईन. तुमचे आणि तुमच्या टीमचे परिश्रम मी पाहतो आहे. सगळे ठीक होईल. मी प्रयत्न सोडत नाही. त्यानंतर हळूहळू त्याच्या पत्नीची प्रकृती सुधारते. घरी परतताना ती शाळकरी वयात शिकलेली सात कडव्यांची कविता म्हणते. त्यावेळी तिला निरोप द्यायला आमची सगळी टीम आवर्जून हजर होती. पुढे वर्षभराने एका परिषदेसाठी काही डॉक्टर मित्रांसह मी चंदीगडला गेलो होतो. तेव्हा तिच्या नवऱ्याने स्टेशनवर माझे दण्क्यात स्वागत केले आणि घरी स्नेहभोजनाला यायचा आग्रह धरला. तिच्या आजारपणाची कहाणी समजल्यावर माझ्या परदेशी डॉक्टर मित्रांनीही माझ्या पाठीवर कौतुकाची थाप दिली होती.

एमएसनंतर मी उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला जायचे ठरवले. मात्र तेथेच स्थायिक न होता कुटुंब, देश आणि समाजासाठी मला पुन्हा भारतातच परतायचे होते. जाण्याआधी माझे लग्न लागले. हॉस्टेलवरून स्कूटरने मी हॉलवर गेलो. लग्नानंतर पूजा, जेवण, मधुचंद्र वगैरे काही नव्हते. तीन दिवस काही महत्त्वाच्या शस्त्रक्रिया केल्या आणि इंग्लंडला प्रयाण केले. काही महिन्यांनी पत्नीला तेथे बोलावून घेतले. मात्र तिच्यासाठी मला वेळच काढता येत नसे. माझे संशोधन, अभ्यास आणि कामात मी पुरता व्यग्र होतो. तिनेही मला समजून घेतले. माझा वैद्यकीय क्षेत्रातला ध्यास आणि वैयक्तिक जीवनातील काही मोजक्याच संदर्भांच्या पार्श्वभूमीवर हा चित्रपट साकारला आहे.

## कालपटाचा जुळतो धागा

**श्रीकांत बोजेवार**



**चित्रपटाचे** लेखन करायचे म्हटल्यावर प्रथम डॉ. रामाणी यांच्या ‘ताठ कणा’ या पुस्तकाचे वाचन केले. त्यातून त्यांच्याविषयी बरीच माहिती कळली. याआधी कधी त्यांना भेटलो नव्हतो. सर्वसाधारणपणे आत्मचरित्र हे फार स्वतःभोवती रचलेले असते. इतर गोष्टींची फार नोंद नसते त्यामध्ये. पण या पुस्तकाचे तसे नव्हते. ज्या काळात ते घडत गेले त्या काळातल्या घटनांची नोंदही त्यांनी केलेली दिसते. पहिल्या भेटीत त्यांनी त्यांना त्यांच्या आयुष्यातल्या ज्या घटना महत्त्वाच्या वाटतात, त्यांचे टिपण तयार करून दिले. त्यातल्या काही पुस्तकात होत्या आणि काही नव्हत्या. कारण पुस्तक लिहून बरीच वर्षं झाली आहेत. त्यामुळे त्यानंतरच्या आयुष्यातल्याही काही महत्त्वाच्या घटना होत्या. मात्र त्या सगळ्या घ्याव्या असा आग्रह त्यांनी धरला नाही. ते आमच्यावर सोपवले.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी सांगितले, की 'मला सिनेमा या माध्यमातले काही कळत नाही. माझी एकच इच्छा आहे की हा सिनेमा एखाद्या डॉक्युमेंट्रीसारखा रटाळ होऊ नये.' प्रेक्षक एखादा सिनेमा बघायला जातो, तेव्हा त्याला प्रसिद्ध व्यक्तीच्या आयुष्यात काय घडले, याच्या अगदी बारीकसारीक तपशीलांमध्ये रस नसतो. त्याला विषयाचा गाभा जाणून घ्यायचा असतो आणि ज्या गोष्टींशी समाजाचा संबंध असतो, त्या गोष्टी बघायच्या असतात. सुदैवाने डॉ. रामाणीही याच मताचे होते.

नंतर कथा लिहिताना त्यांनी दिलेल्या टिपणातील काही घटना मला तितक्या महत्त्वाच्या वाटल्या नाहीत. ते ते तेव्हा त्यांना सांगत गेलो, विचारत गेलो आणि त्यांनी पूर्ण निर्णयस्वातंत्र्य दिले. मला लिहिताना मजा आली. त्यांच्या आयुष्यातला मुख्य टप्पा म्हणजे ती प्लिफ सर्जरी. त्यापर्यंत ते कसे पोचले, पाठीचा कणा आणि त्याच्या अभ्यासाचा ध्यास त्यांनी लहानपणापासून कसा घेतला आणि एवढे प्रचंड यश मिळूनही परदेशात स्थायिक होण्याचा विचार न करता भारतात परतून, मुंबई-गोव्यात परतून, त्यांनी इथल्या लोकांसाठी आपले वैद्यकीय ज्ञान उपलब्ध करून दिले या मुद्यांवर अधिक लक्ष केंद्रित केले. आमची भेट झाली तेव्हा ते ७८ वर्षांचे होते. या वयातही ते रोज सकाळी शस्त्रक्रिया करतात, ही गोष्ट फार महत्त्वाची वाटली.

प्रत्यक्ष घटना घडण्याचा कालावधी हा मोठा असतो. एवढ्या मोठ्या काळाचा पट दोन-अडीच तासात मांडायचा आहे. त्यामुळे कथानक मांडण्यासाठी थोडी सिनेमॅटिक लिबर्टी घ्यावी लागते. घटना घडलेल्या असतात, मात्र त्यांची मांडणी मागे-पुढे करावी लागते. ते परदेशात संशोधन करत होते, तेव्हा संशोधनासाठी अवयव लागत असत. तिथल्या नियमांनुसार मृतदेहाचे अवयव काढणे हा गुन्हा होता. त्यावर उपाय म्हणून डॉक्टरांनी वेगळ्या पद्धतीने हे अवयव मिळवले. त्यांची चौकशीही झाली होती त्याबद्दल. पण त्यानंतर अवयव अभ्यासासाठी उपलब्ध झाले पाहिजेत हे महाविद्यालयाने स्वीकारले आणि तसे पाऊल उचलले. हे सगळे दाखवताना खूप तारेवरची कसरत करावी लागली होती. कारण नायक हा खलनायक ठरू नये, ही काळजी घ्यावी लागली. या घटनेनंतर काही दिवसांनी त्यांचे वडील गेले. दरम्यान त्यांना पत्नीला दिवस गेले आहेत ही बातमी कळते. मग या तीन गोष्टी एकत्र केल्या. त्या वेगवेगळ्या काळात घडलेल्या गोष्टी एकत्र आलेल्या डॉक्टरांनाही खूप आवडल्या. त्यांच्या प्लिफ सर्जरीवर घेतले गेलेले आक्षेप, त्यांचा एक रुग्ण गंभीर अवस्थेत होता, त्याचा इतर लोकांनी घेतलेला फायदा, प्लिफ सर्जरीविषयी उठवण्यात आलेल्या वावड्या अशा घटनांचा काळ आणि क्रम मी आणि दिग्दर्शक गिरीश यांनी बदललला. त्यायोगे त्यातले नाट्य कसे वाढेल हे पाहिले. सत्याचा अपलाप कुठेच केला नाही. त्यामुळे सिनेमा रटाळ होण्यापासून वाचतो.

सिनेमात ज्या वैद्यकीय संकल्पना, संदर्भ होते, डॉक्टरांचे संशोधन होते, ते मांडणेही गरजेचे होते. ते सामान्य प्रेक्षकांना कळेल असे मांडणे आवश्यक होते. उदाहरणार्थ, त्यांची प्लिफ सर्जरी आहे. तिचे पोस्टिअर लुंबर इंटरबॉडी फ्यूजन हे पूर्ण नाव प्रेक्षकांना कळण्याचे काही कारण नाही. मग त्याचे सुलभीकरण करून डॉक्टर आणि डीनच्या चर्चेतून त्या शस्त्रक्रियेची माहिती समजावली आहे. वेळोवेळी वैद्यकीय संकल्पना वापरल्यावर तिचा अर्थही समजून सांगितला. डॉक्टरांनी याबाबतीत मदत केली. एखादी वैद्यकीय संकल्पना त्यांच्याकडून समजावून घ्यायचो आणि मग ते सोप्या शब्दांत ती लिहून त्यांना दाखवून घ्यायचो. क्वचित कधी दुरुस्ती असेल तर ती करायची आणि ती मांडायची. दहा-बारा वर्षांचा मुलगा म्हणून त्यांना दाखवले आहे, तरुणपणाचा काळ आहे, असा जवळपास पन्नास वर्षांचा काळ यात मांडण्यात आला आहे. त्यामुळे कालसुसंगत भाषेचा वापर केला. गोव्यात कोकणी भाषा वापरली. पन्नास वर्षांपूर्वी जे शब्द प्रचलित होते, वागण्याच्या पद्धती, मुला-मुलींनी बोलण्याच्या पद्धती, राहणीमान यातून ते दाखवायचा प्रयत्न केला.

डॉक्टरांचे मोठेपण हे फक्त प्लिफ सर्जरीपुरते मर्यादित नव्हते. त्याआधी भारतात स्पाइन सर्जरी होतच नव्हती. बोनबँकची संकल्पना त्यांना सुचली आणि मग प्रत्यक्षात आली. त्यावरून त्यांची खूप थट्टा केली गेली, पण त्यानंतर बोनबँक अनेक ठिकाणी सुरू झाल्या. आता कृत्रिम हाड तयार करणेही शक्य झाले आहे, पण त्या काळात ही एक प्रकारची क्रांती होती. असे अविरत काम करताना मी काही मोठे जगावेगळे काम करतो आहे, असा त्यांचा आविर्भाव नव्हता. कोणतीही नवीन गोष्ट शिकायला मिळणार असेल तर समोरच्या माणसाचा स्वभाव कसाही असला तरी त्याला आपलेसे करून ते शिकतात. एखाद्या गरीब रुग्णावर उपचार करताना पैशांचा विचार न करता केवळ सेवाभाव दिसतो. आपल्याकडे आहे, ते समाजामुळे असून आपण समाजाचे देणे लागतो, ही कृतज्ञतेची भावना कायम असणे, स्वतःच्या आजारपणाची पर्वा न करता रुग्णांवर शस्त्रक्रिया-उपचार करणे हा त्यांचा स्वभाव आहे. मात्र या बाबी कथेचा एक भाग म्हणून दाखवल्या आहेत.

## डॉक्टर माणूस

**गिरीश मोहिते**

**'ताठ** कणा' पुस्तक वाचल्यानंतर लक्षात आले की यात जे मटेरिअल आहे, तेवढे दोन तासांच्या चित्रपटात सामावणे शक्य नव्हते. त्यामुळे शाळकरी वय ते प्लिफ सर्जरी यशस्वी झाली आणि एक गुंतागुंतीची केस त्यांनी हाताळली हा टप्पा घेतला. त्या शस्त्रक्रियेवर काही आक्षेप घेण्यात आले, ती यशस्वी ठरली की नाही, यावर दुमत होते. त्याच काळात एक गुंतागुंतीची केस त्यांच्याकडे आली. अन्य कुणाकडून अयशस्वी ठरलेली शस्त्रक्रिया नीट पार पाडून त्या रुग्णाला बरे करायची जबाबदारी डॉक्टरांवर



आली होती. तिथपर्यंत हे कथानक बांधले आहे. बाकी रेस्ट इज हिस्टरी आणि ती लोकांना माहीत आहे. तिथे पोहचण्याचा संघर्षाचा काळ पडद्यावर बघायला मिळाला, कशा आणि कोणकोणत्या अडीअडचणींतून मार्ग काढत इतक्या अवघड विषयावर त्यांनी उत्तर शोधले. जणू ते मानवाच्या कण्यावर म्हणजे स्वाभिमानावर काम करत होते. हे फारच मोठे काम होते आणि त्यात यश मिळवणे हाच चित्रपटाचा मूळ गाभा आहे. त्यांच्या इतक्या मोठ्या कामाच्या तुलनेने खूप कमी लोकांना याबद्दल माहिती आहे. त्यांचे वैद्यकीय क्षेत्रातले योगदान खरे तर इतके मोठे आहे की त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळावा, असे मला मनोमन वाटते. पुस्तकात वाचलेल्या गोष्टी, काहीजणांकडून प्रत्यक्ष ऐकून हे कळले की त्यांनी शस्त्रक्रिया केली म्हणजे हा माणूस चालायला लागणार. बरा होणार. त्यांचा या संदर्भात इतका अभ्यास आहे की त्यांनी मत दिले की शस्त्रक्रियेचा उपयोग होणार नाही, तर ती करूच नये कुणी. एक प्रकारे दैवी देणगीच आहे ही.

निर्माते विजय मुडशिंगीकर यांनी श्रीकांत बोजेवार यांच्याकडून पटकथा लिहवून घेतली होती. त्यानंतर काही काळाने हा चित्रपट माझ्याकडे आला. मी आधीच 'ताठ कणा' हे पुस्तक वाचले होते. त्यामुळे याविषयी फार उत्सुकता वाटत होती. मग बोजेवार आणि मी मिळून एक लेखक-दिग्दर्शकाची वैचारिक देवाणघेवाण, चर्चा केली. काही बदल केले. बऱ्याच गोष्टी त्यांनी खूप सुंदर लिहून ठेवल्या होत्या. सत्यात बदल न करता कथा सिनेमॅटिक कशी होईल हे पाहिले आणि आम्ही तसा प्रयत्न केला. उमेश कामतचे नाव सगळ्यांच्या डोक्यात होते. त्याच्या बऱ्याच लूक टेस्ट केल्या. साधारण पाच-सहा वयोगटातल्या छटा कथेत दाखवायच्या होत्या. तो त्या त्या वयातला फरक त्याच्या भूमिका-अभिनयातून जाणवतो आहे. महाविद्यालयातले डॉक्टर ते चाळिशी-पन्नाशीच्या टप्प्यापर्यंतचे डॉक्टर त्याने रंगवले आहेत.

संशोधनासाठी त्यांना खरा मणका मिळत नव्हता. नाइलाजाने अभ्यासासाठी त्यांना तो कणा चोरून आणावा लागला होता. हे पुस्तकात लिहिलेले आहे. पण ते चित्रपटात दाखवायला नको, ते बरे दिसणार नाही, असे त्यांना वाटत होते. त्यावर मी त्यांना म्हटले होते, की हाच तर खरा ड्रामा आहे. चित्रपटात त्यांना हे का करावे लागले, याचे व्यवस्थित स्पष्टीकरण येते. ते पाहिल्यानंतर डॉक्टरांची प्रतिक्रिया होती की 'असू दे हा प्रसंग. छान वाटते आहे.' त्या घटनेनंतर विद्यार्थ्यांना मृतदेह अभ्यासासाठी, निरीक्षणासाठी देण्यात येऊ लागले. त्यांच्यामुळे अशा काही गोष्टी पुढच्या डॉक्टर-विद्यार्थ्यांसाठी सुकर झाल्या हे आपसूकच या प्रसंगातून अधोरेखित होते.

चित्रपटात प्रेमकथेचा एक हलकासा धागा ठेवला आहे. डॉक्टर हाही शेवटी माणूस आहे. त्यालाही भावविश्व आहे. मात्र त्यावर अधिक लक्ष केंद्रित न करता ते दाखवले आहे. सुरुवातीला हा धागा मला थोडा फिका वाटत होता. तो कथानकात कसा गुंफला जाईल असे वाटत होते. पण चित्रीकरणाचे पुढचे टप्पे येत गेले तसे हे चांगले वाटेल असा आत्मविश्वास वाटला.

चित्रीकरणासाठी त्या काळातले किंवा अनुषंगिक स्थळ मिळणे हा एक मोठा मुद्दा असतो. कारण आता सगळीकडे आधुनिकीकरणाचे वारे पोहचलेले असल्याने कुठे ना कुठे त्याच्या खुणा-ठसे दिसतातच. अशा वेळी थोडीशी व्हीएफक्सची मदत घ्यावी लागते. मात्र ती कमीत कमी घ्यावी लागावी म्हणून चित्रीकरणासाठी जागाच अशी शोधायचो की तो काळ त्यातून उभा राहील. चित्रीकरणानंतर कमीत कमी काम करावे लागेल. १९४० मधले गोवा मिळणे शक्य नव्हते. मग कोकणात कुडाळच्या एका वाडीत चित्रीकरण केले. वैद्यकीय घटनांच्या चित्रीकरणाच्या वेळी स्वतः डॉक्टर, त्यांचे साहाय्यक यांचे मार्गदर्शन मिळाले. अगदी डॉक्टर रुग्णाच्या कोणत्या बाजूला उभे राहून तपासतात हे कळले. तर ते उजव्या बाजूला उभे राहून तपासतात. अशा अनेक बारीकसारीक गोष्टींचा विचार केला गेला. शक्यतो वास्तवाच्या जवळ जायचा प्रयत्न केला. मात्र तो डॉक्युड्रामा वाटायला नको, ही काळजीही घेतली. त्यात डॉक्टरांचा तो वैद्यकीय वाटचालीतला संघर्ष दिसतो आहे.

वैद्यकीय संकल्पना, शस्त्रक्रियेविषयीची माहिती चर्चेच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहचेल असे पाहिले. शस्त्रक्रियेचा प्रसंग डॉक्टरांच्या साहाय्यक आणि डॉक्टर विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रित केला. शस्त्रक्रियेच्या वेळी कोणाची काय जबाबदारी असते, कोणते उपकरण कसे वापरतात वगैरेची माहिती त्यांनी दिली. प्रात्यक्षिक दाखवल्यावर मग अभिनेते तसे करायचे. कारण खरेच शस्त्रक्रिया चालू आहे, हे दिसणे गरजेचे होते. ते सेन्सॉरच्या नियम आणि अटी पाळून चित्रित केले. मला सगळ्यात आवडलेला प्रसंग हा डॉक्टर आणि त्यांच्या पत्नीचा आहे. नरेंद्रची गुंतागुंतीची केस घ्यावी की नाही अशा दुविधेत नायक आहे. नरेंद्रचे वडील सांगतात की 'तुम्ही आमच्यासाठी देव आहात.' त्यावर नायकाला वाटते की 'मी देव असेन तर केस घ्यावी की नको असा प्रश्न मला का पडतो आहे.' दुसऱ्या बाजूला प्लिफ सर्जरीवरून वादविवाद सुरू असतात. त्यामुळे त्याच्या मनात एक भीती निर्माण झालेली असते, की नरेंद्रची केस अयशस्वी ठरली तर करिअरवर गदा येईल की काय? त्याची ही घालमेल पत्नी कशी दूर करते असा तो प्रसंग आहे. बोजेवार यांनी तो खूप सुंदर लिहिला आहे आणि उमेश व दीप्ती देवी यांनी तो प्रसंग फार छान साकारला आहे. प्रतिमा रामाणी

यांना मी प्रत्यक्ष भेटलेलो नाही. पण त्यांना त्यांची व्यक्तिरेखा कुठेही खटकली नाही. डॉक्टरचे कर्तव्य आणि माणुसकीचे नाते यांची खूणगाठ पुन्हा बांधली जाते ती कायमसाठीच.

## ऊर्जादायी प्रेरणात्मक व्यक्तिमत्त्व

**उमेश कामत**



**सुरुवातीला** मी डॉक्टर रामाणी यांचे 'ताठ कणा' पुस्तक वाचून काढले. त्याखेरीज त्यांच्याविषयीची माहिती, टिपणं वगैरे वाचले. त्यांना भेटलो, त्यांच्याशी बोललो. ती एक ग्रेटभेट होती. माझ्या आजूबाजूला, ओळखींच्यापैकी कुणा ना कुणाच्या माहितीत किंवा खुद्द त्यांच्यावरही डॉक्टरांनी उपचार केले आहेत हे जाणवत गेले. त्यांचे कार्य एवढे मोठे आहे, की कुठे ना कुठे कुणाला तरी बरे केलेले असते, कुणाची न कुणाची शस्त्रक्रिया केलेली असते. अशा व्यक्तिमत्त्वाची भूमिका साकारायची आहे ही खूप सकारामत्मक गोष्ट वाटली. हुरूप वाढला.

चित्रीकरणाच्या पहिल्याच दिवशी ते स्वतः आले होते. त्यांनी त्यांची देहबोली, लकबी सांगितल्या. लीलावतीच्या ऑपरेशन थिएटरमध्ये पहिलाच प्रसंग चित्रित केला होता. तेव्हा त्यांनी आणि त्यांच्या साहाय्यकांनीही हात कसे धुवायचे, अगदी कोपरापर्यंत धुऊन नंतर ते वरच्या वर धरून कसे ग्लोव्हज घालायचे, साहाय्यकांची मदत कशी घ्यायची, वगैरे सांगितले. वेळेच्या बाबतीत कसे काटेकोरपणा पाळला जातो, ते स्वतः किती वक्तशीर आहेत, शिस्तीचे भोक्ते आहेत, हे कळले. शस्त्रक्रियेत एकेका मिनिटाचे महत्त्व असल्याने त्यात काही हयगय झाल्यास कारण समजून घेऊन त्यानुसार कारवाई होऊ शकते हे समजले. डॉक्टरांच्या स्वभावातल्या अशा अनेक गोष्टी त्यांच्या काही भेटींमधून मला उलगडल्या. चित्रपटात डॉक्टरांची भूमिका साकारण्यासाठी मी काय करता येईल, याचा विचार केला. त्यांच्या अनुभवसमृद्ध जीवनाचे प्रतिबिंब दाखवताना त्यांची देहबोली, त्यांचा रुग्णांप्रती असणारा दृष्टिकोन, वैद्यकीय पेशाबद्दलची त्यांची आस्था, त्यांची निष्ठा, समर्पित वृत्ती यांचा आभास अभिनयाच्या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न मी नक्कीच करू शकतो, असे मला वाटले. दिग्दर्शक गिरीश मोहिते यांनीही तेच सांगितले, की आपल्याला डॉक्टरांची नक्कल करायची नाही.

या चित्रपटात विशी ते पन्नाशीपर्यंतचा कालखंडातले डॉक्टर अशी ही भूमिका होती. त्या दृष्टीने मेकअपच्या ट्रायल्स केल्या. त्यामुळे त्या त्या काळानुसार तसे बदल करून हा प्रवास कसा दाखवता येईल, याचा अभ्यास करण्यात आला. त्यासाठी वजन कमी-अधिक करणे, देहबोली वगैरे अनेक बारीकसारीक गोष्टींवर काम झालेले आहे. गिरीश मोहिते यांनीनीही मला खूप मदत केली. डॉक्टर हे लोकांसाठी, रुग्णांसाठी देव आहेत, पण त्यांच्यासाठी रुग्ण हा जणू देवासमान आहे. तो बरा होऊन घरी जाणे, यातच त्यांनी समाधान मानले. त्यांचा हा विचार, त्यांची हुशारी आणि त्यांचा जिद्दी स्वभाव असू दे कोणतीही एखादी गोष्ट करायचा ध्यास त्यांनी घेतला की पूर्णत्वास नेण्यासाठी अपार मेहनत घेतील, कष्ट घेतील. त्यांचा इतक्या वर्षांचा संघर्ष असे अनेक पैलू या भूमिकेला आहेत. हे सगळे दाखवणे हे खूप आव्हानात्मक (चॅलेंजिंग) होते.

आपण एक कलाकार असतो, तसेच एक माणूसही असतो. त्यामुळे अशा अनेक गोष्टी असतात, जेथे आपला कस लागतो. असे अनेक प्रसंग होते. एक चटकन आठवतो आहे, तो म्हणजे मृतदेहाजवळ उभे राहण्याचा प्रसंग. डॉक्टर म्हटल्यावर शस्त्रक्रिया, मृतदेह अशा गोष्टींशी संबंध येतोच. मला स्वतःला लहानपणी (आता थोडी कमी झाली आहे ही भीती पण) हॉस्पिटल, रक्त अशा गोष्टींची भीती वाटायची. आता डॉक्टरांची भूमिका म्हटल्यावर कस येथेच सुरू झाला. एक दिवस कळले की कूपर रुग्णालयामध्ये आमचे चित्रीकरण होणार होते आणि एका मृतदेहापाशी मी उभा आहे, असा प्रसंग चित्रित होणार होता. माझ्यासाठी तो दिवस अगदीच लक्षात राहण्याजोगा आहे. डॉक्टर होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणकालावधीत अशा प्रकारे मृतदेह पाहावा लागतो, हाताळावा लागतो. परवानगी मिळाल्यानंतर ही गोष्ट आयत्या वेळी मला कळली होती. त्यामुळे मी जरासा हडबडलो होतो मनातून. मी एकटाच मृतदेहासह त्या खोलीत असणार होतो. सगळी टीम माझी समजूत घालून मला चार धीराच्या गोष्टी सांगत होती, की विद्यार्थ्यांनाही भीती वाटते, त्यांना त्रास होतो, चक्कर येते वगैरे वगैरे. टीमने सांगितलेल्या अशा गोष्टींमुळे आणखी भीतीच वाटायला लागली. मी हिय्या करून चित्रीकरणासाठी गेलो. शॉट कसा घेतला जाणार हे मला मॉनिटरवर दाखवले गेले. मग सगळे बळ एकवटून तेथे गेलो. शॉट दिला. माझ्यासाठी हा प्रसंग अविस्मरणीय ठरला. बाहेर आल्यावर मला अर्थात- उमेश कामतला - कुठेतरी बरेही वाटले, की तेवढ्यापुरती तरी ती भीती गेली. त्यावर मी मात करू शकलो. स्वतः डॉक्टरांनी माझ्या अभिनयाला दिलखुलास दाद देणे ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे.

# गगन सदन तेजोमय

**कोरोनाच्या** काळात या वर्षी दिवाळी अंक प्रकाशित होतील का, हा प्रश्न होता. 'ग्रंथाली'ने पुढाकार घेऊन उत्तम पाच दिवाळी अंकाची योजना जाहीर केली. यात अंतर्नाद, मौज, पद्मगंधा, ऋतुरंग आणि शब्द रुची हे अंक होते. या योजनेला सर्वदूर उदंड प्रतिसाद मिळाला. अंक उपलब्ध होऊ न शकल्याने शेवटी योजना थांबवावी लागली. स्टोरीटेलने संच घेणाऱ्या सभासदांना त्यांची ऑडिओ बुक्स (मराठी, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषांत) तीन महिने विनामूल्य ऐकता येण्यासाठी कोडकार्ड भेट देऊन, या योजनेत महत्त्वाचा सहभाग घेतला. त्यासोबत दिवाळीपहाट हा कार्यक्रम सभादांना दिवाळीच्या पहिल्या दिवशी डिजिटल माध्यमातून पाहता यावा म्हणून तो वीर सावरकर सभागृहात चित्रमुद्रित झाला. तो १३ नोव्हेंबरपासून ग्रंथाली वेब पेजवर उपलब्ध केला. 'अॅड फिझ'च्या माध्यमातून विनोद पवार व महेंद्र पवार यांच्या सहयोगाने आयोजित 'गगन सदन तेजोमय – पर्व दुसरे' या दिवाळीपहाट कार्यक्रमाचे सूत्र होते पत्रास कारण की...

या कार्यक्रमाची संहिता प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप यांनी लिहिली. ही दिवाळीपहाट अनेकांच्या जिव्हाळ्याचा, कुतूहलाचा विषय होता. नवीन पिढीलाही पत्राचा महिमा उलगडावा या उद्देशाने पत्रवाचन आणि त्या अनुषंगाने गाणी असा बहारदार कार्यक्रम सादर झाला.

कार्यक्रमाचा आरंभ अस्मिता पांडे यांनी केला. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'ग्रंथाली'ने मुद्रित माध्यमापासून डिजिटल माध्यमापर्यंत कायम नावीन्याला सामोरे जात, एक खुले व्यासपीठ म्हणून, केलेला ४५ वर्षांचा प्रवास अधोरेखित केला. काळाची गरज ओळखून आयपॅड, टॅब, इ-बुक, स्टोरीटेलच्या माध्यमातून ऑडिओबुकमध्ये प्रवेश, झी मराठीच्या साथीने आणि 'झी'चे निर्माते नीलेश मयेकर व अनिकेत जोशी यांच्या सहकार्याने कमीत कमी किमतीत वाचकांना दिलेले दिवाळी अंक आणि मुलांसाठी 'खाली डोकं वर पाय' हा वाचनाचा पाय रचणारा अंक, दर शुक्रवारी 'साहित्याच्या पारावर' हा डिजिटली सादर होणार उपक्रम, कोरोनाकाळात केलेली डिजिटल प्रकाशने, अशा सगळ्याचा आढावा घेतला.

संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांच्या खुसखुशीत, ओघवत्या निवेदनशैलीमुळे कार्यक्रम एका वेगळ्याच उंचीवर पोचला. सचिन खेडेकर, स्पृहा जोशी, सुमित राघवन, दीपक करंजीकर यांनी पत्रवाचन केले. अशोक नायगावकर यांनी आपले 'तातूस पत्र' हे खुमासदार पत्र वाचून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाचे निवेदन करताना संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांनी पत्रांचं महत्त्व, त्यातील गमती सांगत त्याभोवती गुंफलेले भावविश्व उलगडत नेले. कालिदासाच्या 'मेघदूता'पासून पत्रमहिमा उलगडायला सुरुवात झाली. कुबेराच्या शापाने पत्नीपासून वियोग सहन कराव्या लागणार्या यक्षाने मेघाला दूत बनवून पत्नीला आपली खुशाली कळवण्याची कल्पना कालिदासाने केली आणि 'मेघदूत' हे काव्य रचले. वसंत बापट यांनी मेघदूताचा मराठी अनुवाद केला. त्यातील काही ओळींचे वाचन स्पृहा जोशी यांनी केले.

ज्ञानेश्वरांना पत्र लिहिताना मायना काय लिहावा हे न सुचल्याने चांगदेवांनी त्यांना कोरे पत्र पाठवले, ज्ञानदेवांनी त्याही पत्राला उत्तर दिले. संतकाळातील निरोपाची, शुभशकुनाची खूण सांगणारी ज्ञानदेवांची रचना यावेळी सादर केली गेली.

'पैल तोहे काऊ कोकताहे' ही रचना केतकी भावे-जोशी यांनी सादर केली. तर ग्रेस यांची रचना 'तुला पाहिले मी नदीच्या किनारी' हे गीत अजित परब यांनी सादर केले.

शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांनी शेतकरी-कामकरी मजुरांच्या मुलांना म्हणजे कष्टकरी समाजातील विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिलेले हृद्य पत्र सचिन खेडेकर यांनी तितक्याच परिणामकारक रीतीने वाचून दाखवले.

'पत्रास कारण की... बोलायची हिंमत नाही...' व 'जा रे, जा रे, जा घेऊन संदेश पाखरा मानसीचा राजहंसा...' ही दोन गाणी केतकी भावे-जोशी आणि अजित परब यांनी सादर केली.

शहनाज शेख आणि गीता महाजन यांनी मूळ हिंदीत लिहिलेल्या गीताचा नारायण सुर्वे यांनी केलेला अनुवाद नारायण सुर्वे यांच्याच आवाजात पडद्यावर सादर करण्यात आला. 'तुम्ही सुखात समदी र्हावा, काय ते पत्रात लिवा..' हे सुप्रसिद्ध गीतपत्र रसिकांना मनापासून आनंद देऊन गेले.

संपदा यांनी इंग्लंडची राणी एलिझाबेथने पत्रावर घातलेल्या ऐतिहासिक बंदीविषयीची माहिती दिली. मात्र पत्रे लपली नाहीत; उलट त्यांनी अनेक क्रांतिकारक घटकांना जन्म दिला हे सांगून, पत्र एखाद्या कलाकृतीचेही तारणहार कसे होते यासंदर्भात, 'वस्त्रहरण' हे नाटक पाहून पु.ल. देशपांडे यांनी लेखक गंगाराम गवाणकार यांना लिहिलेले पत्र नाटकाच्या लोकप्रियतेसाठी कसे उपयोगी ठरले याची माहिती विषद केली. त्या कौतुकपत्राचे वाचन सुमित राघवन यांनी केले.

यानंतर 'सप्रेम नमस्कार विनंती विशेष' आणि 'घाल घाल पिंगा वारा' ही दोन गाणी सादर झाली.

पु.ल. देशपांडे यांनी जयवंत दळवी यांना लिहिलेल्या पत्राचे वाचन सुमित राघवन यांनी केले. पु.शि. रेगे यांची सावित्री ही

पत्रमय कादंबरी म्हणजे मराठी साहित्यातील सौंदर्यलेणे. यातील काही भाग स्पृहा जोशी यांनी वाचून दाखवला.

जी.ए. कुळकर्णी आणि ग्रेस यांसारख्या मनस्वी व्यक्तिमत्त्वांमधील अनोखे भावबंध स्पष्ट करणारी पत्रे म्हणजे 'पत्रवेळा.' दीपक करंजीकर यांनी याचे वाचन केले.

यानंतर 'भय इथले संपत नाही' हे गाणं सादर झाले.

दुर्गाबाई भागवत यांनी वृद्धत्वाबद्दल मार्मिक विचार पत्रातून मांडले होते. त्या पत्राचे वाचन स्पृहा जोशी यांनी केले.

शिवरायांचे आज्ञापत्र दीपक करंजीकर यांनी त्या वेळच्या भाषेच्या लहेजात उत्तम वाचून दाखवले. औरंगजेबाने भरदरबारात शिवाजीमहाराजांची महती सांगितली, ती नोंद बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'जाणता राजा'च्या सौजन्याने विक्रम गायकवाड यांनी प्रभावीपणे सादर केली. यानंतर शंकर वैद्य यांची

*'शतकाच्या यज्ञातून उठली*
*एक केशरी ज्वाला*
*दहा दिशांच्या हृदयामधून*
*अरुणोदय झाला'*

ही रचना रसिकांच्या तनामनावर रोमांच उभे राहावेत इतकी उत्तम रीत्या केतकी भावे-जोशी यांनी सादर केली.

पंडित नेहरू यांनी कन्या इंदिरा गांधी यांना लिहिलेलं पत्र दीपक करंजीकर यांनी सादर केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या भावाला झालेल्या अटकेची बातमी कळल्यावर येसूवहिनींना लिहिलेले काव्य-पत्र सचिन बेडेकर यांनी उत्कटतेने सादर केले. अशोक नायगावकर यांचे नेहमीच्या खुसखुशीत शैलीत सादर केलेले कोरोनाकाळाचे विडंबनकाव्य 'तातूस पत्र' हे सभागृहात हशा पिकवून गेले.

सुनीताबाईंनी जी.ए. कुलकर्णी यांना लिहिलेले पत्र, लोकमान्य टिळकांनी मुलांना लिहिलेले पत्र, अगदी शरद जोशी या हिंदीतील प्रसिद्ध लेखकाचे खुमासदार पत्र असा सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, साहित्यिक क्षेत्रांतील पत्रखजिना उलगडण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला गेला.

माननीय शरद पवार आणि देवेंद्र फडणवीस यांना आम्ही या उपक्रमाची माहिती दिली व आपणही पत्रवाचन करून यात सहभाग घ्यावा अशी विनंती केली. आपल्या नित्यक्रमात व्यग्र असूनही या दोन्ही लोकप्रिय नेत्यांनी आपापले पत्र वाचून या कार्यक्रमाला वेगळे परिमाण दिले. आमच्या प्रयत्नांना त्यांनी दिलेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद आम्हाला बाळ देणारा होता.

याच कार्यक्रमात ॲड फिझतर्फे, सामाजिक भान जपत, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ज्या विद्यार्थिनींनी दहावीच्या परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवले अशा तीन मुलींचा - प्रातिनिधिक - लॅपटॉप देऊन सत्कार करण्यात आला. या कामी विनायक गवांदे, संजीव सावंत, राजन पोतदार, सुजय पत्की इत्यादींची मदत झाली.

राजीव खांडेकर, प्रसाद मिरासदार, राजीव श्रीखंडे, श्रीहर्ष फेणे, विद्या जोशी, रवींद्र काणे, भगवान इंगळे, मृदुला भाटकर, आनंद लिमये, राजीव जोशी, संजय पानसे, नितीन रेडीज, सुनील शेट्ये, मुकुंद सावंत, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, एलआयसी ऑफ इंडिया, योग सिक्युरिटीज, सृजन संपदा, एनकेजीएसबी, मिस्टीकल पॅक्स, दैनिक सागर, वेंकी कमिटी ॲण्ड सी प्रा.लि., हॉटेल रामकृष्ण लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग, यांनी कार्यक्रम घडण्यास जे सहकार्य केले त्याबद्दल उपस्थितींचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.

दिवाळी अंक निघतील का ही शंका असताना 'ग्रंथाली'ने दिवाळी अंक योजना आखली याचे कौतुक करत साहित्य संघाच्या अध्यक्ष उषा तांबे यांनी दिवाळी अंक, पत्राचे महत्त्व, त्याची मनावर असलेली छाप याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

'गगन सदन तेजोमय-पर्व दुसरे' या निमित्ताने विनोद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली, तर 'ग्रंथाली'च्या २५ डिसेंबर २०२० या वाचकदिनाची माहिती ग्रंथाली विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली यांनी सांगितली.

कोरोनाचे आकडे किती वाढले ते सांगणे हेच काम सर्वत्र सुरू असताना, सकारात्मक घटनांचा आढावा घेणारे, नवी ऊर्जा देणारे अरविंद जगताप यांनी लिहिलेले समारोपाचे निवेदन सुमित राघवन यांनी केले.

पिक्सेल बाय पिक्सेलचे राजू कदम यांनी उत्कृष्ट चित्रीकरण करून एक मनोहारी अनुभव रसिकांना देण्यात मोलाचा वाट उचलला. वादक कलाकारांची उत्तम साथ लाभल्याने कार्यक्रम श्रवणीय झाला.

एकूणच 'पत्र' आणि त्याभोवताली गुंफलेले भावविश्व यांचा अनोखा बंध या कार्यक्रमात उलगडला गेला आणि रसिकांना आगळा आनंद देऊन गेला.

हीच आमुची प्रार्थना
अन् हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी
माणसासम वागणे

या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे दिग्दर्शन विनोद पवार, संहितालेखन अरविंद जगताप, संशोधन आणि लेखन सहाय्य अरुण जोशी, संगीतदिग्दर्शन कमलेश भडकमकर, रंगमंच दिग्दर्शन अजित दांडेकर, रंगभूषा सुनील देवळेकर, सहाय्य अमितेश केळकर, कलादिग्दर्शन समीर अन्नारकर, प्रक्षेपण सचिन पिळणकर, निर्मिती सुदेश हिंगलासपूरकर, महेंद्र पवार, धनंजय गांगल, पद्मभूषण देशपांडे यांनी केली. धनश्री धारप यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. ग्रंथाली (अनिल शिदोरे, प्रभाकर भिडे, शिरीष वीरकर, जितेंद्र खेर, श्रीधर पाटील) विश्वस्तांचा पाठिंबा, राजू कदम यांचे सहकार्य आणि प्रवीण शिंदे, प्रल्हाद जाधव, चांगदेव काळे, मेधा आलकरी, मृण्मयी भजक, किरण येले, प्रदीप पाटील, श्रीकांत पेटकर, सलील वाघमारे, सई हिंगलासपूरकर, योगिता मोरे, सुमेधा कुवळेकर, हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे यांचा यात सहभाग होता.

**- डॉ. लतिका भानुशाली**





**फारूक एस. काझी** **बाळासाहेब लिंबीकाई**

# मुलांसाठी 'चांगली पुस्तकं' निवडताना...

**मुलांसाठी** चंगली पुस्तकं निवडणं हे तसं प्रचंड अवघड काम. कारण कोणतीही गाईडलाइन नसताना पुस्तकांची निवड, तीही खूप साऱ्या पुस्तकांतून करणं तसं महाकठीणच! मुळात आपल्याकडे मुलांसाठी म्हणून पुस्तकं घेण्याची परंपरा रूढ नाही. काही जाणते पालक मुलांसाठी पुस्तकं घेत असतील तर कोणती पुस्तकं घ्यायची, हा मोठा प्रश्न आ वासून उभा असतो. आपल्याकडे सार्वजनिक वाचनालयं पाहायला मिळतात. परंतु शाळेत, घरात मुलांसाठी वाचनालय ही चैनीची व कमी महत्त्वाची बाब मानली जाते. का वाचावं याचं महत्त्व पाहता वचनालायांचं महत्त्व अधिकच स्पष्ट होतं. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ (NCF2005), बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम- २००९ यामध्येही मुलांसाठीच्या वाचनालयांचं महत्त्व अधोरेखित केलं गेलं आहे.

मुलांसाठीच्या अशा ग्रंथालयात कोणती पुस्तकं हवीत? ती कशी निवडायची? त्याचे काही निकष आहेत का? असे प्रश्न पडणं अगदीच साहजिक आहे. कारण आपल्या मुलांचं वय, त्यांची आवड, पुस्तकांची भाषा, त्यातील चित्रं, आशय, बांधणी इत्यादी बाबींचा आपण विचार केलेला असतोच असं नाही. परंतु मुलांसाठी 'चांगली' पुस्तकं निवडताना काही मुद्द्यांची मदत मिळू शकते ज्याद्वारे आपण मुलांसाठी चांगली पुस्तकं निवडू शकतो. (आपण इथं ४ ते १४ वयोगटाचा विचार करणार आहोत.)

*पुस्तक वाचण्याचे फायदे*

पुस्तक वाचण्यानं नेमकं काय साधतं? याचा आपण विचार करायला हवा. कारण पुस्तकांची आवश्यकता का आहे हे पटल्याशिवाय मुलांसाठी पुस्तकं घेण्याचं महत्त्व लक्षात येणार नाही. पुस्तक वाचण्यानं सर्वाधिक कोणता फायदा असेल तर तो आहे आनंद मिळवणं. ज्यामुळे मुलांना वाचनाची गोडी लागते. मुलं 'वाचती' होतात. पुस्तक वाचलं की अनेक गोष्टींचा विचार सुरू होतो. विचार करण्यात शिस्त येत जाते. समज वाढण्यास मदत मिळते. चांगली पुस्तकं असतील तर हा पैस अधिकच विस्तारतो. वाचन म्हणजे एकप्रकारे स्वत:शी संवाद असतो. त्यामुळे त्यातील अनेक शब्द तुम्हाला नव्यानं परिचित होत असतात. शब्दांच्या अर्थच्छटा आकलनाच्या पातळीवर दृढ व्हायला लागतात. शब्दश्रीमंती हे वाचकाला मिळालेलं वरदान मानलं जातं.

वाचणारा माणूस अधिकाधिक कल्पक बनत जातो. त्याची तर्क करण्याची क्षमता विकसित होते. विचार करण्याचा रस्ता वाचनाच्या अंगणातूनच जातो. पुस्तकं विचारांचा पैस वाढवतात आणि त्यातून स्व-निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. वाचनानं आपल्या मतांवर ठाम राहणं आणि योग्य निर्णय घेणं शक्य होतं. चांगल्या पुस्तकांच्या वाचनातून सर्वांत म्हत्त्वाचं काय साध्य होत असेल तर ते आहे एक चांगला माणूस घडणं. जो विचारी, संवेदनशील आणि जाणीव असलेला असेल.

पुस्तक वाचनाच्या फायद्यांचा विचार करताना चांगल्या पुस्तकांची निवड कशी करायची याचा विचार करणं क्रमप्राप्त आहे.

*चांगल्या पुस्तकांची निवड*

अनेक पुस्तकांच्या गर्दीतून आपल्या मुलांसाठी (मुलगी-मुलगा या दोन्ही अर्थांनी) योग्य पुस्तक निवडताना आपला जो गोंधळ होत असतो त्यासाठी काही मार्गदर्शक मुद्द्यांची चर्चा आपणास करता येईल.

वयोगट, आवड-निवड, मुलांच्या गरजा.
कथानक, आशय, मुलांच्या रंगवलेल्या प्रतिमा.
पुस्तकातील चित्रं.
पुस्तकात वापरली गेलेली भाषा.

मूल्यं- नैतिक, सामाजिक आणि संवैधानिक.

*विविध साहित्यप्रकार*

'बालसाहित्य बालभोग्य असलं पाहिजे' असं ताराबाई मोडक म्हणत असत. याचाच अर्थ असा की बालसाहित्य हे मुलांच्या आवडीचं, भावविश्वातलं, अनुभवातलं, त्यांच्या गरजा ओळखून लिहिलं गेलेलं असलं पाहिजे. अन्यथा केवळ मुलांना केंद्रस्थानी ठेवून कथा किंवा कविता लिहिणं आणि मांडणी, भाषा, विचार आणि दृष्टिकोन मात्र प्रौढ असेल तर त्याला बालसाहित्य कसं म्हणावं? याचा विचार प्रामुख्यानं व्हायला हवा.

*वयोगट, आवड-निवड आणि मुलांच्या गरजा*

मुलांसाठी पुस्तक निवडताना किमतीचा जितका विचार केला जातो तितका विचार वयोगट, आवड-निवड आणि गरजांचा केला जात नाही. जो आधी केला गेला पाहिजे. मुलांच्या वयोगटाचे साधरण तीन टप्पे पाडले जातात.

बालवाडी ते दुसरी (वय तीन ते आठ)
तिसरी ते पाचवी (वय नऊ ते अकरा)
सहावी ते आठवी. (वय बारा ते चौदा)

या सर्व वयोगटाची काही वैशिष्ट्ये असतात. लहान मुलांना प्राणी, पक्षी, कीटक, निसर्ग, कुटुंब, प्रेम इत्यादीचं साहित्य जास्त आवडतं. उदा. राजीव तांबे यांची नदी, वारा इ. पुस्तकांची मालिका. एकलव्य प्रकाशनची 'मी पण', 'नाव चालली'; महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणेनं केलेली अनुवादित पुस्तकांची मालिका ही पुस्तकं या वयोगटासाठी उत्तम आहेत. विंदा करंदीकर, शांता शेळके यांच्या कविता एक वेगळाच अनुभव देऊन जातात. किशोरगटासाठी आबा गोविंद महाजन यांचं 'आबाच्या गोष्टी', दिलीप प्रभावळकर यांचं 'बोक्या सातबंडे', माधुरी पुरंदरे यांचं 'खजिना', फारूक काझी यांचं 'तू माझी चुटकी आहेस आणि इतर कथा', डॉ. विशाल तायडे यांचं 'प्राण्यांचा व्हाट्सॲप आणि इतर गोष्टी', संगीता बर्वे यांचं 'पियूची वही', राजीव तांबे यांची 'गंमत शाळा भाग १ व २' यासारखी पुस्तकं वाचनाचा वेगळाच आनंद देऊन जातात. कुतूहल, मजा, भन्नाट कल्पना आणि त्यांच्या वयाच्या अवखळ खोड्या हे सर्व मुलांना त्यात सापडतं.

सहावी ते आठवी म्हणजे बारा ते चौदा वयोगटासाठी शौर्य, धाडस, भूत-प्रेत, भावनिक व्याकुळता असे विषय असणारं साहित्य निवडलं गेलं पाहिजे. उदाहरणार्थ, रोहन प्रकाशनचा रस्किन बाँडच्या पुस्तकांचा अनुवाद, अनिल अवचट यांचं 'सृष्टीत गोष्टीत', इंद्रजित भालेराव यांच्या कवितांचं 'गावाकडे', डॉ. प्रदीप आवटे यांची पुस्तकं, आनंद घैसास यांची पुस्तकं.

*कथानक, आशय, मुलांच्या रंगवलेल्या प्रतिमा*

मुलांना साध्या परंतु रंजक कथानक असलेल्या आणि सोपी रचना असणाऱ्या गोष्टी फार आवडतात. ज्या गोष्टीमध्ये त्यांच्या विचारांचं, अनुभवांचं प्रतिबिंब पडलेलं असेल ते साहित्य मुलांना आकर्षून घेतं. पुस्तकांचा आशय रोचक आणि रसपूर्ण असला पाहिजे. पुस्तकातील आशय मुलांच्या भौगोलिक वर्तुळाबाहेरचा असला तरी त्यात मुलांना आपलेपणा वाटेल, नवे काहीतरी शिकण्याची संधी देणारा, कुतूहल जागं करणारा असला पाहिजे. विविध स्थळकाळातील, भिन्न परिसर, भिन्न समाजजीवन, भिन्न संस्कृती यांची ओळख करून देणारं साहित्य मुलांसाठी निवडलं पाहिजे. उदाहरणार्थ, 'देनिसच्या गोष्टी', तेत्सुको कुरियोनागे यांचं 'तोत्तोचान', प्रियंवद यांची कादंबरी 'नाचघर', रस्किन बाँड यांची जवळजवळ सर्वच पुस्तकं.

पुस्तकात मुलांच्या प्रतिमा कशा रंगवल्या गेल्या आहेत यावरही पुस्तकांची निवड ठरते. मुलांचा स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार केला गेला हे का? मुलांच्या मतांना, विचारांना स्थान दिलं आहे का? उदाहरणार्थ, का का कुमारी, प्रमचंद यांची कथा 'इदगाह', जूची गोष्ट, नोबियाची विहीर, स्वाती राजे यांचं 'पाऊस' आदी

*पुस्तकातील चित्रे*

मुलांसाठीच्या पुस्तकातील चित्रं प्रभावी व मुलांचं लक्ष वेधून घेणारी असली पाहिजेत. चित्रं आशयाला बळकटी देतात. वाचता न येणारी मुलं चित्रावरून मजकुराचा अर्थ लावतात. स्वतः कथा रचतात. मजकूर अधिक आकलनशील होण्यासाठी चित्रांची गरज आहेच. एकसुरी, सपाट आणि विविधतेचा स्वीकार न करणारी चित्रं मुलांच्या समजेचा पैस वाढवत नाहीत.

आपल्याकडे बऱ्याचदा मजकुरातील वर्णनच चित्ररूपानं काढलेलं दिसते. खरं तर मजकुराची खोलवर समज निर्माण करण्यासाठी चित्रांची मदत होत असते. कथानक पुढं नेण्याचं काम चित्रं करतात. तेव्हा मुलांसाठी चित्रं ही कल्पक, विचारांना चालना देणारी आणि विविध शैलीतील असली पाहिजेत. उदाहरणार्थ, नीलेश निमकर यांचं 'माझी ओळख', 'आमची भन्नाट गाय', एनबीटीचं 'महागिरी', ज्योत्स्ना प्रकाशन, प्रथम बुक्स, एकलव्य प्रकाशन यांची पुस्तकं अशाच कल्पक चित्रांची असतात.

*पुस्तकात वापरली गेलेली भाषा*

बऱ्याचदा मुलांच्या पुस्तकातील भाषा ही मुलांसाठीची वाटतच नाही. भाषेचा बाज प्रौढच असतो. मुलांच्या भाषिक वैशिष्ट्यांचा विचार करून भाषेचा वापर केला गेला पाहिजे. मुलांसाठी लिहिणं म्हणजे साधंसोपं लिहिणं असा त्याचा अर्थ होत नाही. समृद्ध आकलनसुलभ भाषेचा वापर करता येणं सहज शक्य आहे. ओढूनताणून आलेली कृत्रिम भाषा टाळली पाहिजे. कठीण शब्द आले तरी मुलं अनुमानानं त्यांचा अर्थ लावतात. परिसरात ऐकलेले, बोललेले कित्येक अवघड शब्द मुलांना माहीत असतात. स्टिरियो-टाईप भाषा बदलली पाहिजे.

ओघवती आणि चित्रमय भाषा मुलांना जास्त भावते. भाषेचा केलेला कल्पक वापर, भाषेची मजा अनुभवणं, शब्दांची नादमयता

यामुळे मुलांना वाचताना आनंद मिळतो. आणि ज्यातून आनंद मिळतो अशा गोष्टी मुलं पुन:पुन्हा करतात. तेव्हा भाषा हा मुलांसाठी पुस्तक निवडताना कळीचा मुद्दा ठरतो.

नीलिमा गुंडी यांच्या कवितांत साधलेली शब्दचमत्कृती, विंदांच्या कविता, सूर्यकांत सराफ यांच्या कथातील विनोदांची सहज पेरणी, राजीव तांबे यांच्या पुस्तकांतील नावीन्यपूर्ण भाषा, सोनाली गावडेची 'माझी दैनंदिनी'मधील जिवंत, दैनंदिन जीवनातील भाषा.

*मूल्ये- नैतिक, सामाजिक आणि संवैधानिक*

मुलांमध्ये मूल्यांचा व नैतिकतेचा विकास घडवून आणण्यात पुस्तकांचा मोठा वाटा असतो. पुस्तकामध्ये जे विश्व चितारलेलं असतं, जी मूल्यं त्यात प्रतिबिंबित झालेली असतात, आणि मुलांना ज्या विचार-विश्वात पुस्तकं घेऊन जातात त्यांचा मुलांच्या व्यक्तिमत्त्वविकासावर प्रभाव पडत असतो.

मुलांमध्ये नैतिक, सामाजिक आणि संवैधानिक मूल्यांचा परिपोष करतील अशी पुस्तकं निवडण्यावर भर दिला पाहिजे. याचा अर्थ केवळ शिकवणारी, संस्कार करणारी, बोध देणारी पुस्तकं निवडणं असा होत नाही. उलट सर्वसमावेशक पुस्तकांची निवड आपण केली पाहिजे.

केवळ योग्य आणि अयोग्य एवढंच सांगणं हे पुस्तकांचं काम नाही. उलट योग्य काय हे निवडून, तदनुसार विचार करण्याची आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणारी पुस्तकं असायला हवीत. यासाठी विविध प्रकारचे वातावरण, लोक, घटना, मुद्दे आणि दृष्टिकोन असणारी पुस्तकं निवडायला हवीत.

उदाहरणार्थ, का का कुमारी, गोष्ट फर्डिनांडची, बसाराची ग्रंथपाल, राजा शिरगुप्पे यांचं 'न पेटलेले दिवे', माधुरी पुरंदरे यांचं 'हॅनाची सुटकेस', शिनची तीन चाकी सायकल, तोत्तोचान.

*विविध साहित्यप्रकार*

मुलांसाठी केवळ, कथा किंवा कविता असं साहित्यप्रकार न निवडता कथा (सर्व प्रकारच्या), नाटक, निबंध, ललितलेखन, प्रवासवर्णन, कादंबरी, कॉमिक्स, कविता, शब्दांविना असणारी पुस्तकं, पत्रं, माहितीपर पुस्तकं. अशा वविध साहित्यप्रकारांची रेलचेल असायला हवी. मुलाला ज्याची आवड आहे ते पुस्तक घेऊन ते वाचेल. यामुळे मुलांची आवड निश्चित होते. मुलांना विविध साहित्य-प्रकारांच्या वाचनाचा अनुभव मिळतो. असे विविध साहित्यप्रकार मुलांना हाताळायला मिळायला हवेत.

*कोणती पुस्तकं टाळावीत?*

एकेरी कथांची पुस्तकं टाळायला हवीत. मूल्यांशी सुसंगत नसणारी पुस्तकं. अपंग, दुर्बल, वंचित, अल्पसंख्याक गटाविषयी पूर्वग्रह असणारी पुस्तकं. कमजोर आणि अतार्किक कथानक असणारी पुस्तकं. पुस्तकातील भाषा मुलांसाठी योग्य नसेल तर अशी पुस्तकं मुलांना आनंद देत नाहीत. फॉंटसाइज, चित्रं, आकार याबाबत नियम पाळत नसणारी पुस्तकं. मुलांना विचार करायला वाव न देता केवळ आणि केवळ नैतिक उपदेश करणारी पुस्तकं टाळायला हवीत.

मुलांसाठी चांगली पुस्तकं निवडताना कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत याचा विचार आपण केला. हे मुद्दे परिपूर्ण नाहीत. यात आणखी भर घालता येऊ शकते. महत्त्वाचं म्हणजे मुलांना केवळ पुस्तकं उपलब्ध करून देण्यानं जबाबदारी संपत नाही. आणलेल्या पुस्तकांतील मजा मुलांनी अनुभवावी म्हणून आपण मुलांसोबत वाचायला हवं. त्यांना वाचून दाखवायला हवं. पुस्ताकाविषयी गप्पा मारायला हव्यात. मुलांची पुस्तकाशी मैत्री करून द्यायला आपणच पुढाकार घ्यायला हवा. अन्यथा पुस्तकांची केलेली निवड व्यर्थच जाईल. स्वत: वाचते होऊया आणि मुलांना वाचते करूया.

*संदर्भ*

The Good Book Guide- National Book Trust, New Delhi. 2014 (Hindi Summery.)

क्या क्या हो बच्चों की किताब में (लेख)- कमलेश चंद्र जोशी. (शैक्षणिक संदर्भ- अंक ५८)

मुलांसोबत पुस्तक का वाचायचं? (लेख)- बाळासाहेब लिंबीकाई.

बच्चों की किताबों में चित्र.(लेख)- सोनाली बिस्वास. (शैक्षणिक संदर्भ अंक- ६३)

बच्चों के जीवन में किताबों की जादुई भूमिका- उषा मुकुंदा. (लेख.)

**फारूक एस. काझी**
भ्रमणध्वनी : ९९२१३८०९६६
farukskazi82@gmail.com

**बाळासाहेब लिंबीकाई**
भ्रमणध्वनी : ९४२३५३७१५४

ग्रंथाली




# तसबीर
**सदानंद डबीर**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

**जगण्यातल्या असोशीने काठोकाठ भरलेला संग्रह**



**साकेत भांड**

# प्रकाशनक्षेत्राचे बदलते जग

**आपला** महाराष्ट्र समृद्ध साहित्यसंपदेमुळे कायम नावाजला जातो. उत्तमोत्तम ग्रंथ, वाचनालये, प्रकाशित होणारी नवनवीन पुस्तके या बाबी म्हणजे आपल्या सांस्कृतिक जडणघडणीचा आरसा असतो. अनेक नामांकित साहित्यिकांच्या दर्जेदार साहित्यकृतींमुळे मराठी भाषा साहित्यक्षेत्रात सातत्याने आपले अव्वल स्थान राखून आहे. अर्थातच या वाटचालीत मराठी प्रकाशकांची मोलाची भूमिका आहे.

काळाची पावले ओळखून त्यानुसार योग्य ते बदल आत्मसात करणे यावरच कुठल्याही व्यवसायाचे भवितव्य अवलंबून असते. बदलत्या काळानुसार प्रत्येक व्यवसायाला बदलावे लागते, अडीअडचणींच्या काळातून नवे रस्ते शोधावे लागतात, ग्राहकांच्या बदलत्या गरजा ओळखाव्या लागतात. प्रकाशन व्यवसायही यास अपवाद नाही. त्यात गेल्या अनेक महिन्यांच्या लॉकडाऊनमुळे जगाचा अवघा चेहरामोहराच बदलून गेलाय. कोरोनाच्या या संकटमय काळात मार्केटिंगच्या कर्मचाऱ्यांनाही ऑर्डर आणण्यासाठी दुकानदारांकडे दौऱ्यावर पाठवणे शक्य होत नाहीये. तसेच शाळा, महाविद्यालय, सार्वजनिक ग्रंथालय सर्वकाही बंद असल्यामुळे त्यांच्याकडील मागणीही १०० टक्के बंद आहे. पुस्तकांच्या दुकानांमध्येही कोरोनामुळे ग्राहकांना आधीसारखे फिरून, थांबून निवांतपणे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य नसल्यामुळे ग्राहकांचेही समाधान होत नाही. त्यामुळे विक्री आणखी मंदावत आहे. मागणी असलेली बरीच पुस्तके भांडवलाअभावी प्रकाशक परत छापू शकत नसल्यामुळे मिळत नाहीत. दळणवळणाच्या साधनांअभावी पुस्तके वेळेत देता येत नाहीत म्हणून ग्राहकही नाराज होतात.

कोरोनामुळे पुस्तकप्रदर्शन, प्रकाशनसोहळे तसेच पुस्तक-भिशींसारखे अनेक उपक्रम पूर्णत: बंद असल्यामुळे अडचणी वाढल्या.

आता प्रश्न असा निर्माण झालाय, की 'या बदलांशी ताळमेळ नेमका साधायचा तरी कसा? व्यवसायाच्या दृष्टीने अयोग्य अशा गोष्टींबद्दल तक्रारी मांडत बसायचे की बदलांचे बोट पकडून प्रगतीचा मार्ग शोधत चालण्यास सुरुवात करायची, हे अर्थातच आपल्या हातात आहे.

हाच विचार करून महाराष्ट्रातल्या नामांकित अशा दहा प्रकाशकांनी नुकतेच 'वाचन जागर अभियान' राबवले, ज्याला राज्यभरातल्या असंख्य वाचकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. या अभियानात सहभागी झालेल्या दहा प्रकाशकांची प्रत्येकी २५, अशी एकूण २५० पुस्तके वाचकांसाठी तब्बल २५ टक्के सवलतीत उपलब्ध करून देण्यात आली होती. वाचकांची पावले पुन्हा पुस्तकांच्या दुकानांकडे वळावीत, वाचनसंस्कृती वृद्धिंगत व्हावी हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता, जो यशस्वी झाला असे आपण नक्कीच म्हणू शकतो.

प्रकाशकांनी एकत्रित येऊन उचललेले हे एक पाऊल निश्चितच महत्त्वाचे आहे; पण प्रश्न असा आहे, की सध्याच्या परिस्थितीत एवढेच पुरेसे आहे का? तर नाही.

जग अतिशय वेगाने बदलते आहे. विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा अफाट वेग निव्वळ थक्क करणारा आहे. साहजिकच दैनंदिन आयुष्यातही या तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला आहे. वाचक, पुस्तके आणि एकूणच प्रकाशन व्यवसाय यातही तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका बजावण्यास एव्हाना सुरुवातही केली आहे.

जगभरात इंटरनेटची क्रांती झाली आणि जग म्हणजे शब्दशः 'ग्लोबल व्हिलेज' झाले. बदलते तंत्रज्ञान आणि काळानुसार वाचक आता मोठ्या प्रमाणावर डिजिटल मीडिया आणि ऑडिओ बुक्सकडे वळताहेत. हे सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत करून त्यात काम करणे आव्हानात्मक झाले आहे. ऑडिओ बुक्स काढण्याची यंत्रणा अत्यंत खर्चीक आहे, कारण त्यामध्ये स्टुडिओ, आकर्षक आवाज

वगैरे गोष्टींची आवश्यकता भासते. त्यामुळे प्रकाशकांना व्यवसायात कालसुसंगत बदल करणे अत्यावश्यक झाले आहे.

साधारण २५ वर्षांपूर्वी इंटरनेटबरोबरच ईकॉमर्स वेबसाइट्सचा उदय झाला. ॲमेझॉन या अमेरिकन कंपनीने १९९५च्या सुमारास या ईकॉमर्स व्यवसायाचे रणशिंग फुंकले. जेफ बेझॉस या उद्योजकाने ही सुरुवात कुठल्या उत्पादनापासून केली असेल कल्पना आहे? त्याने सुरुवात केली पुस्तकांपासून. भारतात जसजसे इंटरनेट रुजू लागले तसतसे इथेही इंटरनेटचे वापरकर्ते वाढू लागले. लवकरच फ्लिपकार्ट या भारतीय ईकॉमर्स वेबसाइटची निर्मिती करण्यात आली. या कंपनीनेदेखील पुस्तकांपासूनच आपल्या ऑनलाइन विक्रीउद्योगाची सुरुवात केली. या कंपन्यांनी पुस्तक हेच उत्पादन सुरुवातीला का निवडले असेल? तर त्यामागेही विशिष्ट विचार होता. ग्राहकांची गरज ओळखून मराठी वाचकांसाठीही लवकरच बुकगंगा, अक्षरधारा यांसारख्या ऑनलाइन पुस्तकविक्रीच्या वेबसाइट्स सुरू झाल्या.

अर्थातच तेव्हा या साऱ्याच कंपन्यांनी दूरदृष्टीने घेतलेला निर्णय किती योग्य होता हे आपल्याला त्यांनी मिळवलेल्या यशावरून समजू शकेल.

पूर्वी एकदा लेखकाने पुस्तक लिहून पूर्ण केले की त्याचे काम संपायचे. हीच बाब प्रकाशकांबाबतही होती. एखादे पुस्तक प्रकाशकाने प्रकाशित केले की मग विक्रेते आणि वाचक त्याला स्वतःहून जो प्रतिसाद द्यायचे त्यावर पुस्तकाची वाटचाल ठरायची. मात्र आता लेखक म्हणून तुम्ही कितीही उत्तम पुस्तक लिहिले आणि प्रकाशक म्हणून तुम्ही ते उत्तम प्रकाशित केले तरी जोपर्यंत तुम्ही ते पुस्तक वाचकांपर्यंत कसे पोहोचेल याचा विचार करत नाही तोपर्यंत त्याच्या यशाची खात्री देता येत नाही. पुस्तकाच्या यशात अर्थातच त्याचा दर्जा हा अतिशय महत्त्वाचा असतो हे अगदी खरेच; समाजाला दिशा देण्यात, स्थित्यंतराच्या प्रत्येक टप्प्याच्या जडणघडणीत सकस साहित्याचे महत्त्व आपण सर्व जाणतोच; याबरोबरच ते सतत ग्राहकांसमोर राहील हेही बघणे गरजेचे झाले आहे. पुस्तकाबद्दल ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा वेगवेगळ्या व्यासपीठांवर चर्चा होणे, वेगवेगळ्या माध्यमांतून ते पुस्तक सतत वाचकांसमोर येणे; तसेच ते पुस्तक जास्तीत जास्त ठिकाणी सहजतेने उपलब्ध असणे या गोष्टी सध्या फार गरजेच्या झाल्या आहेत.

यात तंत्रज्ञानाची भूमिका अशी की, स्मार्टफोन हातात असल्यामुळे ग्राहकांना आता एका क्लिकसरशी वस्तू वेगाने विकत घेता येते. स्क्रीनवर असलेले असंख्य पर्याय त्याला आकर्षित करत असतात. पुस्तकांबाबत बोलायचे झाले, तर एकाच विषयांवरची कितीतरी पुस्तके प्रकाशित होतात. मग वाचकाने तुमचेच पुस्तक का घ्यावे? या प्रश्नाचे उत्तर तुम्हालाच शोधावे लागते आणि ते उत्तर सविस्तरपणे मांडावेही लागते. म्हणजेच त्या पुस्तकाबाबतची संपूर्ण माहिती सामान्य वाचकाला समजेल अशा सहज सोप्या भाषेत द्यावी लागते. त्याच वेळी ती अतिशय मर्यादित शब्दसंख्येत असणेही तितकेच गरजेचे असते. ही आजच्या प्रकाशनव्यवसायाची गरज बनली आहे.

अर्थातच यात वाचकांचा फायदा असा, की अनेकविध विषयांवरची उत्तमोत्तम पुस्तके त्यांना सहजपणे निवडता येतात आणि ती घरपोच उपलब्धही होतात. पुस्तक विकत घेण्यापूर्वी त्या पुस्तकासंदर्भातली इतर वाचकांची मते जाणून घेता येतात. त्या पुस्तकाला वाचकांकडून कशी मागणी आहे हेही समजते.

हे सगळे सांगण्याचा उद्देश हाच, की प्रकाशकांना आता पुस्तकविक्रीच्या पारंपरिक पद्धतीत बदल करत येत्या काळात या स्पर्धेसाठी तयार राहावे लागणार आहे. पूर्वी अनेक शहरांतून सातत्याने मोठ्या प्रमाणावर ग्रंथप्रदर्शने आयोजित केली जायची. तेथे जाऊन वाचकांना आपल्या आवडीची पुस्तके निवडून घेण्याची सोय होती. आता पुस्तकप्रदर्शनेच जवळजवळ बंद झाली आहेत. जेथे आधी पुस्तकांच्या दुकानांमध्ये वाचक तासन्‌तास रमत, एक पुस्तक खरेदी करायला आलेला वाचक यासारखी आणखी पुस्तके सुचवा असे म्हणून जास्त खरेदी करत, सुटीच्या दिवशी अनेक पालक मुलांसोबत येऊन भरपूर पुस्तके विकत घेत, तेथे आता दुकानात आल्यावर वाचक मोजकीच पुस्तके घेऊन परत जाण्याची घाई करतात.

प्रकाशनक्षेत्रातल्या कार्यपद्धतींचे आणि विक्रीतंत्रांचे आयामही आता भरपूर बदलले आहेत. आता बऱ्याच प्रमाणात ऑनलाइन पुस्तके खरेदी करण्याकडे वाचकांचा कल वाढला आहे. पुस्तक-विक्रेतेदेखील ऑनलाइन विक्रीसुविधा देण्याचा मार्ग अवलंबत आहेत. अशा रीतीने या आर्थिक संकट काळात पारंपरिक प्रकाशन व्यवसाय पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदल झाला आहे. या बदलांनुसार प्रकाशकांना बदलणे अपरिहार्य झाले आहे. प्रिंट ऑन डिमांड, ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, ऑनलाइन मार्केटिंग या गोष्टी म्हणजे प्रकाशनक्षेत्राच्या बदलत जाणाऱ्या भवितव्याची नांदी आहेत. यासाठी व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत पुढे जाणे अत्यावश्यक आहे. ईबुक्स आणि ऑडिओ बुक्सदेखील याच स्पर्धेचा एक भाग आहेत हे समजून घेऊन त्यांच्यावरही आपले लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. डिजिटल मार्केटिंगची रणनीती ठरवून आपले पुस्तक इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या व्यासपीठांवर कसे लक्ष वेधून घेऊ शकेल याबाबत विचार करावा लागणार आहे.

पुस्तकांच्या आशयाबाबत सांगायचे तर अनुवादित पुस्तकांना सध्या चांगली मागणी आहे. इंग्रजीतून मराठीत अनुवाद होणाऱ्या पुस्तकांची संख्या नक्कीच जास्त आहे; त्याव्यतिरिक्त आता हिंदी पुस्तकांचे अनुवादही मराठी भाषेत मोठ्या प्रमाणावर होताहेत. त्याचे कारण म्हणजे हिंदी भाषेतही वेगवेगळे विषय सध्या हाताळले जाताहेत. हिंदीतली नवी पिढी तरुणाईसाठी त्यांना भावेल अशा भाषेत जोमाने लेखन करते आहे. हे साहित्य वाचकही उत्तम रीतीने स्वीकारताहेत. साहजिकच त्यामुळे अनुवादित पुस्तके घेण्यास वाचक उत्सुक असतात. अर्थात बहुराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक नामांकित प्रकाशनसंस्था आता स्वत:च प्रादेशिक भाषेत पुस्तके काढत असल्यामुळे त्यांच्यापुढे टिकाव धरणे मराठी प्रकाशकांना आव्हान ठरत आहे. त्यांच्या येण्याने स्पर्धा वाढतीये;

तसेच लेखक-प्रकाशकांना नवनवीन विषय हाताळणे आणि पुस्तकांचा दर्जा वाढवणे क्रमप्राप्त झाले आहे.

आधुनिक काळात प्रत्येकाच्या हातात मोबाइल आल्यामुळे वाचकांच्या डोळ्यांसमोर जागतिक पातळीवरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे आजचा सुजाण वाचक उत्तमोत्तम साहित्याची निवड करून वाचतो. त्याचबरोबर आजचा वाचक विज्ञान, तंत्रज्ञानविषयक पुस्तक तर वाचतोच; परंतु तो आध्यात्मिक पुस्तकांनाही प्राधान्य देतो.

याबरोबरच आज डिजिटल कार्यक्रमांमुळे वाचक घरबसल्या कविसंमेलन, कथाकथन, साहित्यसंमेलन अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतात. हे एक प्रकारचे वरदानच म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. आज सामान्य वाचकही घरी बसून विश्वसाहित्य संमेलनांमध्ये सहभागी होऊ शकतो. हा बदल लक्षणीय आहे, क्रांतिकारक आहे. वाचन-संस्कृतीचा विकास होण्यासाठी हे सर्व आधुनिक बदल पूरक ठरत आहेत.

याबरोबरच पुस्तकनिर्मिती प्रक्रियेतही ऑनलाइन संपादन, प्रूफरीडिंग; तसेच डिजिटल मार्केटिंग आणि जाहिराती हे बदल प्रकाशकांच्या दृष्टीने सोयीचे झाले आहेत. आता प्रिंट ऑन डिमांडमुळे लागेल तेवढी, मोजकीच पुस्तके काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

सोशल मीडियाच्या वापरामुळे केवळ एखाद्या पोस्टद्वारे हजारो वाचकांना पुस्तकाची माहिती देणे सहज शक्य झाले आहे. दिवाळी अंक, वर्तमानपत्रे, मासिके यांमधून पुस्तक-परीक्षणाद्वारे वाचकांना माहिती दिली जाते. यामुळे वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी योग्य वातावरण तयार होते.

एकूण सांगायचे झाले तर वाचकांना उत्तमोत्तम पुस्तके, चांगले विषय वाचण्याची सवय लावायची असल्यास लेखक, अनुवादक तसेच प्रकाशकांनीच स्वत:हून पुढाकार घेणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या विषयांवर लेखन करणे; जागतिक स्तरावरील उत्कृष्ट साहित्यकृतींचे अनुवाद करणे तसेच अशी दर्जेदार पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित करणे ही पुस्तक प्रकाशनक्षेत्रातील व्यक्तींची जबाबदारी आहे आणि प्रकाशित होणाऱ्या चांगल्या पुस्तकांना उत्तम प्रतिसाद देणे हे वाचकांचे सांस्कृतिक कर्तव्य आहे. आपल्या सर्वांच्या या प्रयत्नांमधूनच मराठी साहित्यविश्व अधिक संपन्न होणार आहे. त्यासाठी सर्वांनाच शुभेच्छा!

**– साकेत भांड**
भ्रमणध्वनी : ९८२२४७८८९५
saketpublication@gmail.com

## पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे



**यशवंत मराठे लिखित 'छपाई ते लेखणी' या पुस्तकप्रकाशनसमयी सुधीर जोगळेकर, जयराज साळगावकर, लेखक यशवंत मराठे, सुदेश हिंगलासपूरकर आणि वसंत मराठे**



**डॉ. आशुतोष रारावीकर लिखित 'यशपुष्प' या पुस्तकप्रकाशनसमयी अरुण म्हात्रे, उत्तम कांबळे प्रदीप वेलणकर, प्रदीप निफाडकर आणि लेखक डॉ. आशुतोष रारावीकर**



**उमेश घेवरीकर**

# वाचनसंस्कृतीची दिशा आणि दिशाभूल

**सकस,** संतुलित आणि चौरस आहार शरीराला जीवनसत्त्वे पुरवून भरणपोषण करतो; तसेच वाचन मनाला, मेंदूला वैचारिक सत्त्वे पुरवून जगणे समृद्ध करते. अचानक उद्‌भवलेल्या अभूतपूर्व लॉकडाऊनच्या संकटामुळे ग्रंथालये, पुस्तकांची दुकाने बंद झाली आणि वाचकांची खरी घुसमट सुरू झाली. ज्यांच्या घरात चकाचक फर्निचरमधील ब्रँडेड ५६' टीव्ही वगैरे तथाकथित स्टेटस सिम्बॉलपेक्षा ग्रंथसंपदा महत्त्वाची मानली गेली होती त्यांना महिना-दोन महिने पुस्तकांची शिदोरी पुरली. नंतर मात्र त्यांच्या नशिबीही निर्जलीच आली.

या काळात अनेकांनी व्यग्रतेमुळे, जगण्याच्या लढाईमुळे लांबणीवर टाकलेले वाचनसंकल्प पूर्ण केले. त्यात अगदी भगवद्‌गीता, रामायण, महाभारत यापासून मृत्युंजय, छावा ते कोसलापर्यंतची विविधता होती. काहींनी आपल्या आपल्या आवडत्या लेखकांची सर्वच्या सर्व पुस्तके मिळवून वाचून टाकल्याचीही उदाहरणे आहेत. अनेकांनी आपल्या मुलांना बालकुमार वयात त्यांनी वाचायला हवीतच अशी पुस्तके उपलब्ध करून दिली. स्वतःदेखील वाचली. मानसशास्त्रावरील, पाककृतीवरील आणि वैद्यकीय विषयावरील पुस्तकांची वाढलेली मागणी त्या काळाचा महिमा सांगणारी ठरावी. पण या साऱ्या काळात ऑनलाइन वाचन, किंवा पॉडचा वापर करून वाचन करणारे वाढले. पुस्तके वाचण्याचा आनंद घेणारे कमी आणि पुस्तके ऐकण्याचा आनंद घेणाऱ्यांची संख्या वाढली हे पॉडकास्ट, स्टोरीटेलसारख्या ॲपच्या वाढत्या लोकप्रियतेवरून सहजी लक्षात येऊ शकते.

अनलॉक सुरू झाले आणि ग्रंथालये मदिरालयापेक्षा अंमळ उशिरा का होईना सुरू करण्यात आली. आता खरा प्रश्न आहे तो पुस्तके वाचली जातील तर कोणती? पुस्तके वाचणारे जास्त असतील की ऐकणारे? कारण या प्रश्नाच्या उत्तरावरच प्रकाशकांचे भवितव्य आणि ग्रंथव्यवहाराची दिशा ठरणार आहे.

सध्यातरी असे दिसते आहे की एकूण वाचकसंख्येच्या फारतर १० ते १५ टक्के इतकेच वाचक प्रत्यक्ष पुस्तकाऐवजी ऑनलाईन किंवा ॲपचा वापर करून वाचन करणे पसंद करतील त्याची कारणे वेळ, पैसा आणि स्टेटस अशी काही असू शकतील. उर्वरित वाचक मात्र पारंपरिक पद्धतीने प्रत्यक्ष पुस्तक त्याच्या पानांचा येणारा गंध, पान दुमडून ठेवलेला बुकमार्क यापासून दूर न जाण्याच्या मानसिकतेत आहेत. आता प्रश्न राहतो तो कोणत्या प्रकारची पुस्तके जास्त वाचली जातील? युवावर्गाच्या मनाचा कानोसा घेतला असता काही धक्कादायक निष्कर्ष समोर येत आहेत. युवा वर्गाला त्यांच्या भावविश्वामधील आणि त्यांच्या टेक्नोसॅव्ही भाषेत बोलणारी पुस्तके जास्त अपील होतील असे दिसते आहे, नात्यांची घट्ट वीण, त्याग, समर्पण ही मूल्ये मागे पडून लिव्ह इन, एकल पालकत्व, विस्कळीत कुटुंबव्यवस्था असे विषय व त्यांचे प्रश्न मांडणाऱ्या विषयांना ते जास्त प्राधान्य देतील. हे चिंताजनक असले तरी वास्तव मात्र असेच आहे. बालसाहित्यातही चॅनेल वरील पात्रे असणारी किंवा तंत्रज्ञान वापरत फँटसीच्या दुनियेत घेऊन जाणारी पुस्तके भाव खातील याचे कारण आता त्यांच्या हातात आलेला मोबाईल आणि अपरिपक्व वयात ऑनलाइन झालेले त्यांचे भावविश्व! इंग्रजी माध्यमाच्या अनैसर्गिक ओढीमुळे या मुलांना स्वप्ने जरी मराठीत पडत असली तरी ती मराठी साहित्यापासून मात्र दूर जात भावनिकदृष्ट्या कोरडी होत आहेत. त्यांची पाळेमुळे मराठी साहित्यापासून तुटत चालली आहेत ही चिंतेची बाब आहे.

ट्रॅव्हल ब्लॉग प्रकारचे लिखाण, वेबसीरिजसारखी मांडणी असलेली पुस्तके, वादग्रस्त व्यक्तीची आत्मचरित्रे किंवा चरित्रे अशा साहित्याला जास्त उठाव राहील, अनुवादातही हाच प्राधान्यक्रम राहील. सकस विज्ञानकथा, बालकुमार साहित्य या साहित्यप्रकारात

नव्या दमाच्या लेखकांची पर्यायाने लेखनाची वानवा राहील. धार्मिक साहित्य वाचणाऱ्या पिढीच्या हाती आता मोबाइल दिसू लागले आहेत. त्यांचा कलही यू-ट्यूबवरील कीर्तन-प्रवचने ऐकण्याकडे जास्त राहील. तीच गत पाककृतींच्या पुस्तकांची!

राजकीय क्षेत्रातील प्रचंड वलयांकित नेत्यांची आत्मचरित्रे त्यांना आपल्याच पक्षाच्या नेत्या-कार्यकर्त्यांना बळेच भेट म्हणून द्यावी लागली आहेत. सिनेक्षेत्रातील मोठ्या ताऱ्यांची चरित्रेही गुळगुळीत वेष्टनात अडकून पडली आहेत. याउलट शास्त्रज्ञांची चरित्रे मात्र जास्त मागणीची धनी ठरली आहेत हे चित्र शुभंकर आहे!

स्वतःला एखाद्या व्यक्तीबद्दल वाटणाऱ्या भावना व्यक्त करण्यासाठीही स्वतःचे शब्द न सापडणाऱ्या टिनएजर ते युवा पिढीला इतरांच्या कवितांची मदत मात्र घ्यावीशी वाटेलच. म्हणून या प्रकारच्या कविता संग्रहांना मागणी राहीलच. शासकीय अनुदानावर चालणारी ग्रंथालये, शाळा महाविद्यालये मात्र जुन्या जाणत्या प्रसिद्ध लेखकांच्या सवलतीत मिळणाऱ्या पुस्तकांच्या आवृत्त्या आणि राज्य पुरस्कारप्राप्त पुस्तकांची खरेदी इमानेइतबारे करत राहतील, त्यांना करावीच लागतील!

वयाच्या २२ ते २५ वर्षांपर्यंत वाचनाची दिशा, आवड निश्चित होत असते म्हणून शाळा आणि महाविद्यालयातील ग्रंथालये सकस साहित्याने समृद्ध करण्याची खरी गरज आहे. त्या आडात जे पोचेल तेच पुढे पोहऱ्यात येईल. म्हणून खरी जबाबदारी वाढणार आहे ती शिक्षक आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांची. त्यांना आधी स्वतःचे वाचन चौफेर आणि समृद्ध करावे लागेल आणि त्यानंतर विद्यार्थ्यांना पुस्तकापर्यंत आणावे लागेल. त्यांच्या वाचनाच्या दिशेवरच आगामी काळातील वाचनसंस्कृतीची दिशा आणि दिशाभूल यावर अवलंबून राहील हे नक्की!

**– उमेश घेवरीकर**
भ्रमणध्वनी : ९८२२९६९७२३
umesh.ghevarikar@gmail.com

॥ग्रंथाली॥

## शिकणारी शाळा-'अभि'रंग आणि शिकणारी शाळा-'बाल'रंग




**संपादन : वैशाली रोडे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**




**दोन्ही पुस्तके मिळून मूळ किंमत ६५० रुपये सवलतीत ४०० रुपयांत, टपालखर्च ४० रुपये वेगळा**

## वंश-अनुवंश

**डॉ. हेमा पुरंदरे**


शब्दांकन : **उज्ज्वला गोखले**




**हार्ड बाउंड मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रुपये**
**पेपरबॅक मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रुपये**

## यशप्राप्तीचं रहस्य

**डॉ. प्रेमानंद रामाणी**



**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**



हेरंब कुलकर्णी

# उपेक्षितांचे जग दाखवणारी पुस्तके आणि तरुण पिढी

**सामाजिक** चळवळीपुढची आजची सर्वात महत्त्वाची समस्या कोणती, असे मला विचारले तर मध्यमवर्ग या चळवळीपासून दूर गेल्याने या सर्व चळवळी कुपोषित होत आहेत, ही मला आजची सर्वात मोठी समस्या वाटते. १९८० च्या दशकापर्यंत महाराष्ट्रातील मध्यमवर्ग सामाजिक चळवळींशी जोडलेला होता. त्यामुळे सामाजिक चळवळी सशक्त होत्या. हाच मध्यमवर्ग समाजातील बोलका वर्ग असल्यामुळे सामाजिक समस्यांबाबत हाच वर्ग लिहीत होता. त्यांच्याविषयी लिहून आलेले वाचत होता. त्यांच्याविषयी बोलत होता, बोललेले ऐकत होता आणि त्या ऐकून प्रत्यक्ष रस्त्यावरसुद्धा घेऊन आंदोलनात सहभाग घेत होता. त्यामुळे मुंबईतील गिरणी कामगार, झोपडपट्टीतील लोक, ग्रामीण भागातील शेतकरी, आदिवासी भटके-विमुक्त आणि महाराष्ट्रातील उपेक्षित आणि मध्यमवर्गीय यांचे एक जैविक अभिन्न नाते होते. त्यातून सामाजिक एकसंधता प्रत्ययाला येत होती. पत्रकारही याच मध्यमवर्गातील असल्याने तेही हे प्रश्न मांडत होते. मध्यमवर्ग व कष्टकरी यांच्या जीवनशैली अंतरही फार नसल्याने एकमेकांना समजून घेणे सोपे होते.

आज मध्यमवर्गाचे रूपांतर उच्चमध्यमवर्गात होत असल्याने या मध्यमवर्गाचे आणि चळवळीचे नाते उरले नाही. त्याला वेगवेगळी कारणे असल्याने व मध्यमवर्गाचे विश्लेषण स्वतंत्रपणे होऊ शकत असले तरी आज महत्त्वाचा फरक हा दिसतो आहे की गरिबांचे प्रश्न पूर्वीपेक्षा अधिक तीव्र झालेत, परंतु या चळवळीला मध्यमवर्ग जोडलेला फारसा दिसत नाही. शिक्षक-प्राध्यापक वर्गही दूर जातो आहे. उच्चमध्यमवर्गात आत्ममग्नता व करिअरची प्रेरणा असल्याने ते खाली बघायला तयार नाहीत. त्यामुळे प्रश्न गंभीर परंतु ते सोडवण्याची प्रभावी संघटना नाही व बोलक्या वर्गाचा पाठिंबा नाही, अशी गरिबांच्या प्रश्नाची आजची स्थिती आहे.


अशा मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेली मुले एक किंवा दोन असल्याने लाडात वाढतात. कुटुंबात त्यांना कोणतीच दुःखे अनुभवायला मिळत नाहीत. त्यांच्या पालकांनी त्यांच्यासाठी शाळा त्यांच्या आर्थिक स्थितीनुसार निवडल्याने चांगल्या आर्थिक स्थितीतलेच मित्र त्यांना मिळतात. पूर्वी गरीब व श्रीमंतांची मुले एकाच शाळेत शिकायची. त्यातून दोघांनाही वेगवेगळे जग समजत होते, पण आज दोन वर्ग समाजात व शिक्षणातही निर्माण झाले. गरिबांचे प्रश्न माहीत होण्याची शक्यता संपली. कुटुंबातील वातावरण, सुखवस्तू जगणे आणि शाळांमधील आपल्याच आर्थिक-सामाजिक स्तरातील मुलांनी शिकणे यामुळे कुटुंब आणि शाळांमधून दारिद्र्य, विषमता माहिती होण्याची शक्यताच संपली.


मीडिया आणि चित्रपट ही दोन माध्यमे पूर्वी दारिद्र्याचे, विषमतेचे दर्शन घडवत होती. अमिताभ बच्चन आणि राज कपूर यांचे सर्व चित्रपट हे सामाजिक विषमतेचे विदारक दर्शन घडवत होते. परंतु चित्रपटांमधून गरिबी संपली. आज चित्रपटांचे शूटिंग परदेशात होते व काही कोटींचे बजेट असते. असेच चित्रपट बघितले जातात. मीडियातही आपला ग्राहक ज्या वर्गातला आहे, त्यांच्याच प्रश्नांना महत्त्व देण्याची मालकांची दृष्टी जोम धरू लागलीआहे. त्यातून मध्यमवर्गीय प्रश्न, त्यांचे भावविश्व याचे प्रतिबिंब माध्यमात उमटू लागले. त्यामुळे गरिबी, विषमता तीव्र असूनही ते तरुण पिढीपर्यंत कसे पोचवायचे हाच आज सर्वात महत्त्वाचा कळीचा

मुद्दा झाला आहे.

या वर्गाला हे प्रश्न अशासाठी माहीत व्हायला हवेत, कारण उद्याचे राजकीय, प्रशासकीय, सामाजिक-सांस्कृतिक नेतृत्व हीच तरुण मुले करणार आहेत. त्यामुळे या संस्कारक्षम कुमार मुलांना या देशातील विषमता, गरिबी याचे दर्शन घडायला हवे. अन्यथा त्यांच्या सामाजिक प्रश्नांच्या कल्पना अत्यंत बाळबोध अशा राहतील.

विकासाच्या कल्पना या फसव्या असतात. चकचकीत शहरे, बुलेट ट्रेन, मोठे रस्ते, विमान अशाप्रकारच्या कल्पना असतात. या देशात एकाच वेळी दोन देश अस्तित्वात आहेत, हे भान या तरुणांना द्यायला हवे. त्यासाठी सर्वात महत्त्वाचे प्रभावी माध्यम पुस्तकेही आहेत. सुदैवाने मराठी साहित्यात उपेक्षितांची वेदना सांगणारी शेकडो पुस्तके आहेत. दलित आत्मकथने, भटक्या-विमुक्तांची आत्मकथने अत्यंत महत्त्वाची आहेत. ही आत्मकथने या तरुण मुलांनी वाचली तर त्यांना सामाजिक विषमतेचे दर्शन त्यातून घडू शकेल. यासाठी मी एक वेगळा प्रयोग केला. तरुण मुलांचे आजचे व्यक्त होण्याचे ठिकाण सोशल मीडिया आहे व त्यातही वाचण्यापेक्षा ते बघणेच जास्त पसंत करतात. त्यामुळे लॉकडाऊनच्या काळात मी माझ्या यूट्यूब चॅनेलवर उपेक्षितांचे जग दाखवणारी पुस्तके अशी मालिका सुरू केली व व मराठीतील उपेक्षितांचे जग दाखवणाऱ्या पुस्तकांचा परिचय करून देणारे व्हिडिओ तयार केले. तरुण मुलांचा व्हिडिओ बघण्याचा कालावधी कमीत कमी असल्याने पंधरा मिनिटांच्या आसपास हे परिचय करून दिले. त्यातून ती मूळ पुस्तके वाचण्याची त्यांची इच्छा निर्माण होईल असा प्रयत्न केला. विविध महाविद्यालयातील प्राध्यापक मित्रांना, त्यांच्या विद्यार्थ्यांना माझ्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले. जवळपास ७०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी माझ्याशी संपर्क केला. त्यांना मी हे व्हिडिओ पाठवत आहे व पाठवत राहीन. आतापर्यंत २० पुस्तकांचे परिचय करून दिले आहेत व इथून पुढेही हे सुरूच राहील. (हे सर्व video माझ्या youtube channel वर आपण बघू शकता) त्या प्रतिक्रियेतून खरा भारत समजतो आहे, विषमतेची जाणीव होत आहे, अशा भावना कुमारवयातील मुलांनी माझ्याकडे व्यक्त केल्या. मराठीतील उपेक्षितांच्या जगण्याचे प्रश्न दाखवणाऱ्या पुस्तकांचे वर्गीकरण करायचे झाल्यास त्यात आत्मकथने










जास्त आहेत.

दलित व भटक्याविमुक्त जातीच्या लेखकांनी लिहिलेल्या आत्मकथनांतून ती दाहकता अधिक पोहोचते.

दुसरी पुस्तके रिपोर्ताज पद्धतीची आहेत. त्यात अनिल अवचट, पी. साईनाथ, यांच्या पुस्तकाचा समावेश होतो. थेट सामाजिक समस्येवर भाष्य करणारी वैचारिक पुस्तकेही आहेत. त्यात विविध प्रश्नांवर लिहिलेल्या पुस्तकांचा समावेश होतो. चौथ्या प्रकारात वैचारिक भूमिकेविषयीचे सामाजिक भान जागृत करणारी पुस्तके आहेत, अशी चार प्रकारची पुस्तके निवडली, परंतु तरुण मुलांना वंचितांच्या प्रश्नाविषयी सज्ज करण्यासाठी सर्वात उपयुक्त ही दलित व भटक्या-विमुक्तांना मधील आत्मकथने तरुण मुलांना वाचण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. अशोक पवार यांचे 'बिराड'सारखी आत्मकथने महत्त्वाची आहेत. अशोक पवार यांचे बिराड वाचताना, ते खरे असूनही खरे वाटत नाही. इतके त्यातील दुःख, वेदना हे अस्वस्थ करणारे आहेत. शंकरराव खरात यांच्या 'तराळ-अंतराळ' पुस्तकाची सुरुवात महात्मा फुलेंच्या 'विद्येविना मती गेली' म्हणजे शिक्षण अभावी नेमकी काय दुरावस्था होते,हे लक्षात येते.. तीन ओळींचे आलेले पत्र वाचून घेण्यासाठी गावचा शिक्षक लेखकाचे वडिलांकडून घाम फुटेस्तोवर लाकडे फोडून घेतो आणि तीन ओळींच्या पत्रात त्याची बहीण मृत्यू पावलेले असते, हे अत्यंत अस्वस्थ करते. 'कोल्हाट्याचं पोर'मध्ये ही तीच वेदना पुन्हा वेगळ्या रूपाने येते. समाजातील धनदांडगे कला दाखवणाऱ्या महिलांना स्वप्न दाखवतात. संसाराच्या स्वप्नांना या महिला बळी पडतात व त्यातून पुन्हा आगीतून फुफाट्यात अशी आयुष्याची अंतहीन यात्रा नशिबी येते. ही वेदना बघितल्यावर पुरुषी मस्तवालपणा आणि नीचपणाच्या परिणीतीचे पातळी किती बघावी लागते ही बाब विलक्षण अस्वस्थता आणते.

'दुष्काळ आवडे सर्वांना' या पुस्तकाने मला सर्वात जास्त अस्वस्थ केले. हे पुस्तक सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे दिशादर्शन करते. दारिद्र्य म्हणजे नेमके काय? याबाबत आपल्या काव्यात्म कल्पना असतात. परंतु ही वंचितता शिक्षण, आरोग्य, शासकीय योजना, रोजगार, भ्रष्टाचार या नजरेतून आपल्याला पी. साईनाथ उलगडून दाखवतात. भारतातील निवडक

गरीब राज्ये, त्यातील निवडक गरीब जिल्हे व त्या गरीब जिल्ह्यांतील गरीब गावे यातील रिपोर्ट असलेले हे सारे तपशील आपल्याला अस्वस्थ करतात व दारिद्र्य म्हणजे नेमके काय असते हे समजावून घ्यायला मदत करतात. आपले सुखासीन जगणे व वंचित समूहाचे जगणे यातील अंतर अत्यंत स्पष्टपणे उलगडून दाखवतात तीन दिवस २०० किलो कोळसा सायकलवर विकणारा मजूर, पहाटेपासून दुपारपर्यंत खजुराच्या झाडावर चढणारा तामिळनाडूतला युवक आणि तीस किलोमीटर डोक्यावर ओझे घेऊन चालणारी मध्यप्रदेशमध्ये महिला. यांचे उत्पन्न हे अत्यल्प असते. बौद्धिक श्रम, शारीरिक श्रम यातील तफावत सांगणारे हे तपशील आपल्याला लाज आणतात. या पुस्तकाबरोबरच अनिल अवचट यांची पुस्तके समाजभान जागवायला उपयुक्त आहेत. अवचट वैचारिक विश्लेषण अपेक्षा त्या वंचित वर्गाचे शब्दचित्र रेखाटतात. 'माणसं' या पुस्तकात दुष्काळात मराठवाड्यातून आलेल्या माणसांच्या झोपड्या त्यांनी अशा काही चितारल्या आहेत की आपणच तिथे राहतो आहोत अशी जाणीव होते. त्याचबरोबर निपाणी येथील तंबाखूच्या कारखान्यात काम करणाऱ्या महिलांची विदारक स्थिती, लैंगिक अत्याचार व अमानुष कष्ट त्याचे दाहक वर्णन ते करतात. भाकरी खायला वेळ नाही म्हणून रस्त्याने चालताना भाकरी खाणारे त्या महिला कुत्रसुद्धा एका जागी थांबून भाकरी खातो असं म्हणतात. तेव्हा अंगावर काटा येतो. पुण्यातील हमालांची स्थिती त्यांनी ज्या पद्धतीने चितारली आहे त्यात त्यांचे सामाजिक प्रश्न ते कुठून येतात? का येतात? त्यांना होणारे आजार हे सारे तपशील ते इतक्या संवेदनशीलतेने म्हणतात की एक अख्खा समाज घटक आपल्यासमोर उभा राहतो.

'पूर्णिया' हे अनिल अवचट यांचे असेच एक पुस्तक. या पुस्तकात बिहारच्या जमीनदारी पद्धतीने केलेले शोषण आणि तेथील सामाजिक उतरंड अत्यंत चित्रमय शैलीत रेखाटले आहे. अवचट म्हणतात एकीकडे भिकेला लागलेली माणसे आणि दुसरीकडे हत्ती पाळणारे, स्वतःचा विमानतळ असणारे जमीनदार हे अंतर अस्वस्थ करते. तेथील गुलाम मानसिकता, भीती घेऊन जगणारी मजूर माणसे आणि जमीनदारांनी सर्व राजकीय पक्षांवर मिळवलेला कब्जा हे बघता हे प्रश्न अंतहीन आहेत ही अगतिकता अस्वस्थ करते. अवचट यांच्या शैलीत केवळ मनोरंजन म्हणून अशा प्रश्नांकडे बघणाऱ्या मध्यमवर्गाला शेवटी या पद्धतीने मात करतात, त्याने आपल्यालाही अपराधी वाटायला लागते. बाबूराव बागुल यांच्या या पुस्तकातून चितारलेले प्रश्नही असेच अस्वस्थ करत राहतात. रामनाथ चव्हाण यांची महिलांविषयीची निरीक्षणे अत्यंत तरल व त्यातील वास्तव पुढे आणतात. आज महिलांच्या प्रश्नाला मध्यमवर्गीय चौकट येथे आहे. तळातल्या भटके-विमुक्त समुदायातील महिलांच्या वेदना समोर येत नाही. रामनाथ चव्हाण यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन अनेक असाहाय्य, अगतिक स्थितीत संघर्ष करणाऱ्या महिलांची शब्दचित्रे अत्यंत ताकदीने उभी केली आहेत. पुरुषांनी भोगवस्तू म्हणून महिलांकडे बघायचे, मुले जन्माला घालून त्यांना सोडून द्यायचे आणि अशा स्थितीत त्या मुलांचा सांभाळ करत कष्ट करतात याचे मनाला हादरा देणारे चित्रण पुस्तकात पानापानावर भेटतात. अशाच महिलांच्या प्रश्नाचा एक भीषण कंगोरा वेश्याव्यवसाय. गोव्यातील एक वेश्यावस्ती प्रशासनाने कायमची उठवली. त्या वस्तीतील महिलांचे जगणे आणि ते बदलण्यासाठी काम करणारे कार्यकर्ते याची कहाणी 'सेक्स मार्केट' या पुस्तकात पराग गावकर यांनी दिली आहे. त्यात या महिलांची खरेदी-विक्री करणारे, शारीरिक अत्याचार, आर्थिक शोषण आणि वेश्याव्यवसायातील दलाल, भडवे आणि पोलीस यांची युती यापुढे संघर्ष करणाऱ्या त्या केविलवाण्या महिला हे सारे वेगळेच जग आपल्याला या पुस्तकातून बघायला मिळते. या विषयाबद्दल तरुणांमध्ये असलेली आंबटशौकीन गळून पडते आणि या महिलांविषयी करुणा म्हणून येते. गोदूताई परुळेकर यांनी वारली समूहाच्या केलेल्या संघर्षाला या वर्षी ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यांनी लिहिलेल्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकाला पन्नास वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्याच्या अगोदर कोणतेही कायदे हाताशी नसताना वारली पाड्यापाड्यावर जाऊन गोदूताई परुळेकर यांनी वारली समूहाला संघटित केले आणि त्यांच्यात आत्मसन्मान जागा करून त्यांना जागृत केले. त्याची कहाणी या पुस्तकात आली आहे. या व अशा अनेक पुस्तकातून आपल्याला दरिद्री म्हणजे काय ते समजलं. दारिद्र्याची आपल्या मनातील कल्पना काव्यात नसते, अमूर्त असते परंतु गरीब असणे म्हणजेच शोषण होत असणे, प्रतिकाराची क्षमता नसणे. जातीव्यवस्था, राजकीयव्यवस्था, प्रशासनव्यवस्था तुमचे शोषण करीत असते असे अनेकविध पैलू या पुस्तकांमधून आपल्याला बघावयास मिळतात आणि आपले एकूणच वंचित समूह विषयाचे आकलन व्हायला मदत होते. आपली संवेदना अधिक टोकदार होते व कृतिशील होण्याची शक्यता आपल्यात निर्माण होते.

एक वर्षापूर्वी मी महाराष्ट्राच्या २४ जिल्ह्यांत फिरून १२५ गावांत जाऊन 'दारिद्र्याची शोधयात्रा' (समकालीन प्रकाशन) हे पुस्तक लिहिले. ते श्रीमंत महाराष्ट्रातील गरीब महाराष्ट्रातील दारिद्र्याचे वर्णन वाचून अनेक तरुण अस्वस्थ झाले व 'असेही असू शकते' असा साक्षात्कार आम्हाला झाला असे सांगितले. ही प्रतिक्रिया खूप महत्त्वाची वाटली. कारण या साहित्यातून आपल्या जगण्यापलीकडे जग असू शकते, हे भानच आज महत्त्वाचे आहे.

म्हणून आजच्या तरुणवर्गाच्या कडेला सुखाची भिंत उभी असताना, आपण या तरुणवर्गाला किमान या शेवटच्या माणसाची कहाणी त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी पुस्तके हेच माध्यम आहे. यासाठी आपण प्रयत्नपूर्वक या प्रश्नांची जाण या तरुणांना या प्रकारच्या माध्यमातूनच करून द्यायला हवी. त्यासाठी उपेक्षितांच्या जगण्याचा परिचय करून देणारी ही पुस्तके ही सतत तरुणाईपर्यंत पोहोचण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत.

**– हेरंब कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ८२०८५८९१९५
herambkukarni1971@gmail.com



डॉ. पृथ्वीराज तौर

# माझे वाचन... माझे जगणे

**'मी** अध्ययन आणि अध्यापनाच्या व्यवसायात का आलो' या प्रश्नाचे साधे उत्तर आहे, 'मला वाचायला, लिहायला आणि जे वाचले त्यावर बोलायला आवडते. मी नवव्या इयत्तेत असतानाच मनाशी ठरवले होते, आपण आयुष्यभर हेच करायचे, वाचायचे-लिहायचे आणि जे आवडले, जे नाही आवडले त्याबद्दल समोरच्याशी बोलायचे. शिक्षक झालो तर असे जगता येईल, हे माझे मलाच लक्षात आले होते, आणि म्हणून मी या व्यवसायात आलो.' टाळेबंदी सुरू झाली आणि लोक घरात अडकून पडले. आता करायचे काय, असा प्रश्न अनेकांना पडला. या काळात मी इंटरनेटवरील ग्रंथालये आणि ई-बुक्स यांच्याशी स्वत:ला जोडून घेतले. बालकुमारांची पुस्तके वाचू, आवडली तर मराठीत भाषांतरित करू असे मला वाटले. त्या तीन महिन्यांच्या काळात मी जवळ जवळ तीनशे पुस्तके वाचली असतील, त्यातील शंभरावर बालकथांचे त्याच काळात मी अनुवादही केले.

काय वाचायचे हा प्रश्न मला बालपणापासून कधी पडला नाही. हाती येईल ते वाचणे, मला आवडते. एका अर्थाने मी बेशिस्त वाचक आहे. एकाच वेळी मी सत्यनारायणाची पोथी, मार्क्सचे भांडवल, रंगनाथ पठारेंची कथा, भाषाविज्ञानातील सिद्धांत आणि वशीकरण कसे करावे याबाबतचे पुस्तक वाचू शकतो, म्हणजे एकाचवेळी एकमेकांशी दुरान्वये संबंध नसणा-या विषयांची पुस्तके मी वाचत असतो, त्यातून खूपदा दोन भिन्न विषयातील आंतरसंबंध दिसून येतात. आपल्याला जगभरच्या लोककथा ठाऊक असतील आणि जगाचा इतिहास-भूगोल माहीत असेल तर त्यावरून विशिष्ट समाजातील मानवी वर्तनाचा अन्वयार्थाही लावता येऊ शकतो. पुस्तके वाचणे म्हणजे माझ्यासाठी केवळ शब्द वाचणे नाही तर त्याच्या माध्यमातून मी मानवाचा मूळ स्वभाव वाचत असतो, माझ्या परिसराला नव्या नजरेतून समजून घेत असतो.

असे खूपदा झाले आहे की अगदी जवळच्या नात्यांचे अर्थ आणि महानता हीदेखील मला पुस्तकांनी लक्षात आणून दिली. कदाचित ही पुस्तके इतरांच्या नजरेतून महान नसतील पण माझ्यासाठी ती अमूल्य आहेत. विभावरी शिरुरकर यांची 'खरे मास्तर' वाचली आणि वडिलांकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मला गवसला. अनिल दामले यांची 'गौतमची गोष्ट' वाचली आणि आपण कशासाठी जगतो, आपल्या जीवनाची ध्येयप्राप्ती कुठे आहे, या प्रश्नांना एक थांबा मिळाला. सआदत हसन मंटोची 'खोल दो' वाचली तेव्हा आणि प्रिया तेंडुलकर यांची 'शिबानीची अनाहिता' वाचली तेव्हा दोन दिवस झोपू शकलो नव्हतो. रवींद्र गुर्जर यांनी अनुवादलेली 'पॅपिलॉन' वाचताना अफाट जगणे पाहून अवाक झालो होतो. शिवाजी सावंतांची 'मृत्युंजय' वाचताना कित्येकदा स्वत:तच हरवलो होतो. सानेगुरुजींची 'श्यामची आई' वडिलांच्या तोंडून ऐकताना कित्येकदा रडलो होतो. इंतजार हुसेन, ओ हेन्री, वलेरी ओसिपोव्ह, मिलान कुंदेरा, प्रेमचंद, टॉल्सटॉय, लु शून, श्रीलाल शुक्ल, तात्सुहारू कोडामा, युरी नगीबिन, एस.एल. भैरप्पा, पुश्किन, जर्जेरी कंट्री, लुईस डिलॉल्त्रे, बिजोस्टिन बिजरसॉन असे कितीतरी लेखक आणि त्यांच्या कलाकृती यांनी माझे भरणपोषण केले आहे.

माझ्या भ्रमंतीचा परीघ फार मोठा नाही, चार सहा गावांच्या पलीकडे मी फारसा राहिलो नाही. परंतु प्रवासात लागणारी गावे मला त्यांच्या पुस्तकांच्या दुकानामुळे लक्षात राहिली. अगदी बस स्टँड किंवा रेल्वे स्टेशनवरच्या पुस्तकांच्या स्टॉलवर असे पुस्तक सापडते, ज्याचा शोध आपण मोठ्या नावाजलेल्या दुकानात घेऊन थकलेलो असतो. पुण्याच्या लाकडी पुलावरून किंवा रद्दीच्या दुकानातून जुनी पुस्तके खरेदी करणे एमए करत असतानाचा माझा आवडता उद्योग होता. त्यावेळी काही दुर्मिळ आवृत्त्या हाती लागल्या. जुन्या पुस्तकांना एक गंध असतो, त्यांचा एक स्पर्श

असतो, तो स्पर्श नव्या, कोऱ्याकरकरीत पुस्तकाहून खूप निराळा असतो. तुमच्या अगोदरच्या वाचकांनी पुस्तकाविषयी दाखवलेले प्रेम आणि घृणा तुमच्यापर्यंत त्यातून चालत येते. अशी अनेक पुस्तके असतात. विशेषत: ग्रंथालयात ज्यांना त्यांच्या निर्मितीनंतर चाळीस-पन्नास वर्षात वाचक म्हणून तुम्हीच उघडलेले असते, अशी पुस्तकेही तुम्हाला काहीना काही सांगताच असतात. विस वर्षांपूर्वी जळगावच्या एका कवीची दुर्दैवी गोष्ट कुणीतरी सांगितली आणि दुभंगलेल्या मानसिकतेविषयीची पुस्तके मी मिळवून वाचू लागलो, ग्रंथालयातील त्या पुस्तकांना हात लावणारा मी पहिला होतो. एकदा मला 'कामसूत्र' वाचण्याचा मोह झाला, वात्सायनाच्या कामसूत्राचे भाषांतर ग्रंथालयात आहे हे मला माहीत होते. अगोदर तर नकारच मिळाला. खूप पाठ पुरावा केला तेव्हा पुस्तकांच्या जुनाट रॅकमध्ये अत्यंत दुर्मिळ पुस्तकांच्या मागे ते लपवून ठेवलेले होते. 'पुस्तक किसी को दिखाव मत' ग्रंथालयातील साहाय्यक मला म्हणाला, तेव्हा खूप हसू आले होते.

असे असले तरी औरंगाबाद, पुणे, मुंबई, नांदेड या शहरातील सार्वजनिक ग्रंथालये आणि मी जिथे शिकलो त्या शाळेची, महाविद्यालयाची आणि विद्यापीठांची ग्रंथालये खूप समृद्ध होती. मी जवाहर नवोदय विद्यालय, परतूर या जालना जिल्ह्यातील शाळेचा विद्यार्थी. शाळेत हिंदी आणि इंग्रजीतील हजारो पुस्तके होती आणि ती वाचनासाठी खुली होती. शाळेच्या वेळेव्यतिरिक्त दुपारी तीन ते रात्री दहा या काळात ग्रंथपाल मुद्दाम तिथे बसून असत आणि ते विद्यार्थ्यांवर ओरडत नसत. या शाळेने अन्य भाषेतील साहित्याशी परिचय घडवला. जगभरच्या लोककथा, रामायण-महाभारत हे ग्रंथ, शेक्सपीयर ते कालिदास असा सगळा जुना नवा प्रवास इथे झाला. शरदचंद्र चटोपाध्याय यांचे समग्र साहित्य मी आठवी-नववीत वाचले आणि याच शाळेने मराठीतील दलित आत्मकथेशी ओळख करून दिली. बलुतं, उचल्या, उपरा ते गावकी अशी पुस्तके मी तिथे वाचली. आमचे मराठीचे प्रकाश कुरणेसर फार छान शिक्षक होते. या पोराला वाचायला आवडतं हे कळाल्यावर त्यांनी त्यांच्या संग्रहातील अनेक पुस्तके माझ्यासाठी खुली केली.

औरंगाबादच्या देवगिरी महाविद्यालयातील ग्रंथालय आणि पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, दोन्ही समृद्ध होती. जयकरचा रीडिंग हॉल तेव्हा रात्री बारा ते सकाळी पाच ही वेळ वगळता खुला असायचा, वाचनासाठी जशी पुस्तके हवी असतात तशी वाचनासाठी एक निवांत जागाही मिळाली तर? जयकरमध्ये अशी पुरेसी जागा होती. 'जयकर'चा मला खूप लाभ झाला. रोज एक या वेगात मी पुस्तके वाचत असे. मला माहीत होते की माझ्याजवळ केवळ एमएची दोन वर्षे आहेत आणि नंतर हा खजिना आपल्या हाती असणार नाही. एक आवारे की डायरी (इवान तुर्गनेव्ह), मायामृग ( के. पी. पूर्णचंद्र तेजस्वी), मंदिरा (सुनील गंगोपाध्याय), एक चादर मैली सी (राजेंद्रसिंह बेदी), तमस (भीष्म सहानी), जुगारी (दास्तोव्हस्की), औरत का चेहरा (हेन्री जेम्स), ठगाची जबानी (मेडोज टेलर) द्रौपदी (प्रतिभा राय), अजनबी (अल्बेअर कामू) अशी काही पुस्तके वाचता वाचता दुस-या बाजूला मराठी साहित्यसमीक्षा वाचत गेलो. जोनास आर्क (अरुण हेळबेकर), सत ना गत (राजन खान), यक्षाची देणगी (जयंत नारळीकर), वासूनाका (भाऊ पाध्ये), सत्याची जात (मुक्तिबोध), गोतावळा (आनंद यादव), बावन्नखणी चतुर्भानी (आनंद साधले), मेड इन इंडिया (पुरुषोत्तम बोरकर) ही त्या काळात वाचलेली आणि आजही स्मरणात राहिलेली काही पुस्तके. दिलीप पुरुषोत्तम चित्रे आणि भाऊ पाध्ये यांचा परिचय औरंगाबादच्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या ग्रंथालयमुळे झालेला. सर्वात अगोदर 'एकूण कविता एक' हाती आल्या. त्यानंतर ऑर्फियस. चाव्या जुन्या पुस्तकांच्या दुकानात सापडल्या. शतकांचा संधिकाल, दहा बाय दहा, कवितेनंतरच्या कविता, तिरकस आणि चौकस आणि शीबाराणीच्या शोधात ही पुस्तके मिळवून वाचली. एखादा लेखक आवडला की त्याची मिळतील तेवढी पुस्तके वाचून काढायची या छंद औरंगाबादला बी.ए करत होतो तेव्हाच लागला. जी.ए. कुलकर्णी, भाऊ पाध्ये, रंगनाथ पठारे, भारत सासणे, बाबू बिरादार, राजन खान, अनंत सामंत, प्रकाश नारायण संत, भालचंद्र नेमाडे, बा.सी. मर्ढेकर, कुसुमाग्रज, दुर्गा भागवत, फ.मुं. शिंदे, निरंजन उजगरे, बाबा भांड, पु.ल. देशपांडे, रत्नाकर मतकरी, सदानंद रेगे, श्रीनिवास विनायक कुलकर्णी असे काही मराठी लेखक आहेत ज्यांचे बहुतेक लेखन मी वाचले असेल. नितीन कोत्तापल्ले यांनी भाषांतरित केलेल्या अल्केमिस्टमुळे मी मराठीत उपलब्ध पाउलो कोएलो वाचला, उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेल्या 'वंशवृक्ष'मुळे भैरप्पाच्या प्रेमात पडलो आणि बहुतेक पुस्तके मिळवून वाचून काढली. श्रीपाद जोशी आणि देवेंद्र इस्सर यांच्यामुळे सआदत हसन मंटो, जयप्रकाश सावंत यांच्यामुळे उदय प्रकाश, चमनलाल यांच्या भाषांतरामुळे अवतारसिंह पाश यांचे बहुतेक लेखन मी वाचले. गुलजार, चंद्रप्रकाश देवल, तसलीमा नसरीन आणि अब्दुल बिस्मिल्लाह यांच्याप्रमाणेच मिलिंद बोकील, इरावती कर्वे, बाबाराव मुसळे, नारायण सुर्वे, महेंद्र कदम यांच्या लेखनाने मला भुरळ पाडली. या लेखकांची मिळतील तेवढी पुस्तके मी वाचून काढली.

मी ठरवून काहीच वाचले नाही. एका पुस्तकाने मला दुसऱ्या पुस्तकापर्यंत नेले आणि दुसऱ्या पुस्तकाने तिसऱ्याचे बोट माझ्या हातात दिले. एका पुस्तकातून दुसऱ्या पुस्तकात मी प्रवेश करत गेलो. मराठी वाङ्मयाचा इतिहास अभ्यासताना 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप' (संपादक- पवार/हातकणंगलेकर) वाचत असताना विलास सारंग हा लेखक माहीत झाला आणि नंतर सोलेदाद, एन्कीच्या राज्यात, सिसिफस आणि बेलाक्का करत सार्त्र, कामू, काफ्काच्या शोधात निघालो. शंकर रामचंद्र राजवाडे यांच्या 'निट्झझशेचा ख्रिस्तान्तक आणि ख्रिस्तान्तक निट्झशे'पासून श्री श्री, ज्वालामुखी, नग्नमुनी, चेराबंडा राजूपर्यंत हा प्रवास पोहोचला. किंवा भारत सासणे यांच्या कथांमुळे राशीप्रकरण, खडे आणि त्याचे माहात्म्य, सापांचे प्रकार आणि त्यांच्याविषयीच्या समजुती मी समजून घेत गेलो. पुस्तकांचे जग हे अशा भुलभुलय्यासारखे असते जिथे तुम्ही

प्रत्येक वेळी नव्या जागी प्रवेश करता, तुम्ही तुमच्या मूळ जागी परतू शकत नाहीत. पुस्तक वाचून संपवता तेव्हा तुम्ही नवे झालेले असता, तुमची उंची वाढलेली असते, समाज वाढलेली असते, नवी दृष्टी मिळालेली असते, मग तुम्ही जुने कसे राहू शकता? तुम्ही त्याच जागी कसे परतू शकता जिथून प्रवासाला सुरुवात केली होती? पुस्तके तुम्हाला बदलवतात हे नक्की.

नियतकालिकांशी माझे फार घनिष्ठ नाते राहिले आहे. बालपणी मी ज्याची आतुरतेने वाट बघत असे असे मी वाचत असलेले पहिले नियतकालिक म्हणजे 'लोकमत कॉमिक्स'. ते साप्ताहिक होते आणि बहुधा प्रत्येक बुधवारी पेपरसोबत ते येत असे. मी त्याची आतुरतेने वाट बघत असे. कारण त्यात चित्रकथा येत. खालील खान यांची चित्रे असत. शेखचिल्लीची गोष्ट मी तिथेच सुरुवातीला वाचली, अलीबाबाशी याच कॉमिक्सने परिचय करवून दिला. अमर चित्रकथा आणि भारत भारती माला यांचाही परिचय त्याच वयात झाला. पुण्याच्या डॉ. संगमनेरकर यांचा शतायुषी दिवाळी अंक दरवर्षी वडील घेऊन येत. त्यात बकुळची चित्रमालिका प्रकाशित होई, तीही माझी आवडती होती. डॉक्टरी सत्यकथा या कथाप्रकाराशी माझी पहिली ओळख तिसरी-चौथीत झाली असेल, ती 'शतायुषी'मुळेच. पुढे वेगवेगळ्या निमित्ताने मी अनेक डॉक्टरांची आत्मकथने वाचली, शस्त्रक्रिया आणि वैद्यकशास्त्राचा इतिहास वाचला, वेगवेगळ्या रोगांचे व्याधींची लक्षणे उपचारपद्धती याबाबतची पुस्तके वाचली. हृदयस्थ (अलका मांडके), वार्ड नंबर पाच केईएम (रवी बापट), माझा साक्षात्कारी हृदयरोग (अभय बंग), सर्जननामा (जे.जी. वाडेकर), बाप नावाची माय (राजेश गायकवाड) आणि अशी इतरही पुस्तके वाचनात आली, त्याची सुरुवात 'शतायुषी'ने करून दिली होती.

हिंदी आणि मराठीतील वाङ्मयीन नियतकालिके वाचणे माझ्या जगण्याचा भाग राहिला आहे. हिंदीतील किमान तीस नियतकालिकांचा मी वर्गणीदार असेन. 'जयकर'मध्ये नियतकालिकांचा जो स्वतंत्र विभाग होता, तिथे गेल्यानंतर संध्याकाळ होऊच नये आणि घड्याळात साडेपाच वाजूच नयेत असे मला वाटे. कारण त्यानंतर विभाग बंद होई आणि मला दुसऱ्या दिवसाच्या दहा वाजण्याची प्रतीक्षा करावी लागे. सत्यकथा, मौज, अभिरुची, आलोचना, सोव्हियत लिटरेचर, सारसंसार, आजकल, धर्मयुग यांचे जयकर ग्रंथालयात उपलब्ध असणारे बहुतेक सगळे अंक मी चाळले आणि वाचले.

अलीकडच्या काळात मागच्या एका दशकापासून मी जाणीवपूर्वक बालकुमार साहित्याकडे वळलो. दरम्यान इंटरनेटमुळे पुस्तके सहज उपलब्ध होऊ लागली. ई-आवृत्त्यांशी मी स्वत:ला जोडून घेतले. आवडलेल्या बालकुमार कथांचे जाणीवपूर्वक मराठी अनुवाद केले. समाजमाध्यमांनी नवा वाचक तयार केला आहे. त्याला दीर्घ वाचन नको असते. तो एका बैठकीत वाचून संपेल अशा साहित्याच्या शोधात आहे. ऑडिओ बुक हीसुद्धा तरुण पिढीप्रमाणे माझी आवड आहे. प्रवासात असताना किंवा घरात वा ऑफिसमध्ये इतर कामे करत असताना मी ऑडिओ बुक ऐकतो.

साहित्यसंमेलनाच्या पुस्तकप्रदर्शनात मी फेरफटका मारतो आणि पिशव्या पिशव्या भरून पुस्तके खरेदी करतो. कोणत्याही ग्रंथालयात जेव्हा आजही जातो तेव्हा तासनतास पुस्तके शोधत, वाचत बसतो. कुठे कुणी काय लिहिले आहे याच्या नोंदी करत जातो. तेव्हा प्रत्येकवेळी मला वाटते, की आयुष्य खूप कमी आहे आणि वाचायची राहिली अशी कोट्यवधी पुस्तके या पृथ्वीवर शिल्लक आहेत.

**– डॉ. पृथ्वीराज तौर**
भ्रमणध्वनी : ९५७९१३६४६६
drprithvirajtaur@gmail.com

**॥ग्रंथाली॥**


**शिल्पा जितेंद्र खेर यांची तीन पुस्तके**

**यश म्हणजे काय? भाग १ व भाग २** आणि **राम-आयन**










**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.** **मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.** **मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**



**नरेंद्र लांजेवार**

# महाराष्ट्राची वाचनसंस्कृती अद्यापही 'बाल्यावस्थेत!'

**महाराष्ट्र** राज्य शासनाचे ग्रंथालयविषयक धोरण म्हणजे 'गाव तेथे ग्रंथालय.' महाराष्ट्र राज्य स्थापनेचे आता हीरक महोत्सव सुरू आहे, तेही जाईल, तरी 'गाव तेथे ग्रंथालया'चे स्वप्न पूर्ण झालेले नाही, होणार नाही. आज ज्या कासवगतीने महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची वाढ होत आहे, ती तशीच राहिली तर पुढील शंभर वर्षांतही 'गाव तेथे ग्रंथालय' साकारलेले दिसणार नाही, इतक्या मंद गतीने ग्रंथालयाबाबत एकूणच कारभार आज सुरू आहे.

महाराष्ट्रातल्या ४३७२२ गावांपैकी ३५ हजार गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची सुविधा अद्यापही पोहोचलेली नाही. सध्या महाराष्ट्रात ४३ शासकीय ग्रंथालये, १२,८५८ अनुदानित सार्वजनिक ग्रंथालये व ३५ संशोधन ग्रंथालये आहेत. काही मोठ्या गावांमध्ये लोकसंख्येच्या आधारावर ५ ते १० सार्वजनिक ग्रंथालये आहेत. १३ कोटींच्या महाराष्ट्रातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांतील एकूण वाचकसंख्या अवघी २ ते ३ टक्के भरेल इतकी बाल्यावस्था आज सार्वजनिक वाचन संस्कृतीची आहे.

संपूर्ण भारतात सार्वजनिक ग्रंथालयांची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयांतील वाचन संस्कृती ही जर बाल्यावस्थेत असेल तर ती सुधारण्यासाठी सर्व स्तरांवरून व्यापक प्रमाणात प्रयत्न होणे गरजेचे असताना आज विशेष प्रयत्न होताना दिसत नाही.

*सार्वजनिक ग्रंथालयांची समृद्ध परंपरा*

भारताला ग्रंथालय समृद्धीची एक मोठी परंपरा आहे. नालंदा, तक्षशिला यांसारखी समृद्ध ग्रंथालये मुद्रणकलेचा शोध लागण्यापूर्वीच या देशात अस्तित्वात होती. आपल्या देशातील ग्रंथालय चळवळीचा खऱ्या अर्थाने शास्त्रशुद्ध प्रारंभ बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या बडोदा संस्थानात योजनाबद्ध पद्धतीने केला. त्यांनी मध्यवर्ती, जिल्हावार, तालुकावार व ग्रामवार ग्रंथालयांची उभारणी केली. इंग्रज सरकारने १८०८ मध्ये ग्रंथालयांच्या नोंदी करण्यास प्रारंभ केला. इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांच्यासाठी काही शहरामध्ये नेटिव्ह जनरल लायब्ररीज स्थापन केल्या होत्या. १८६७ मध्ये प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट या कायद्यामुळे प्रकाशित पुस्तकांची नोंद ठेवण्याबाबतची महत्त्वाची भूमिका निभावली गेली. मद्रास प्रांतात १९२८ साली गावोगावच्या ग्रंथालयांना एकसंघ ठेवण्यासाठी ग्रंथालयसंघ स्थापन करण्यात आला. या ग्रंथालयसंघाच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळ वाढवण्याचे फार मोठे ऐतिहासिक कार्य सुरू झाले. महाराष्ट्रात १९३५ मध्ये पुणे ग्रंथालयसंघ स्थापन झाला. १९४२ मध्ये मुंबई ग्रंथालयसंघ, १९४४ ला मराठी ग्रंथालय संघ यातूनच १९४९ मध्ये महाराष्ट्र ग्रंथालयसंघाची स्थापना झाली. महाराष्ट्र ग्रंथालयसंघाच्या वतीने ग्रंथपालनाला वाहिलेले 'साहित्य सहकार' हे मासिक, ग्रंथालय परिषदा, ग्रंथपालनवर्ग, ग्रंथालय शिबिरे, शालेय ग्रंथालय योजना इत्यादी कामे या महाराष्ट्र राज्य ग्रंथालयसंघाच्या पुढाकाराने करण्यात येत असत.

शैक्षणिक, संशोधनात्मक, राजकीय, औद्योगिक आणि सांस्कृतिक कार्य करणारी ग्रंथालय चळवळीची पाळेमुळे खोलवर रुजलेली दिसतात. भारतात सत्तर हजारांच्या घरात सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्यापैकी वीस टक्के सार्वजनिक ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. देशातील अन्य राज्यांत सार्वजनिक ग्रंथालयांच्या बाबतीत जे चित्र दिसत नाही, तेवढे संख्यात्मक चित्र आपल्या

महाराष्ट्रात दिसते. राज्यात शंभरपेक्षा जास्त ग्रंथालयांना शतायुषी परंपरा आहे. या ग्रंथालयांजवळ अनमोल असा विपुल ग्रंथसाठा आहे. राज्यग्रंथालय संचालनालयाच्या वतीने ४३ शासकीय ग्रंथालये चालवली जातात. यामध्ये एक राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, सहा विभागीय ग्रंथालये, एक विशेष संदर्भ ग्रंथालय व पस्तीस शासकीय जिल्हा ग्रंथालये आहेत.

आज खाउजाच्या जमान्यात सर्वच क्षेत्रांत कॉर्पोरेट जगाचा शिरकाव झाला आहे. स्पर्धेचे जग असल्याने झगमगाटीचा माहोल आहे. पण ग्रंथालयाच्या क्षेत्रात अद्यापही ९० टक्के ग्रंथालयांचे वातावरण १९६० च्या दशकातीलच आहे. इमारतीचा रंग उडालेला, पुरेसे फर्निचर नाही, आल्हाददायक वातावरण नाही, उत्साही कर्मचारी नाहीत, हवं ते पुस्तक मिळेलच याची खात्री नाही, गर्मीच्या दिवसात थंड हवा तर सोडाच वाचकांना साधे पिण्याचे पाणीही मिळत नाही. मच्छरांचा आणि मुतारीचा वास वाचकांचा पिच्छा सोडत नाही. मुबलक प्रकाश नाही. ग्रामीण भागात ग्रंथालय आहे तर वाचक दिसत नाही. वाचक ग्रंथालयात आले तर ग्रंथालय बंद. अनेक वर्षांपासून काही कपाटांना वाचकांचा स्पर्शच नाही. जी काही चार-आठ वाचक मंडळी दिसतात तिही रोजचे वर्तमानपत्र चाळण्यासाठी आलेली. यात तरुणांची सर्वत्रच वानवा... असे आजचे ग्रंथालयांचे सर्वसाधारण चित्र.

महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयांबाबत सुसूत्रता येण्यासाठी १९६७ ला कायदा संमत करण्यात आला. तेव्हापासून 'गाव तेथे ग्रंथालय' हे शासकीय धोरण याबाबतीत ठरवण्यात आले. पाचशे ते पाच हजार लोकसंख्या असणाऱ्या कोणत्याही गावात एका सार्वजनिक ग्रंथालयास मान्यता देण्यात येते. दहा हजारांवर लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये दोन ग्रंथालये, पंचवीस हजारांवर तीन ग्रंथालये, पन्नास हजार ते एक लाखापर्यंतच्या लोकसं'येच्या गावात चार ग्रंथालये अशी लोकसंख्येच्या निकषांवर ग्रंथालयांना मान्यता देण्यात येते. आज काही मोठ्या महानगरांमध्ये दहा ते बारा वाचनालये शासकीय अनुदानित दिसतात.

*ग्रंथालयांकडून अपेक्षा*

ज्ञानाच्या क्षेत्रात ग्रंथालयाकडे फार निकोप दृष्टीने बघितले जात असे. सार्वजनिक ग्रंथालयांकडून युनोस्कोने काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने रम्य व सोयीची जागा, तज्ज्ञ व तत्पर सेवक, उपयुक्त ग्रंथांचा संग्रह, ग्रंथांची शास्त्रशुद्ध रचना व आर्थिक सुस्थिरता ही आदर्श ग्रंथालयाची पाच महत्त्वाची अंगे मानली जातात. अशा ग्रंथालयांकडून पाच प्रकारच्या अपेक्षा व्यक्त करण्यात येतात –

१) शैक्षणिक कार्य : समाजातील कोणत्याही लहान-मोठ्या, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत व्यक्तीला स्वत: ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी ज्ञानसाहित्य उपलब्ध करून देणे.

२) संशोधनात्मक कार्य : प्रत्येक विषयावर संशोधनयोग्य असे अद्ययावत ज्ञानसाहित्य संग्रहित करणे.

३) राजकीय कार्य : स्थानिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील माहिती कोणताही पूर्वग्रह न बाळगता सर्वांना उपलब्ध करून देणे.

४) औद्योगिक कार्य : उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी आवश्यक ती माहिती, नवे विचार, वैज्ञानिक व तांत्रिक संशोधन यांची अद्ययावत माहिती संशोधन व तंत्रज्ञ यांना उपलब्ध करून देणे.

५) सांस्कृतिक कार्य : भावी पिढ्यांसाठी ज्ञान जतन करून ठेवणे.

या गोष्टी लक्षात घेता ग्रंथालय म्हणजे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा मापदंड होय असेच म्हणावे लागेल.

*ग्रंथालयाची सद्य:स्थिती*

शहरी भागात मोठ्या ग्रंथालयांमध्ये बऱ्यापैकी सुखसुविधा दिसतात. परंतु ग्रामीण भागातील चित्र अद्यापही निराशाजनकच आहे. शहरात शिकलेल्या एखाद्या व्यक्तीला वाटते, की गाव सुधारावयाचे असेल तर गावात ग्रंथालय सुरू केले पाहिजे.... तरुणांना वाचनाचा छंद लावला पाहिजे. या प्रामाणिक इच्छेपोटी काही होतकरू व्यक्ती ग्रंथालयाची संस्था रजिस्टर करून ग्रंथालय सुरू करण्याबाबत पुढाकार घेतात. कोणाच्यातरी राहत्या घरी ग्रंथालय सुरू होते. पाच-पंचवीस हजारांची पुस्तके, चार-दोन वर्तमानपत्रे, आठ-दहा मासिके लावून ग्रंथालय सुरू होते. गावातील लोकांची विनवण्या करून सभासद नोंदणी केली जाते. वर्ष-दोन वर्षे उत्साहात ग्रंथालय सुरू राहते. पुढे तुटपुंज्या अनुदानात कर्मचाऱ्यांचा पगार, इलेक्ट्रीक बिल, ग्रंथालयाचे खोलीभाडे, वर्तमानपत्रे-मासिकांची वर्गणी, नव्या पुस्तकांची खरेदी, काही सांस्कृतिक कार्यक्रम या सर्वांची हातमिळवणी करताना ग्रंथालय चालवणाऱ्यांच्या लक्षात येते की – हा तर आतबट्ट्याचा व्यवहार आहे. यातून निघत काहीच नाही, उलट आपलेच पैसे चाललेत. घरच्या भाकऱ्या खा आणि मामाच्या बकऱ्या चारा, असा हा प्रकार आहे. ग्रामीण भागात ड दर्जाच्या जवळपास सर्वच ग्रंथालयांचा हा अनुभव आहे. ज्या ग्रंथालयाचे संचालकमंडळ थोडेफार आर्थिक हातभार लावण्यासाठी सक्षम आहेत, अशांची ग्रंथालये आज तग धरून आहेत. आज महाराष्ट्रात ड दर्जाची ५८२१ ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांना शासन एप्रिल २०१३ पासून तीस हजार रुपयांचे वार्षिक अनुदान देते. यामध्ये पंधरा हजार रुपये या ग्रंथालयाचे काम पाहणाऱ्या एका कर्मचाऱ्याला वार्षिक वेतनवजा मानधन द्यावे असे अपेक्षित आहे आणि उरलेल्या पंधरा हजार रुपयांमध्ये इलेक्ट्रिक बील, ग्रंथालयाचे भाडे, नवीन पुस्तकांची खरेदी, वर्षातून दोन-तीन सांस्कृतिक कार्यक्रम, ऑडिट फी, किरकोळ खर्च इत्यादी अपेक्षित आहे. एवढ्या कमी पैशांत वर्षभर ग्रंथालय चालवणे कसे शक्य आहे? या ड वर्गातील ग्रंथपालाला दरमहा १३९० रुपये मानधन मिळते. ४६ रुपये रोज इतक्या अल्प मानधनावर गावातील कोण तरुण वाचकांना सेवा देणार आहे? भविष्यात ग्रंथालयाचा दर्जा वाढेल किंवा वेतनश्रेणी मिळेल या अपेक्षेने काही तरुण घरावर तुळशीपत्र ठेवून ड दर्जाची ग्रंथालये जिवंत ठेवत आहेत. जशी गोष्ट ड दर्जाची तशीच काही प्रमाणात क, ब आणि अ दर्जाचीही दिसते.

*कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचे भिजत घोंगडे*

साहित्य-कला आणि संस्कृतीच्या नावावर सारेच राज्यकर्ते कोट्यवधी रुपयांचा खर्च करीत असल्याचा देखावा प्रसारमाध्यमांमध्ये करत असले तरी ग्रंथ आणि ग्रंथालयांच्या वाचनसंस्कृतीची धुरा खांद्यावर घेऊन प्राणपणाने कार्यरत असलेल्या ग्रंथालयीन सेवक-कर्मचाऱ्यांना सेवाशर्तींच्या आणि वेतनश्रेणीच्या नावावर गेल्या पाच तपांपासून शासनाने वाऱ्यावर सोडले आहे. या कर्मचाऱ्यांना आज हलाखीचे जीवन जगावे लागत आहे.

दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च साहित्यसंमेलनांच्या नावावर करण्यात येतो. गावोगावी विभागीय साहित्यसंमेलनांची रेलचेल दिसते. कुठे जिल्हा साहित्यसंमेलने तर कुठे प्रादेशिक साहित्यसंमेलनांची मांदियाळी उत्सवामध्ये संपन्न होताना दिसते. दलित-ग्रामीण-आदिवासी, बहुजन, अभिजन अशा अनेक प्रकारांची साहित्यसंमेलने दरवर्षी भरतात. वाचनसंस्कृती लयास जात आहे, मराठी भाषा मरते आहे, या विषयावर गळे काढून रडणाऱ्या लेखक-वक्त्यांची फक्त संख्या वाढत आहे. मराठी वाचनसंस्कृतीला घरघर लागत असताना ती थोड्याफार प्रमाणात जिवंत ठेवण्याचे काम करणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील कर्मचारी जिवंत राहिला पाहिजे यासाठी या महाराष्ट्रातील लेखक-वक्ते, विचारवंत, कलावंत, प्रकाशक फारसे आवाज उठवताना दिसत नाहीत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये जे थोडेबहुत लोक या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीसाठी बोलताना दिसतात त्यांचा आवाज फारच क्षीण आहे. अशी परिस्थिती का निर्माण झाली? महागाई वाढली, शिक्षण, आरोग्य, वाहतूक या सर्व क्षेत्रांत प्रचंड खर्च वाढला. परंतु वाचनसंस्कृतीच्या समृद्धीसाठी झटणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी द्यावी अशी सुबुद्धी महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय विभागाला का होत नाही, हा खरा चिंतेचा प्रश्न आहे. वेतनश्रेणी नाही तर निदान किमान वेतन कायद्याअंतर्गत तरी रोजची मजुरी द्यावी, पण तेही होत नाही.

आजरोजी महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बारा हजार आठशे पासष्ट सार्वज़निक ग्रंथालये कार्यरत आहेत. या ग्रंथालयांत बावीस हजार सहाशे अठ्याहत्तर कर्मचारी आपली सेवा देत आहेत.

राज्य ग्रंथालय संचालनालयाचे वार्षिक बजेट एप्रिल २०१२ मध्ये १२० कोटींचे होते. शासकीय ग्रंथालय व शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पगारावर वीस कोटी रुपये आस्थापनेचे खर्च होतात. शंभर कोटी रुपये बारा हजार आठशे पासष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानाच्या स्वरूपात देण्यात येतात. याच दराने हिशोब केल्यास तेरा कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रात वाचनसंस्कृती टिकवण्यासाठी दहा रुपये सुद्धा नाममात्र दरडोई खर्च होत नाहीत. प्रति व्यक्ती हा खर्च दहा पटीने वाढल्याशिवाय खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची वाचनसंस्कृती वृद्धिंगत होणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञान-संस्कृतीचे जनत व संवर्धन करणाऱ्या ग्रंथालीन कर्मचाऱ्यांच्या दोन पिढ्या उपेक्षेने जगाव्यात ही गोष्टच लांच्छनास्पद आहे. गेल्या पाच दशकांत सर्वच क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांचे पगार ४० ते ५० पटींनी वाढले आहेत. या कालावधीत आजी-माजी आमदार-खासदारांचे मानधन शंभर पट वाढले आहे. परंतु अद्यापही सार्वजनिक क्षेत्रातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी नाही, किमान वेतन मोबदलाही नाही. दरमहा अगदी चौदाशे रुपयांपासून सात हजार पाचशे रुपयांवर आयुष्यभर त्यांना राबावे लागते आहे.

*ग्रंथालय चळवळीतील वाळवीची कुळे :*

आज शासकीय ग्रंथालय संचालनालयातील बोटावर मोजण्याइतपत काही कर्मचाऱ्यांच्या अपप्रवृत्तींमुळे ही संपूर्ण ग्रंथालय चळवळच बदनाम होत आहे. चार-दोन सडक्या आंब्यांनी जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळ नासवली आहे. महाराष्ट्र शासनाने मे २०१२ च्या शेवटी शालेय पटपडताळणीच्या धर्तीवर सार्वजनिक ग्रंथालयांची राज्यभर महसूल विभागाच्या यंत्रणेद्वारे तपासणी केली. यात महसूल यंत्रणेला सहाशेच्या घरात ड दर्जाची ग्रंथालये बंद आढळून आली. या बंद ग्रंथालयांना याच ग्रंथालय संचालनालयातील अधिकारीवर्गाने मान्यता दिली होती. कागदोपत्री ग्रंथालय सुरू होते. ग्रंथालयाच्या नावे अनुदानही निघत होते. मग ही ग्रंथालये बंद कशी? गेल्या अनेक वर्षांपासून ग्रंथालय पदाधिकारी व अधिकारी यांची ही मिलीभगत होती. मान्यता देणारेही हेच आणि अनुदान देणारेही हेच आणि तपासणी करणारेही हेच! आता महसूल विभागाने तपासणी केल्यावर अधिकारी म्हणतात, 'काही कागदोपत्री त्रुटी आढळल्यात - ही बंद असणारी ग्रंथालये बोगस नक्कीच नाहीत.'

*सकस साहित्याची वानवा*

आज महाराष्ट्रात तेरा हजारांच्या घरात सार्वजनिक ग्रंथालये असून चांगल्या पुस्तकांची एक हजारांची आवृत्ती खपत नाही. भालचंद्र नेमाडे यांनी अनेक वर्षे मेहनत घेऊन लिहिलेली 'हिंदू' ही कादंबरी सर्व अनुदानित ग्रंथालयांनी विकत घेतली असती तरी तिच्या तेरा हजार प्रती विकल्या गेल्या असत्या. पण असे चित्र कोणत्याच पुस्तकाबाबत दिसत नाही. साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या पुस्तकांच्याही हजाराची आवृत्ती संपण्यासाठी पाच-सात वर्षे लागतात. याचा अर्थ आज सार्वजनिक ग्रंथालयातून जी ग्रंथ खरेदी होते, तिचा दर्जा निश्चित खालावलेला आहे. शंभर किंवा दोनशे रुपये भरून दोनशे दिवाळी अंक वाचणाऱ्या वाचकांची संख्या मोठ्या ग्रंथालयांमध्ये दिसते. दिवाळी-उन्हाळ्याच्या सुटीत ग्रंथालयातील वाचक मोठ्या प्रमाणावर वाढतात, तसेच स्पर्धा परीक्षांच काळामध्ये वाचकसंख्या वाढलेली दिसते, ही वाढ तात्पुरती असते. यातून वाचनसंस्कृती वाढवणारे वाचक तयार होत नसतात - ही फक्त वाचनसंस्कृतीच्या नावावर आलेली सूज असते.

आज अनेक ग्रंथालयांमध्ये हवे ते पुस्तक मिळत नाही. तेथील वातावरण सौदार्हपूर्वक नसते. कर्मचारी मनमिळाऊ नसतात, म्हणून अनेकांनी आपापल्या घरीच व्यक्तिगत ग्रंथसंग्रह वाढवणाऱ्यावर भर दिलेला दिसतो. महाराष्ट्रातील एका मोठ्या जाणकार प्रकाशकाच्या

मते आम्ही प्रकाशित केलेल्या हजार पुस्तकांपैकी एकशे ऐंशी ते दोनशे दहा पुस्तके सार्वजनिक ग्रंथालयांमधून विकली जातात तर सातशे पुस्तके व्यक्तिगत वाचक खरेदी करतात. आता व्यक्तिगत वाचकांवर प्रकाशकांनी लक्ष केंद्रित केले आहे.

काही ग्रंथालयांचा अपवाद वगळता कोणत्याही दर्जेदार साहित्याची खरेदी न होता मोठ्या प्रमाणावर कमिशन देणारे पुस्तकविक्रेते व प्रकाशकांना शासकीय पैशांच्या आधारावर पोसण्यासाठी ही चळवळ राबवली जाते की काय, इतपत शंका येते.

७० ते ८० टक्के कमिशनवर मिळणारी पुस्तके अनेक ग्रंथालयांमध्ये विकत घेतली जातात. ग्रंथालयात ग्रंथांची क्वॉलिटी न बघता नगसंख्या बघितली जात असल्याने चांगल्या पुस्तकांची जागा टुकार पुस्तकांनी घेतली आहे. अभिरुचीसंपन्न वाचकांनी अशा ग्रंथालयांकडे पाठ फिरवली व कामचलाऊ - टाइमपास करणाऱ्या वाचकांचे यामध्ये फावले.

अभिरुचीसंपन्न असणाऱ्या वाचकांनाही कधी वाटले नाही, की आपल्या गावात, आपल्या ग्रंथालय वाचकांची एखादी संघटना, एखादे मंडळ असावे. या वाचक संघटनेमार्फत ग्रंथालयाच्या गैरकारभारावर अंकुश राहील. वाचकांना हवी ती पुस्तके खरेदी करण्यासाठी ग्रंथालयाच्या व्यवस्थापकीय समितीवर वाचकांचा वचक राहील. काही ग्रंथालयाच्या संचालकांनी शिक्षण सम्राटांसारखे 'ग्रंथालय सम्राट' म्हणून एका जिल्ह्यात पाच-पंचवीस वाचनालयांची साखळीच उभी केलेली दिसते. ज्या गावात ग्रंथालय नाही, त्या गावात ग्रंथालयाचा प्रस्ताव टाकायचा, त्याला मान्यता मिळवायची व मिळणाऱ्या अनुदानातून पाच-पंचवीस सार्वजनिक वाचनालयांसाठी ठोकच्या भावात पुस्तके खरेदी करायची. जो प्रकाशक किंवा जो विक्रेता जास्तीत जास्त कमिशन देईल त्याच्याकडून खरेदी करायची व प्रत्यक्ष बिलावर दहा ते पंधरा टक्केच कमिशन दाखवायचे असाही धंदा काहींनी केला आहे. यामुळे गावोगावच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा दर्जा मोठ्या प्रमाणावर घसरला आहे.

*उत्स्फूर्त काम*

शासकीय अनुदान न घेताही आज ग्रंथालयसेवा देणाऱ्या काही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती व संस्था वाचनसंस्कृती वाढीसाठी प्रयत्न करतात. महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक वाचनसंस्कृती विकसित होण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर रेल्वे स्टेशनसमोर बदलापूर सार्वजनिक वाचनालय होते. येथील श्याम जोशी नामक वाचनप्रिय व्यक्तीने या ग्रंथालयाची जी गुणात्मक व वाचकाभिमुख वाढ केली आहे, ती अनुदान घेणाऱ्या सार्वजनिक वाचनालयांसाठी खरोखरच प्रेरक आहे. बुलडाण्याला पुस्तकमैत्री बालवाचनालयाच्या अनुषंगाने शासकीय अनुदान न घेताही वॉर्डा-वॉर्डात पन्नास बालवाचनालये लोकसहभागातून अतिशय उत्तमरीत्या सुरू करण्यात आली होती. या बालवाचनालयांपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये अशी मोफत बालवाचनालये काही वाचनप्रेमी लोकांनी सुरू केलीत. पुण्याचे **'ग्यानकी'वाले** श्री. प्रदीप लोखंडे यांनी ग्रामीण भागात देणगी प्राप्त करून अनेक गावांमधील शाळांमध्ये पेटी ग्रंथालये सुरू केली आहेत. कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिकच्या वतीनेही वस्ती-वस्तीमध्ये पेटी ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे. आज अनेक सामाजिक उपक्रम करणाऱ्या संस्था, संघटना काही चांगली मासिके, अनितकालिके प्रकाशित करत आहेत. महाराष्ट्रात भिलार या एका गावात पुस्तकाचे गाव करून संपूर्ण राज्यात वाचनसंस्कृती वाढणार नाही. एक प्रयोग म्हणून पुस्तकांचे गाव ठीक आहे, परंतु प्रत्येक गावात किमान एकतरी घर पुस्तकांचे उभारणे आज गरजेचे आहे. मात्र २०१२ पासून महाराष्ट्र राज्यामध्ये नवीन ग्रंथालाला मान्यता देणे बंद आहे, ती त्वरित सुरू होणे गरजेचे आहे.

*वाचनसंस्कृतीला गती देणसाठी काही पर्याय*

आपल्याकडील सार्वजनिक ग्रंथालयांनी वाचकाभिमुख होण्यासाठी अनुदानाचे निकष म्हणून जी सभासदसंख्या दिली आहे, त्यापेक्षा जास्त सभासद मिळवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी कल्पकतेने विविध प्रकल्प सुरू केले पाहिजेत. आज सर्वच ग्रंथालयांमध्ये बालवाचकांकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होते. पाश्चिमात्य देशात वय वर्षे दोनच्या बालकाला सुद्धा सार्वजनिक वाचनालयाचे सभासद होता येते. आपल्याकडे हा विचारही अनेकांच्या पचनी पडणे कठीण आहे. लहान मुलांसाठी स्वतंत्र दालन, त्यामध्ये चित्रकला, मातीकाम, सोबत पुस्तकांशी खेळणे, बोलकी पुस्तके यांच्या माध्यमातून मुलांना बालपणापासून ग्रंथालय संस्कृतीशी जोडून घेता आले पाहिजे. बालकांसाठी अशी सुविधा असल्यास पालकांनाही ग्रंथालयाचे मेंबर होण्यात रुची निर्माण होईल. आपल्याकडे एका-एका व्यक्तीलाच मेंबर करून घेता येते. पण सार्वजनिक वाचनालयांनी व्यक्तींसोबत संपूर्ण फॅमिलीला वाचक सभासद करून घ्यावे. जेणेकरून कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती ग्रंथालयाचा सदस्य होईल.

राज्य ग्रंथालय संचालनालय हे उच्च व तंत्रशिक्षण विभागाला जोडलेले आहे. या ग्रंथालय खात्याला स्वतंत्र सचिव किंवा कॅबिनेट दर्जाचा मंत्री असावा. या कार्यालयात मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांची भरती व्हावी. शंभर सार्वजनिक वाचनालयांची तपासणी व वर्षभर त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक तपासणी अधिकारी व एक कारकून यांच्याकडे स्वतंत्र हाच कार्यभार असावा. यासाठी आज जे कर्मचारी राज्य ग्रंथालय संचालनालयाकडे आहेत, त्यामध्ये तीनपट वाढ होणे गरजेचे आहे.

अमेरिकेच्या लायब्ररी ऑफ काँग्रेसमध्ये दर तीन वर्षांनी एक ब्रीदवाक्य निवडून वाचनसंस्कृतीसाठी कार्य केले जाते. जसे-वाचणाऱ्यांचे राष्ट्र (अ नेशन ऑफ रिडर्स), ग्रंथ आम्हास पंख देतात (बुक्स कॅन गिव्ह अस विंगस्), याविषयी अधिक वाचा (रीड मोअर अबाऊट इट), पुस्तके जीवन बदलतात (बुक्स चेंज लाइफ) आपणसुद्धा अशी सुभाषिते निवडून त्यावर वर्ष-दोन वर्षे काम करून खऱ्या अर्थाने वाचनसंस्कृतीचे वातावरण तयार करू शकू.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषिविभागाचे शेतकरी, आरोग्य



**'ग्यानकी'वाले ?**

विभागाची आरोग्यपत्रिका किंवा माहिती व जनसंपर्क विभागाचे लोकराज्य अशी त्या-त्या विभागांची जी नियतकालिके प्रकाशित होतात, त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे 'राज्यग्रंथालय पत्रिका' नावाचे ई-मासिक का सुरू करू नये? असे ई-मासिक सुरू झाल्यास तेरा हजार सार्वजनिक ग्रंथालयांना याचा लाभ होईल. प्रत्येक ग्रंथालयात हे मासिक जाते, म्हणून प्रकाशकांच्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर या ई-मासिकाला मिळू शकतात. सोबतच राज्य ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्रातील प्रत्येक सार्वजनिक ग्रंथालयाच्या संपर्कात या माध्यमातून राहू शकते. आपल्याजवळ असणाऱ्या क्षमतेचा लाभ घेण्याची क्षमता ओळखणारे नेतृत्व या चळवळीला प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या रूपाने लाभत नाही, ही खरी खंत आहे.

सामान्य वाचकांना आकर्षित करण्यासाठी व त्यांची वाचनवृद्धी वाढवण्यासाठी विविध क्षेत्रांतील सेलिब्रिटींचे 'रीड पोस्टर्स' प्रकाशित करावयास हवे. मी हे वाचले, तुम्ही वाचले का? असा संदेश प्रभावीपणे या पोस्टरांच्या माध्यमातून देता येऊ शकतो. असे पोस्टर शाळा, महाविद्यालय तसेच प्रशासकीय कार्यालयांमध्येसुद्धा लावता येतील. यातून वाचनसंस्कृतीचे महत्त्व इतरांना पटवून देता येईल. नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने दरवर्षी १४ ते २० नोव्हेंबरच्या दरम्यान राष्ट्रीय ग्रंथसप्ताहाच्या निमित्ताने काही पोस्टर प्रकाशित होतात. अशीच रीड पोस्टर राज्य ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने प्रकाशित व्हावीत. प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या शासकीय जिल्हा ग्रंथालयाच्या इमारतींचा वापर स्थानिक लेखक-साहित्यिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींना मोफत वाङ्मयीन सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी करू दिला पाहिजे. जेणेकरून या इमारतींमध्ये वाचक, रसिकांचा राबता सातत्याने राहील. या जनसंपर्कामुळे ग्रंथालयांना नवीन वाचक मिळतील. या जिल्हा ग्रंथालयांमध्ये चित्र-शिल्प प्रदर्शनींचे नियमित आयोजन व्हावे तथा नियमितपणे अभिरुचीसंपन्न फिल्म एल.सी.डी. प्रोजेक्टवर दाखवण्याची सुविधा असावी. यातून गंभीर व अभिरुची संपन्न वाचक सातत्याने ग्रंथालयाच्या संपर्कात राहतील व त्यांच्या वाचनाचा फायदा ग्रंथालयात नवीन ग्रंथ खरेदी करण्यासाठी लाभू शकेल. मुळामध्ये सार्वज़निक ग्रंथालयांच्या परिसरामध्ये अशी वातावरणनिर्मिती हवी की लोक स्वत:हून ग्रंथालयात येऊ इच्छितील, पुस्तके पाहतील, हाताळतील, वाचतील. वाचायला प्रवृत्त करणे आणि ती सवय पुढच्या पिढीपर्यंत झिरपवणे हे काम खऱ्या अर्थाने ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे आहे. मागेल त्याला आणि न मागेल त्यालाही पुस्तके देण्याचे तंत्र ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी अवगत केले पाहिजे. यातूनच खऱ्या अर्थाने वाचक घडणार आहेत.

आज आधुनिकीकरणाची कास या ग्रंथालयांना धरावी लागणार आहे. माहितीतंत्रज्ञानाचा आधार घेऊन नेट-इंटरनेटच्या सेवेसह ग्रंथालयाचे संगणकीकरण करावे लागणार आहे. प्रत्येक अ आणि ब दर्जाच्या ग्रंथालयामध्ये संगणक, इंटरनेटसेवा असणे आज गरजेचे आहे. आपल्या वाचकांच्या संपर्कात राहण्यासाठी ग्रंथालयाच्या वतीने एस.एम.एस. सेवा, वाचनालयाचे फेसबुक पेज, व्हॉट्सॲप ग्रुप, ट्विटरवर अकाऊंटच्या माध्यमातून एका एका वाचनालयाचे सभासद एकमेकांच्या संपर्कात राहू शकतात. मुळात ग्रंथालयामध्ये काम करणारा सेवकवर्ग हा जेवढा कल्पक व वाचनप्रिय असेल तेवढे चांगले दिवस या ग्रंथालयांना येऊ शकतात.

जागतिक मनोविकारतज्ज्ञ डॉ. रॉबर्ट फिलिप यांच्या मते, मानसिक रुग्णांना औषधांच्या गोळ्यांपेक्षा पुस्तकाच्या वाचनाने लवकर गुण येतो. या गुण येण्याच्या पद्धतीला 'ग्रंथोपचार पद्धती' (Bibliography) म्हणतात. पाश्चिमात्य देशांत मनाला उभारी देणारी पुस्तकेच डॉक्टर लोक रुग्णांना वाचण्यास प्रवृत्त करू लागले आहेत. म्हणजेच खऱ्या अर्थाने 'बुक ऑफ डॉक्टर्स' हे सर्वांना मान्य होऊ लागले आहे. तरीही, आपल्या देशात सर्वात जास्त उपेक्षित कोणते क्षेत्र राहिले असेल तर ते ग्रंथालयाचे!

सार्वजनिक ग्रंथालयाची वाचनसंस्कृती ही फक्त राज्य ग्रंथालय संचालनालय किंवा शासन नावाच्या यंत्रणेकडूनच विकसित होईल असे नाही. ज्यांना वाचनाची आवड आहे, त्यांनी आपापल्या गावातील, परिसरातील ग्रंथालयांना मार्गदर्शन करून, कधी पुढाकार घेऊन, काही उचित कार्यक्रमांची आखणी करून वेळ देणे गरजेचे आहे. समाज सुसंस्कृत करण्यासाठी आणि वाचकाभिमुख बनवण्यासाठी शाळा, महाविद्यालये, साहित्यसंस्था, प्रकाशन संस्था आणि प्रसारमाध्यमांचीसुद्धा ही जबाबदारी आहे. ही जबाबदारी प्रत्येकाने पूर्ण केली तरच वाचन संस्कृतीला ऊर्जितावस्था येईल.

आज वाचनसंस्कृती बाल्यावस्थेत आहे, असे जरी आपण असू तरी जसे सकस अन्न शरीरासाठी आवश्क आहे तशीच सकस वाचनसंस्कृती विकसित होणे ही काळाची गरज आहे. ती विकसित करणे, वाढवणे हा जगन्नाथाचा रथ आहे. सर्व भिस्त फक्त ग्रंथालयावर टाकून चालणार नाही. आपला यातील वाटा कुठे आहे, याचा वाचक-लेखक-ग्रंथालय कर्मचारी-प्रकाशक-कलावंत-शासनयंत्रणा-प्रसारमाध्यमे-शिक्षणव्यवस्था, साहित्यसंस्था या सर्वांनीच शोध घ्यायला हवा, अन्यथा आपल्या सर्वांच्या नाकर्तेपणामुळेच वाचनसंस्कृती बाल्यावस्थेत राहिली आहे, हेच सिद्ध होईल.

**- नरेंद्र लांजेवार**
भ्रमणध्वनी : ९४२२१८०४५१
l_narendra2001@yahoo.com

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**शिकणारी शाळा 'अभिरंग'**
**संपादन : वैशाली रोडे**




**शिकणारी शाळा 'बालरंग'**
**संपादन : वैशाली रोडे**




**ध्येय, ध्यास आणि पूर्तता यांची गाथा**

'शिक्षणासाठी नवता' आणि 'शिक्षण व्यवस्थापन' ही अंगे एकमेकांपासून सुटी करता येत नाहीत. शिक्षणातली नवता म्हणजे गुणवत्तावाढीसाठी दर्जेदार शिक्षणासाठी सातत्याने केलेले प्रयत्न आणि प्रयोग, तर शिक्षण व्यवस्थापन म्हणजे कार्यालयीन व्यवस्थापनाबरोबर भौतिक सुविधांचे (जमीन, इमारत इ.) शैक्षणिक साधन–सुविधांचे, वर्गपातळीवरच्या गरजांचे आणि अर्थातच निधीपुरवण्याचे व्यवस्थापन. तसंच शासकीय पातळीवरचा (स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य व केंद्र सरकारशी संबंधित) शिक्षण व्यवस्थापनाचाही त्यात अंतर्भाव असतो.

'शिकणारी शाळा 'अभि'रंग' आणि 'शिकणारी शाळा बालरंग' अशा दोन शाळांविषयीचा दस्तऐवज 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. गोरेगाव, मुंबईचे एक उपनगर येथे प्रथम शाळा सुरू करण्यात आली तिचे नाव 'अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल.' १९४२ साली स्थापलेल्या शाळेचे नाव 'इंग्लिश स्कूल' असे असले तरी तिचे माध्यम मराठी आहे. मग 'इंग्लिश स्कूल' हे नाव कसे? तर ज्या शाळेत पाचवीपासून इंग्रजी विषय (इंग्रजी पहिली) शिकवला जातो. तिला इंग्लिश स्कूल म्हणायची प्रथा तेव्हा होती. हे त्याचे उत्तर ही शाळा सुरू करण्याची प्रेरणा गोविंद पांडुरंग पालकर या शिक्षकाची. तिला नावारूपाला आणायचे श्रेय दयानंद गोविंद प्रभूसर यांचे. त्यामुळे ही पातकरांची शाळा तशी प्रभूसरांची शाळा म्हणून ओळखली जाते. या शाळेसाठी ज्या गोरेगावकरांनी रोख देणगी दिली त्यांचे अनंत भिकोबा हे नाव या शाळेच्या नावाशी जोडले गेले.

त्याकाळी गोरेगाव भागात केवळ चौथीपर्यंत शिक्षणाची सोय होती. पुढील शिक्षणाची सोय हा एक हेतू या शाळेच्या स्थापनेमागे होता, तसा केवळ मुलांना शिक्षण देणारी शाळा नव्हे तर माणूस घडवणारी शाळा असावी, असा दुसरा हेतू होता. शून्यातून म्हणजे केवळ सात विद्यार्थ्यांपासून सुरुवात झालेली शाळा आज शिक्षणक्षेत्रात नावारूपाला आलेली अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते. इंग्रजीचा अट्टहास हा परवलीसारखा असतानाही मातृभाषेतून दर्जेदार शिक्षण देणारी ही शाळा आपला लौकिक टिकवून आहे. वर्गात जे शिक्षण दिले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित नाही. त्यापलीकडे जाऊन अनेक प्रयोग करून उत्तर आकलन होईल आणि त्यात गती प्राप्त होईल असे शिक्षण इथे दिले जाते. प्रत्येक ज्ञानशाखेत शिक्षणासाठीची नवता आणि अद्ययावतपणा ही या शाळेची वेशिष्ट्ये. शिक्षक हा मुख्य घटक, त्याची गुणवत्ता केवळ पदवीप्रमाणपत्राच्या आधारे तपासली जात नाही, तर प्रत्येक शिक्षकाची शिक्षण आणि विद्यार्थी यांच्याविषयीची आस्था, तळमळ, ऊर्जा, प्रयोगशीलता यानुसार ठरवली जाते. वेगळ्या पद्धतीने विचार करणारे, समर्पित भावनेने काम करणारे शिक्षक या शाळेला लाभलेले आहेत आणि शिक्षकापेक्षा पालकत्वाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यात एकजीव झालेले आहेत. शाळा नावारूपाला येण्यासाठी शिक्षकांची ही समर्थन भावना तितकीच महत्त्वाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे लक्ष दिले जातेच, त्याला समजून घेतले जाते. मुलांसाठी समुपदेशन केंद्र सुरू करण्याची कल्पना तर अभिनवच म्हणायला हवी.

संस्थेला पन्नास वर्षे झाल्यानंतर तिने पुढचे पाऊल टाकले. शिशूवर्गापासून चौथीपर्यंतची शाळा सुरू केली. एकदा विद्यार्थ्याने प्रवेश घेतला, की संपूर्ण शालेय शिक्षण एकाच छताखाली व्हावे हा यापाठी उद्देश. विशेष म्हणजे मराठी माध्यम हाच ध्यास कायम आहे. या पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळेची स्थापना १९९९मध्ये म्हणजे संस्थेला सत्तावन्न वर्षे झाल्यानंतर करण्यात आली आहे. या शाळेचा समग्र आढावा. 'बालरंग' या दुसऱ्या पुस्तकातून घेतलेला आहे. या शाळेतही प्रयोगशीलता कशी जपलेली आहे, याची सविस्तर माहिती दिलेली आले.

या अभिरंग आणि बालरंग पुस्तकांतील लेख हे शाळेतील शिक्षक, माजी विद्यार्थी, पदाधिकारी यांनी लिहिलेले आहेत. या लेखांच्या आधारे एखादी शैक्षणिक संस्था स्थापन करण्यापासून ती नावारूपाला येईपर्यंत कशी प्रवास करते, त्यासाठी प्रत्येक टप्प्यावर व्यवस्थापनाला किती प्रयास करावे लागतात, याची मार्गदर्शक ठरावी अशी माहिती समोर येते. विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, साहाय्य करणाऱ्यांचे अनुभव खूप उद्‌बोधक आहेत. त्यामुळे त्यातून संपूर्ण शाळा आणि तो काळ नजरेसमोर दृश्यस्वरूपात उभा राहतो. या सगळ्यांकडून लेख लिहून घेणे आणि त्याचे संपादन करणे म्हणजे १९४० पासूनचा काळ कवेत घेण्यासारखे आहे. हे अवघड काम वैशाली रोडे यांनी कुशलतापूर्वक केले आहे. मांडणी विषयानुरूप केलेली आहे. इंट्रो आणि फोटो यामुळे पुस्तकांच्या सौंदर्यात भर पडलेली आहे. आणि पुस्तकाच्या शीर्षकाने या सगळ्यावर मात केलेली आहे. सतीश भावसार आणि सौमित्र देशमुख यांनी सुंदर मुखपृष्ठांची साथ दिलेली आहे. नवीन शिक्षणसंस्था स्थापन करणाऱ्यांसाठी आणि आदर्श शिक्षणसंस्था असावी. याचा ध्यास असणाऱ्यांसाठी ही पुस्तके उत्तम मार्गदर्शक आहेत.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**
**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**यशपुष्प**
**डॉ. आशुतोष रारावीकर**




**आशयसंपन्न विचारधन**

*रक्ताचा रंग लाल, आकाशाचा रंग निळा*
*पाण्याला तर रंगच नाही*
*पण जीवनाचे सगळे रंग ज्याला उमजतात*
*त्याच्या आयुष्याच्या रंगाचा बेरंग कधीच होत नाही.*

आयुष्याकडे पाहण्याचा, आयुष्य जगण्याचा दृष्टिकोन प्रत्येकाचा वेगवेगळा असू शकतो. या जगण्यात यश आहे तसे अपयशही गृहीत धरलेले असते. म्हणजे जगण्याची लढाई ही जिंकण्यासाठीच असते. परंतु लढाईत अपयश येणार नसले तरी त्याची मानसिक तयारी ठेवली तर त्या अपयशाने खचून जाण्याची वेळ येत नाही. हा जो विचार आहे त्याला समांतर अशी अनेक उदाहरणे स्वतःच्या स्वरुपात पाहावयास मिळतात. घागर मोठी करण्यापेक्षा तिला छिद्र पडणार नाही याची खबरदारी घेतलेली बरी. थोडक्यात पुढे चालणे ही आयुष्याची साधना आहे. पावलांना ठोकर वा ठेच लागणे या प्रवासात गृहीत धरले तर प्रथम अशी ठेच लागणार नाही याची काळजी महत्त्वाची ठरते. तेव्हा आयुष्याच्या सगळ्या बाजू समजून घेतल्यावर रंगाचा बेरंग होण्याची शक्यता सहसा वाट्याला येत नाही.

डॉ. आशुतोष रारावीकर यांचा विचारपुष्पांचा खजिना असलेले पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहे. त्याचे नाव आहे 'यशपुष्प.' या शीर्षकाविषयी लेखकाने मनोगतात स्पष्ट केलेले आहे. ज्यांच्या संस्काराची उत्तम शिदोरी लाभली, जीवनाची सार्थकता ज्याच्यामुळे कळली ते ती. आई आणि ती. बाबा यांच्या नावाची केलेली संधी; वडिलांचे नाव यशवंत म्हणून 'यश' आईचे नाव पुष्पलता म्हणून 'पुष्प' असे 'यशपुष्प'. परंतु एवढाच अर्थ या शीर्षकाचा मर्यादित नाही. लेखकाने प्राप्त केलेले यश आणि त्यासाठी त्याच्यावर झालेली पुरस्कारांची, सन्मानाची कीर्तीची पुष्पवृष्टीही तेवढीच अभिमानास्पद आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक आहेत. नामांकित अर्थतज्ज्ञ असून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान त्याच्या यशाच्या शिरपेचात आहेत. बारावीला बोर्डात पहिला येण्याचा मान त्यानी पटकावलेला आहे. सात पुस्तके त्यांची प्रकाशित आहेत. शैक्षणिक कारकीर्दही सुवर्णाक्षरांनी लिहावी अशीच आहे. अशा तज्ज्ञ रारावीकरांच्या विचारांची झेपही त्यांना साजेशी नसली तरच नवल. 'यशपुष्प' हे त्यांच्या मुक्तचिंतनाचा, आयुष्याकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचा आणि त्याचवेळी खेळकरवृत्तीने सामोरे जाण्याचा ठेवा त्यांनी वाचकांच्या हाती सोपवलेला आहे. त्याला त्यांनी नाव दिलेले आहे, 'यशस्वी जीवनासाठी विचारपुष्पांचा खजिना.' त्यांची विभागणी 'गंध अंतरिक्षाचा', 'स्मितलहरी', 'लॉकडाऊनच्या वेळेत' आणि 'पुष्पांजली परमेशाला' या चार भागात केलेली आले. गंध अंतरिक्षाचा यातील विचार हे मुक्तप्रमाणे ठाशीव, चपखल आणि जीवनानुभवाचे सार असलेले स्पष्ट विचार आहेत. गझलेच्या शेराप्रमाणे प्रत्येक विचार स्वतंत्र, अर्थगर्भ असलेला. ते मुक्तपणे व्यक्त झालेले असले तरी त्यांचा बाज कवितेसारखा आहे. त्यातील अर्थच्छटा प्रत्येकाच्या आकलनानुसार अनेकपदरी आहेत. त्यांच्यातील स्पष्टता आणि विचारांची खोली थेट भिडणारी आहे. जे साध्य करायचे त्याची कालमर्यादा ठरवून त्याच्याआत ते साध्य करा अथवा कालबाह्य ठरण्याचा धोका ठरलेला. जिंकण्यासाठी शर्यतीत उतरलेच पाहिजे. परंतु त्यासाठी कुणाला पाडण्याची गरज नाही, स्वतःची गती वाढवा. माणूस कसाही असला तरी त्यांच्या अंतरी चांगलेपणाचा दीप तेवत असतो. कुठल्याही युद्धासाठी आपण सज्ज असले पाहिजे. भविष्य पाहण्यापेक्षा भविष्य घडवणं महत्त्वाचं हा दृढविश्वास ते जागृत करतात.

स्मितलहरी या भागात विनोदाचा शिडकावा करताना उपहास वा विडंबन करत नाहीत. तर निखळ मनोरंजन करताना आयुष्याची दुसरी बाजू प्रकाशात आणतात, जी वाचत असताना चेहऱ्यावरच नव्हेतर अंतरंगातही स्मितलहरीचे तरंग उमटवतात. कोरोनामुळे 'लॉकडाऊन' झाले. या लॉकडाऊनमुळे अनेकांवर अनेक प्रसंग गुदरले. यातला सगळ्यात मोठा प्रसंग म्हणजे कुटुंबातील सर्वजण आता एकमेकांना पूर्णपणे ओळखू लागले. या लॉकडाऊनसाठी स्वतंत्र एक भाग यात समाविष्ट आहे. शेवटचा भाग हा 'पुष्पांजली परमेशाला'. यातून व्यक्त झालेले विचार हे वैश्विक विचार असल्याचे स्पष्ट होते. प्रार्थना करता करता एकदिवस प्रार्थनेचं उत्तर आपण व्हावं, असा विचार ते मांडतात तेव्हा पसायदानाचे स्मरण इतके वैश्विक अधिष्ठान यातून व्यक्त होते.

प्रत्येक विचार हा सुभाषितांप्रमाणे प्रत्येकाने केवळ मुखोद्गत करावा असे नाहीतर तो आचरणात आणावा. तसे झाले तर पण म्हणजे काय? हा प्रश्न कधी कुणाला पडणार नाही. एक चांगहा विचारसंग्रह वाचल्याचे समाधान हे पुस्तक देते. या पुस्तकाची निर्मितीसुद्धा अतिशय उत्तमपणे झालेली आहे. प्रत्येकाने संग्रही ठेवावा असा हा संग्रह आहे. उत्तम कांबळे यांची प्रस्तावना या पुस्तकाचे कौतुक करणारी आहे. समीर अन्नारकर यांनी मुखपृष्ठ आणि मांडणी केलेली आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**प्रेमसेतू**
**संदीप रामराव काळे**



**तुम्हीपण काळजी घ्या!**

एखादी व्यक्ती खूप इमोशनल असते आणि तिला एखादा पर्याय सापडतो आणि तो पर्याय आता असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक चांगला आहे, असे तिला वाटते, तेव्हा ती नवा पर्याय नक्कीच स्वीकारू शकते. पण, हा नवीन पर्याय स्वीकारत असताना जुने ऋणानुबंध, आत्मिक भावना यांचा गंध कुठेतरी चिकटलेला असतो.

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे... प्रेम हा जीवनाचा गाभा. प्रेमही जीवनाची संजीवनी, प्रेम म्हणजे सर्वस्वाचं सार, प्रेम म्हणजे... प्रेम ही भावना सर्वकाळ जीवनाला व्यापून टाकणारी, चिरंतन सोबत करणारी, तिच्यासाठी कुठलेच निर्बंध, मर्यादा नसणारी, दोन नात्यांना एकत्वात बांधणारी, हसवणारी, फुलवणारी, ओढ-जिव्हाळ्यात चिंब भिजवणारी, स्वत:ला वेढून टाकणारी, स्वर्गीय आनंद देणारी आणि त्याचवेळी विस्कटली तरी दरीच्या तळाशी, डोहाच्या भोवर्‍याशी समाधी देणारी... प्रेमाची रूपे, प्रेमाची सफलता, विफलता याविषयी सर्वकाळ लिहिले जात आहे. प्रत्येकाचे अनुभव, चिंतन, आकलन यांचे दर्शन त्यातून होत असते. कथा, कादंबरी, कविता यातून ती वाचकांच्या समोर व्यक्त झालेली कहाणी असते, गाथा असते, भावनोद्गार असते... तरीही ती प्रत्येकवेळी वेगळी आणि तितकीच वाचकाला भिडणारी असते. कितीही लिहिले तरी कधीही कोमेजलेला नाही असा हा एक विषय आहे ज्याचे नाव आहे प्रेम! हाच विषय घेऊन आलेले आहेत संदीप काळे.

संदीप काळे हे पत्रकार, संपादक, प्राध्यापक, व्याख्याते, अभ्यासक, अनुवादक या नात्याने सर्वांना परिचित आहेत. आतापर्यंत त्यांची सुमारे १८ पुस्तके प्रकाशित आहेत. त्यापैकी 'मु. पो. आई' हे सर्वाधिक वाचक पसंतीस उतरलेले पुस्तक (१६ आवृत्त्या). हरहुन्नरी, उत्तम सामाजिक भान असलेले, अनेक शासकीय पुरस्कारांनी सन्मानित झालेले बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे संदीप काळे.

'प्रेमसेतू' ही गाथा काव्याचा आविष्कार आहे, कादंबरीचा वेगळा प्रकार आहे आणि म्हटले तर चरित्राचा एक अंश आहे. लेखन प्रथमपुरुषी असल्याने हे लेखन त्यांच्या आत्म्याचा हुंकार म्हणावयास प्रत्यवाय नाही. प्रेम हा हळवा, नाजूक भावनेचा दवबिंदू आहे. त्याचा सागरही होतो, सूरही होतो आणि विश्वही. याचा बांधलेला, उभारलेला, गुंफलेला सेतू वाचकासाठी खुला केलेला आहे. उत्कटता आणि दाहकता आा दोन स्तंभाच्या आधारावर उभा असलेला हा सेतू. काव्याचा आणि कथानकाचा प्रचंड मोठा प्रवाह आपल्या काळजाशी कवटाळून आहे. या प्रवाहाचा वेग आणि त्याची घनगंभीर सखोलता एखाद्या प्रपातासारखी आहे, याचा अनुभव ही गाथा वाचताना येते, पूर्णपणे मनाला वेढून टाकते, काळजाचा ठाव घेते, आपलेपणाचे भान जागृत करते. 'अरे, हा तर माझाच प्रवास आहे' हे पुन:पुन्हा मनावर ठसवत जाते. ज्याला लेखकाने नाव दिले आहे, 'आत्मिक साहित्य!'

प्रेमसेतू हा तेरा खांबांवर उभा आहे; स्पर्श, तृप्ती, प्रेम, जिव्हाळा, तुझे असणे, तुझ्यासाठी, जिवलगा, भावना, जाणीव, मित्रत्व, वेदना, दिवस सरताना आणि विरह. प्रयोगशाळेत कुठल्याही प्रयोगासाठी जे घटक ठरलेले असतात तसे प्रेमासाठी या तेरा घटकांनी स्वत:चे स्थान अबाधित ठेवलेले आहे. या सर्व घटकांची वैशिष्ट्ये, उत्कटता, दाहकता आणि त्यातून आलेली सोशिकता व्यक्तिगणीक वेगवेगळी असू शकते, परंतु अनुमानात फारसा फरक पडत नाही. तेच या गाथेतून व्यक्त झालेले आहे. परंतु इथे केवळ प्रियकराने प्रेयसीशी साधलेला, अंत:करणातून प्रवाहित झालेला संवादच नाही, त्याला प्रत्येकाला एकेका उपकथानकाची उत्तम अशी जोड आहे. अमृता प्रीतम-इमरोझ, सरलादेवी-म. गांधीजी, मल्लिका-नामदेव ढसाळ, विनी-नेल्सन मंडेला, कादंबरी-रवींद्रनाथ टागोर, एमिली-सुभाषचंद्र बोस, राधा-मीरा-कृष्ण, रेखा-अमिताभ बच्चन, ॲनी-चार्ल्स, मार्गारेट (निवेदिता)-स्वामी विवेकानंद, फॅनी-डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सोनी-महिवाल (राजकुमार इज्जत बेग), ऊर्मिला-लक्ष्मण, मामाची मुलगी-प्राध्यापक; या प्रत्येक उपकथानकात एक प्रेमगाथा आहे. या प्रत्येक गाथेशी प्रियकराचे आणि प्रेयसीच्या प्रेमाचे नाते आहे. ती गाथा आपली आहे, ही भावना, अनुभव म्हणून त्याचा उल्लेख संदर्भासारखा या गाथेत आलेला आहे.

प्रेम हे काव्य असते म्हणून त्याचे व्यक्त होण्याचे माध्यम काव्यच निवडले जाते. 'प्रेमसेतू' हे कवितासंग्रहासारखे रूप धारण करून आलेले नाही. परंतु जो संवाद साधला आहे तो काव्यापेक्षा वेगळा नाही. एक मुक्तकाव्य म्हणावे असा हा प्रेमसेतू आहे. कविता, शेर यांचाही साधा समावेश आहे तो याच प्रवाहाचा एक भाग आहे. भाषा मार्दव हा गुण उत्कटतेने जाणवतो. आकस, द्वेष, दूषण या विकारापासून ही भाषा अंतर राखून आहे. कथानकाला आरंभ, मध्य आणि शेवट असतो, तसे प्रत्येक टप्पे इथे आहे. त्यामुळे कथानकाचा सहजसुंदर प्रवास प्रत्ययास येतो. या प्रवासाविषयी लेखकाने स्वत:च्या मनोगतात व्यक्त केलेल्या भावना या गाथेचे प्रकरण असावे इतक्या संवादी आहेत. डॉ. वृषाली किन्हाळकर यांची साक्षेपी प्रस्तावना ही प्रेमसेतूसाठी मोठी शाबासकी म्हणता येईल. नयन बारहाते यांचे मुखपृष्ठ हे या गाथेचे कोंदण असावे इतके सुंदर आहे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

ग्रंथाली

# ग्रंथपान




## यशस्वी उद्योजगाची लेखनातली चौफेर मुशाफिरी 'मुलुखगिरी'

''गेली साधारणत: दोन-अडीचशे वर्षे अत्यंत लोकप्रिय असलेली ही पूजा (सत्यनारायण) त्या आधीच्या धार्मिक जीवनाचा भाग नव्हती. ही पूजा शिवकालात नव्हती. छत्रपतींच्या कारकिर्दीत अनेक विवाहसमारंभापासून किल्ले उभारणीपर्यंत - मंगलकार्ये झाली, परंतु शिवाजीमहाराजांनी कधी सत्यनारायण केल्याचे उल्लेख नाहीत. अगदी पेशवाईतसुद्धा ही पूजा केली जात नव्हती.''

'छपाई ते लेखणी' हा लेखसंग्रह आहे. यात २८ लेख आहेत. यशवंत मराठे यांनी २०१८ मध्ये 'सरमिसळ' या नावाने ब्लॉग लेखन सुरू केले. अवघ्या दोन वर्षांच्या काळात या लेखांची संख्या १७५ वर पोचली. त्यापैकी हे निवडक लेख. ब्लॉगवरचे लेखन हे स्वतंत्र आणि स्वांत असते. म्हणून ते टिकाऊ नसून टाकाऊ असते किंवा त्या त्या वेळची ते ऊर्मीलेखन असते असे अजिबात नाही. लेखन हे कसदार आणि विषयाला न्याय देणारे असते. महत्त्वाचे त्याला प्रकाशात आणण्यासाठी 'ब्लॉग' हे तंत्रज्ञानाने उपलब्ध करून दिलेले माध्यम सोयीचे ठरते. त्याचा वाचक अर्थातच तंत्रज्ञानाशी जुळवून घेणारा असतो, आणि आज बहुतेक सगळेच वाचक या माध्यमाशी सराईत होत असल्याने वाचकांची संख्या मोठी भरते. त्यावर प्रतिक्रियाही त्याचवेळी त्याच माध्यमावर देता येते. असे लेखक आणि वाचक यांना जुळवून घेणारे आणि व्यक्त होण्यास साहाय्य करणारे माध्यम म्हणजे ब्लॉग. त्या ब्लॉगवरील लेखांचा हा संग्रह, 'छपाई ते लेखणी'.

शीर्षकात छपाई आणि लेखनाचा उल्लेख आहे तो दोन अर्थाने. सुबक छपाईसाठी क्रांतिकारक ठरणारे मुद्रणयंत्र म्हणजे 'ऑफसेट प्रिंटिंग मशीन'चे उत्पादन करणारा उद्योगसमूह हा 'मराठे उद्योग' समूह आहे. आज जगभरात या मशीनचा छपाईसाठी उपयोग करण्यात येत आहे. या यशस्वी व्यवसायातून निवृत्ती घेतल्यानंतर यशवंत यांनी सामाजिक कार्य करत असूनही फावल्या वेळात लेखनाकडे विशेष लक्ष दिले. त्या अर्थाने छपाई ते लेखणी.

हे एका यशस्वी उद्योजकाचे चरित्र वा आत्मचरित्र नाही. (खरे तर त्यांनी ते लिहायलाच हवे.) तरीही लेखनाच्या ओघात दोन लेखांचा यात समावेश आहे; 'अप्पासाहेब' आणि 'बाबा'. अप्पासाहेब हे लेखकाचे आजोबा, सखाराम पुरुषोत्तम ऊर्फ अप्पासाहेब मराठे आणि बाबा हे लेखकाचे पिताजी सुरेश सखाराम मराठे. हे दोन्ही उद्योगमहर्षी. आज प्रसिद्ध असलेला मराठे उद्योगसमूह ही त्यांच्या मेहनत-परिश्रम-कल्पकतेचे प्रतीक. प्रतिकूल परिस्थितीतही शून्यातून विश्व निर्माण करण्याची क्षमता असलेले हे उद्योगपुरुष. त्यांचाच वारसा चालवणारे तिसर्या पिढीचे प्रतिनिधी लेखक यशवंत मराठे होत. त्यांचा उद्योगसमूह कसा उभा राहिला याचा इतिहास आणि व्यक्ती म्हणून असलेली जडणघडण या लेखांमधून वाचायला मिळते.

आचार्य रजनीश ऊर्फ ओशो - एक त्सुनामी, जोशीकाका, धन्वतरी, लतादीदी हे व्यक्तिचित्रण करणारे लेख आहेत. या लेखांतून केवळ व्यक्तिपरिचयच नाही तर त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व, त्यांचे अनुभव, समाज आणि त्यांच्या भोवतीचे वातावरण या सगळ्यांचा परिपूर्ण असा वेध घेतलेला आहे.


लेखांना विषयांचे बंधन नाही. इतिहास, ज्योतिष, खगोलशास्त्र, विज्ञान, अध्यात्म, सामाजिक जीवन, संस्कृती असा विशालपट त्यांच्या लेखनातून वाचायला मिळतो. त्यातील बरीचशी माहितीही आकडेवारीसह, तपशिलासह दिलेली आहे, जी संदर्भ म्हणून नक्कीच उपयुक्त ठरते. 'गावगाडा' यात बारा बलुतेदार असतात तसे अठरा अलुतेदार असतात, त्यांची नावे या लेखात त्यांच्या संदर्भासह दिलेली आहेत. पंचागातले कोष्टक आणि त्यांची गणना सुलभपणे स्पष्ट करून सांगितलेली आहे, तिच्या आधारे कुणालाही या शुभ नि अशुभ तिथींची नोंद करता येईल. ढगाची अकरा प्रकारांत विभागणी, विजेची दहा प्रकारांत ओळख असते ती यातील लेखांवरून लक्षात येते. यासाठी प्रकांड गणिती वराहमिहिर व त्यांची बृहतसंहिता यांचा संदर्भ दिलेला आहे. 'बरखाराणी' हा पावसावरील लेख तसाच सुंदर आहे.

सामाजिक जीवनाचा आलेख काही लेखांतून आलेला आहे. बेरोजगारी या समस्येचे मूळ आणि त्यावरचे उपाय, मला उमगलेले अध्यात्म हा प्रत्येकाच्या मनातला विषय, यांचे विश्लेषण लक्षात घेण्यासारखे आहे. आज मुंबईत 'भय्या'कडे ज्या नजरेने पाहतो, त्याच नजरेने परदेशातील नागरिक त्यांच्या देशात भारतातून आलेल्या मुलांकडे पाहतात, ही दाहकता अस्वस्थ करणारी तरी वास्तववादी आहे.

या संग्रहातील सगळेच लेख हा अभ्यास, निरीक्षण आणि त्याच्या मुळाशी जाऊन केलेल्या संशोधनावर आधारित आहेत. त्यांची शैली उत्तम आहे. प्रत्येक मुद्दा स्पष्ट करणारी सहज सुलभ आणि वाचनीयता कायम ठेवणारी आहे. त्यामुळे ते संस्मरणीय आणि संदर्भमूल्य असलेले ठरते.

सुधीर जोगळेकर यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. स्वत: लेखकाचे मनोगतही त्यांची लेखनामागची प्रेरणा व्यक्त करते. मुखपृष्ठावर छपाईचे ठसे आणि लेखणी यांची योजना केलेली आहे. सतीश भावसारांची ही कल्पकता आशयाशी नाते सांगणारी आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**



डोळे मिटून पुस्तक ऐका!
सर्वोत्तम मराठी पुस्तके आता ऑडिओमध्ये.
दरमहा फक्त रू.99/- पासून.
आजच डाऊनलोड करा!
storytel
आहे मनोहर तरी
सुनीता देशपांडे
शरद पवार
लोक माझे सांगाती...
स्मृतिचित्रे
QR code स्कॅन करा किंवा
www.storytel.com
या वेबसाईटला भेट द्या.
App Store
Google Play
Recurring: All Credit Cards and Select Debit Cards. Non recurring: All payment options available including UPI, Netbanking, Cards and Wallets. *T&C apply.

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No.
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.